कृषीवल
रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
१९३७-२०२६ ९० वर्ष
रायगड । सोमवार । दि. १३ जुलै २०२६ । अंक ३७ । पृष्ठे ८+४ । किंमत ५ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

## ढिगाऱ्याखालून ९ जणांचे मृतदेह बाहेर

**पुणे :** पिंपरी-चिंचवडमधील मोशी कचरा डेपो येथे दि.८ जुलै रोजी घडलेल्या भीषण दुर्घटनेत मृतांचा आकडा ९ वर पोहोचला आहे. कचऱ्याचा प्रचंड डोंगर कोसळल्याने वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पाची प्रशासकीय इमारत जमीनदोस्त झाली होती. या दुर्घटनेनंतर सुरू करण्यात आलेल्या बचाव आणि शोध मोहिमेनंतर ढिगाऱ्याखालून ९ जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. यावेळी ढिगाऱ्याखाली अडकलेल्या नागरिकांचा शोध घेण्यासाठी सलग ८३ तास शोधमोहीम राबवण्यात आली. अखेर सर्व संभाव्य ठिकाणांची तपासणी पूर्ण झाल्यानंतर प्रशासनाने ही शोधमोहीम अधिकृतपणे थांबवली.

## सोने-चांदीच्या दरात घसरण

**नवी दिल्ली :** सोने-चांदी खरेदी करणाऱ्यांसाठी दिलासादायक बातमी आहे. रविवारी सराफा बाजारात २४ कॅरेट सोन्याच्या १० तोळ्यांच्या दरात तब्बल ४ हजार ९०० रुपयांची घट झाली, तर चांदीही प्रति किलो ५ हजार रुपयांनी स्वस्त झाली. २४ कॅरेट सोन्याचा १० ग्रॅमचा दर १ लाख ४४ हजार ३३० रुपये इतका होता. तर, २२ कॅरेट सोन्याचा १० ग्रॅमचा १ लाख ३२ हजार ३०० रुपये दर नोंदवला गेला. तसेच, १८ कॅरेट सोन्याचा १० ग्रॅमचा १ लाख ०८ हजार २५० असा दर होता. तसेच, १० ग्रॅम चांदीचा २ हजार ३५० रुपये आणि १ किलो चांदीचा २ लाख ३५ हजार रुपये इतका दर होता.

### वेधक

## बारा दिवसांत दोन पर्यटकांचा मृत्यू

**नेरळ :** कर्जत तालुक्यात नैसर्गिक सौंदर्य पाहण्यासाठी पावसाळ्यात चार महिने हजारो पर्यटक येत असतात.तसेच, पावसाळ्यात वर्षासहलीसाठी येणाऱ्या पर्यटकांच्या अतिउत्साहीपणामुळे अपघात होऊ नये, यासाठी नेरळ पोलिसांनी परिसरात असलेल्या धबधब्यांवर कडक बंदोबस्त ठेवला आहे. तरीदेखील पर्यटकांच्या अतिउत्साही पणामुळे गेल्या १२ दिवसांत दोन पर्यटकांचा मृत्यू झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. नेरळ येथील जुम्मापट्टी, टपाल वाडी, आनंदवाडी, फणसवाडी, आंबेवाडी, ममदापूरवाडी, बेडीसवाडी व पाषाने इत्यादी ठिकाणी असलेल्या धबधब्यांवर मोठ्या प्रमाणात पर्यटक पर्यटनासाठी येत असतात. अनेकदा अतिउत्साही पान २ वर

## ओमानजवळ भारतीय जहाजावर हल्ला

**नवी दिल्ली :** इराण आणि अमेरिका यांच्यातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, ओमानच्या किनाऱ्याजवळ एका व्यापारी जहाजावर झालेल्या हल्ल्याबाबत भारताने कठोर भूमिका घेतली आहे. परराष्ट्र मंत्रालयाने ओमानच्या किनाऱ्याजवळ जीएफएस गॅलेक्सी या व्यापारी जहाजावर झालेल्या हल्ल्याचा तीव्र निषेध केला आहे. रविवारी जारी केलेल्या निवेदनात मंत्रालयाने माहिती दिली की, जीएफएस गॅलेक्सीवर हल्ला झाल्यानंतर त्वरित मदत आणि बचाव कार्य सुरू करण्यात आले. जहाजावरील ११ भारतीयांपैकी १० जणांची सुटका करण्यात आली असली, तरी बेपत्ता असलेल्या एका भारतीय नागरिकाचा शोध अद्याप सुरू आहे.

## इराणच्या अंतर्गत सत्तावर्तुळात मतभेद

**नवी दिल्ली :** होर्मुझ सामुद्रधुनीवर नियंत्रण ठेवण्यावरून इराणमध्ये दोन गट पडल्याचे चित्र दिसून येत आहे. एकीकडे लष्करी संघटना आयआरजीसी आणि दुसरीकडे पेजेशकियान यांचे लोकनियुक्त सरकार यांच्यात संघर्ष पेटला आहे. अमेरिका आणि इराणमधील वाढत्या लष्करी संघर्षाच्या पार्श्वभूमीवर आता इराणच्या अंतर्गत सत्तावर्तुळात मतभेद झाले आहेत. इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स होर्मुझ सामुद्रधुनीवर पूर्ण ताबा मिळवण्याच्या बाजूने आहे. तर, राष्ट्राध्यक्ष मसूद पेजेशकियान यांचे लोकनियुक्त सरकार मुत्सद्देगिरीचा मार्ग अवलंबून वाद शांत करण्याच्या भूमिकेत आहे.

## महिलेवर अत्याचार

**नागपूर :** जादुटोनाच्या माध्यमातून 'माथाडी कामगार' म्हणून मुलाला नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवून ५२ वर्षीय महिलेवर अत्याचार केल्याची धक्कादायक घटना नागपूरमध्ये घडली. संजय रामदास शिरोडे (५०) असे त्याचे नाव असून त्याला अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिलेच्या पतीला संजय शिरोडे याने मुलाला 'माथाडी कामगार' म्हणून नोकरी मिळवून देण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर त्याने एका विशेष पूजेची आवश्यकता असल्याचे सांगितले. दि.२७ जून रोजी पूजा सुरू असताना, त्याने महिलेच्या पतीला आणि मुलाला बाहेर पाठवले. त्यानंतर महिला घरात एकटी घरात असताना, त्याने तिला बळजबरीने बेडरूममध्ये नेले आणि तिच्यावर अत्याचार केला.

## जलजीवनची कामे उद्याप अपूर्णच

# ठेकेदार, अधिकाऱ्यांवर कारवाईचा बडगा




### सतेज पाटील यांनी वाचला सभागृहात पाढा

**। रायगड । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील जलजीवन योजनेमधील पाणीपुरवठा योजनांच्या अपूर्णतेचा पाढा विधानपरिषदेचे आमदार सतेज पाटील यांनी सभागृहात वाचला. सतेज पाटील यांनी रायगडातील मंजूर जलजीवन योजना या जनतेसाठी कि ठेकेदारासाठी आहेत? यावर प्रकाश टाकून सभागृहाचे लक्ष वेधले. जिल्ह्यात मंजूर असणाऱ्या योजना पूर्णत्वाकडे गेल्या आहेत, असा कागदावरचा आलेख वाचून दाखवला. ठेकेदार आणि अधिकारी यांच्या हलगर्जीपणामुळेच रायगड जिल्ह्यातील योजना पूर्ण आहेत. नळ घराघरात पोहचले आहेत, पण नळाला पाणी नाही. तर, काही ठिकाणी पाण्याची टाकी आहे, पण पाण्याचे स्रोत नाहीत, असे विदारक चित्र आमदार सतेज पाटील यांनी सभागृहासमोर मांडले. सतेज पाटील यांच्या या गंभीर प्रश्नावर उत्तर देताना राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी संबंधित दोषी कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले आहे.

### प्रलंबित देयकांसाठी निधीची व्यवस्था

महाराष्ट्रात जलजीवन मिशनअंतर्गत सुमारे ५१ हजार ५०० योजना हाती घेण्यात आल्या असून, त्यापैकी सुमारे २८ हजार योजना पूर्ण झाल्या आहेत. अनेक गावांमध्ये नळाद्वारे पाणीपुरवठा सुरू झाला आहे. केंद्र सरकारने या योजनेची मुदत डिसेंबर २०२८ पर्यंत वाढविली असून, राज्यालाही आवश्यक निधी उपलब्ध होत आहे. जलजीवन मिशनसाठी ११ हजार १९० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला असून, प्रलंबित देयकांसाठीही राज्य सरकारने निधीची व्यवस्था केली असल्याचे सांगितले.

> जलजीवनच्या कामात हलगर्जीपणा करणाऱ्या कंत्राटदारांना कोणतीही सवलत दिली जाणार नाही. काम पूर्ण न करणाऱ्या कंत्राटदारांवर तसेच त्यांना विनाकारण देयके मंजूर करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवरही नियमानुसार कठोर कारवाई केली जाईल.
> – मेघना बोर्डीकर, राज्यमंत्री, महाराष्ट्र

राज्यमंत्र्यांनी कारवाईचा बडगा उगारणार आल्याचे जाहीर केल्याने कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांच्या पायाखालची जमीन सरकली आहे.

जिल्ह्यातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी 'हर घर जल' या घोषणेसह १,४२२ पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आल्या होत्या. त्यासाठी तब्बल दीड हजार कोटींचा निधी वर्ग करण्यात आला. मात्र, २०२४ अखेरपर्यंत हे काम पूर्ण होणे अपेक्षित होते. दरम्यान, विहित मुदतीत कामे पूर्ण न झाल्याने अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी ठेकेदारांना दोन वेळा मुदतवाढ देण्यात आली. मात्र, त्यानंतरही योजनांची कामे अद्यापही अपूर्ण असल्याची बाब उघडकीस आली आहे. जिल्हा पोरिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता मोहन सरवदे यांनी स्पष्ट केले आहे की, कंत्राटदारांकडून पान २ वर

## अलिबाग एसटी स्टँडसमोर मृतदेह



■ शववाहिकेसाठी तीन तास प्रतीक्षा

■ आरोग्य यंत्रणेवर गंभीर प्रश्न

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग येथील एसटी स्थानकासमोर रविवारी (दि.१२) एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. मात्र, मृतदेह सरकारी रुग्णालयात हलविण्यासाठी तब्बल तीन तास ॲम्ब्युलन्स उपलब्ध न झाल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल नाईक यांनी केला. यावेळी नगरसेविका ॲड. अश्विनी ठोसरही घटनास्थळी उपस्थित होत्या.

स्वप्निल नाईक यांनी दिलेल्या माहितीनुसार, ते अलिबाग एसटी स्थानक परिसरात आले असता स्थानकासमोर एका व्यक्तीला रस्त्याच्या कडेला पडलेल्या अवस्थेत पाहिले. जवळ जाऊन पाहिल्यानंतर त्या व्यक्तीच्या अंगावर मोठ्या पान २ वर

## वर्ष उलटूनही भरपाई लाल फितीत




**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

मागील वर्षी जूलै महिन्यात झालेल्या अतिवृष्टीत जिल्ह्यातील ३७६ घरांची पडझड झाली होती. त्यात काही पुर्णतः तर काही अंशतः घरे कोसळली होती. या अतिवृष्टीत पोटाला चिमटा काढून निर्माण केलेला संसार मोडून पडला. परंतु, वर्ष उलटले तरी अद्याप नुकसानग्रस्तांना शासनाकडून मदतीचा हात मिळाला नाही. दरम्यान, ही भरपाई लाल फितीत अडकून असल्याची माहिती समोर आली आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये जूलै २०२५ मध्ये अतिवृष्टी झाली होती. त्यामुळे अनेक भागांत पुरपरिस्थिती निर्माण झाली होती. तर, सखल भागांमध्ये पाणी साचले होते. तसेच, या अतिवृष्टीमध्ये जिल्ह्यातील अनेक घरांची पडझड देखील झाली होती. त्यात काहींच्या घरांचे पत्रे उडाले, काहींच्या घरांची भिंत कोसळली, तर काहींचे पुर्णतः घर कोलमडून पडले. त्यामुळे या पावसात मोठी वित्तहानी झाली होती. यावेळी एकूण ३७६ घरांचे नुकसान झाले होते. त्यात ३३३ पक्क्या आणि ४३ कच्च्या घरांचा समावेश आहे. त्यातील पक्क्या घरांमध्ये २४ घरांची ५० टक्के, १५० घरांची २५ टक्के, तर १५९ घरांची १५ टक्के हानी झाली. तसेच, कच्च्या घरांमध्ये ४ घरांचे ५० टक्के, आठ घरांचे २५ टक्के आणि ३१ घरांचे १५ टक्के नुकसान झाले असल्याची माहिती समोर आली आहे.

रायगड जिल्ह्यामधील श्रीवर्धन, कर्जत, पेण, पनवेल, म्हसळा या तालुक्यांतील ३८ पासून ८६ घरांचे तसेच खालापूर, रोहा, सुधागड, अलिबाग, मूरूड, माणगाव, तळा, महाड, पोलादपूर या तालुक्यातील २ पासून २६ घरांचे नुकसान झाल्याची माहिती जिल्हा प्रशासनकडून उपलब्ध झाली आहे. जिल्हा प्रशासनाने तातडीने नुकसानीचे पंचनामे करून नुकसानीचा अहवाल राज्य शासनाला पाठविला होता. तसेच, शासनाकडून ३७ लाख रुपयांच्या भरपाईची मागणी देखील करण्यात आली होती. मात्र, वर्ष उलटले तरीदेखील शासनाकडून भरपाई मिळाली नसल्याची पान २ वर

## वेश्या व्यवसायातून महिलांची सुटका

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल शहरातील हॉटेल राहुल पार्क लॉजिंग अँड बोर्डिंग वर छापा टाकून पोलिसांनी दोन बांगलादेशी महिलांसह सहा पीडित महिलांची सुटका केली आहे. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन कदम यांना हॉटेल राहुल पार्क लॉजिंग अँड बोर्डिंग येथे मॅनेजर लॉजमध्ये महिला ठेवून त्यांच्याकडून वेश्या व्यवसाय करून घेतो, अशी माहिती मिळाली होती. त्यानुसार त्या ठिकाणी बनावट ग्राहकाला पाठविण्यात आले. त्याच्या सांकेतिक पान २ वर

## युवा प्रशिक्षणार्थी आक्रमकतेच्या भूमिकेत




**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

महायुती सरकारने मते मिळविण्यासाठी मागील विधानसभा निवडणूकीत घोषणांचा पाऊस पाडला होता. मात्र, जिल्ह्यासह महाराष्ट्रात प्रशिक्षणार्थींवर आता बेकारीचे संकट उभे राहीले आहे. मुंबईच्या आंदोलनानंतर युवा प्रशिक्षणार्थी आक्रमतेच्या भूमिकेत आहेत. आगामी काळात जिल्ह्यात थोर महापुरुषांच्या स्मारका समोर सरकारचा निषेध करण्यात येणार असल्याची माहिती आंदोलकांनी दिली.

भर पावसात युवा प्रशिक्षणार्थी संघटनेच्यावतीने मुंबईत आझाद मैदानावर आंदोलन करत सरकारला धारेवर धरले. थोर महावीर क्रांतिकारक यांचा मोठ्याने जय घोष करत सरकारला त्याचा चेहरा आरश्यात दाखवण्याचा प्रयत्न करण्यात आला. ''ही पावसात पडलेली ठिणगी आहे पान २ वर

> युवा प्रशिक्षणार्थींवर बेकारीचे संकट निर्माण झाले आहे. सरकारने युवांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, यासाठी मुंबईत आझाद मैदानावर आंदोलन करण्यात आले होते. हे आंदोलन नंतर सामान्य प्रशासन व कौशल्य विभागाचे सचिवान समवेत शिष्टमंडळाची बैठक घेतली जाणार आहे. या बैठकीनंतर सकारात्मक निर्णय न झाल्यास आंदोलनाची तीव्र भूमिका राहणार आहे.
> – ऋषिकेश पवार, राज्य सचिव, युवा प्रशिक्षणार्थी संघटना

## तळोजातून कोट्यवधींचा गुटखा जप्त

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

शासनाने प्रतिबंधित केलेल्या सुगंधी पानमसाला आणि गुटख्याची बेकायदेशीर वाहतूक व साठवणूक करणाऱ्या मोठ्या आंतरराज्य रॅकेटचा नवी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. तळोजा येथे करण्यात आलेल्या या कारवाईत पोलिसांनी सुमारे ६५ लाख रुपये किंमतीचा सुगंधी पानमसाला, गुटख्याचा साठा आणि ४० लाख रुपये किंमतीची ३ वाहने असा तब्बल १ कोटी ५ लाख ६३ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

तळोजा येथील धरणा गाव येथे शासनाने प्रतिबंधित केलेल्या पानमसाला आणि गुटख्याचा मोठा साठा नवी मुंबई आणि मुंबई परिसरात वितरीत करण्यासाठी आणण्यात आल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाली होती. या माहितीच्या आधारे गुन्हे शाखा युनिट १च्या पथकाने दि.१० जुलै रोजी सकाळी तळोजा येथील धरणा गाव येथील नाटली कंपाऊंडमध्ये छापा टाकला. यावेळी या ठिकाणी मोठ्या आयशर टेम्पोसह २ मारुती सुझुकी सुपर कॅरी टेम्पोमध्ये गुटख्याचा साठा भरण्याचे काम सुरु असल्याचे निदर्शनास आले. यावेळी पोलिसांनी त्या ठिकाणावरुन महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला ४८ लाख ६० हजार रुपये किंमतीचा प्रिमीयम राजनिवास सुगंधित पान मसाला आणि प्रिमीअम झेड एन-१ जाफराणी जर्दा, तसेच २० लाख रुपये किंमतीचा आयशर प्रो टेम्पो आणि पान २ वर

### किराणा दुकानावर कारवाई



**रसायनी :** भोकरपाडा येथील एका किराणा दुकानावर धाड टाकून पोलिसांनी तब्बल ८८ हजार ९६८ रुपये किमतीचा केशरयुक्त विमल पान मसाला आणि गुटखा जप्त केला आहे. याप्रकरणी दोघांविरुद्ध रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एलसीबीचे सहाय्यक फौजदार संदीप पाटील यांना भोकरपाडा येथील एका किराणा दुकानात प्रतिबंधित गुटखा साठवल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. याआधारे, स्थानिक गुन्हे पान २ वर

**तीन महिन्यांनी स्थायी समितीची मंजुरी । तब्बल १८९ कोटींची वाढ**

## पालिकेचा ५ हजार कोटींचा अर्थसंकल्प

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिका आयुक्तांनी दि.३० मार्च रोजी सादर केलेल्या सन २०२६-२७ च्या ४ हजार ८४३ कोटी १० लाख ९७ हजार रुपयांच्या मूळ अर्थसंकल्पाला अखेर तीन महिन्यांनंतर स्थायी समितीची मंजुरी मिळाली आहे. समिती सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्ती आणि वाढीव तरतुदींना मान्यता देत अर्थसंकल्पाच्या जमा व खर्च या दोन्ही बाजूंमध्ये १८९ कोटी रुपयांची वाढ करण्यात आली असून, २०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पाने प्रथमच ५ हजार कोटी रुपयांचा टप्पा पार केला आहे. यावेळी ५,०४२ कोटी १० लाख ९७ हजार कोटींच्या सुधारित अर्थसंकल्पाला स्थायी समितीने मंजुरी दिली आहे.



स्थायी समितीचे सभापती बबन मुकादम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत अर्थसंकल्पावर सविस्तर चर्चा करण्यात आली. पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी मार्च महिन्यात ४,८५३ कोटी ९० लाख ७७ हजार रुपयांचे मूळ अंदाजपत्रक स्थायी समितीसमोर सादर केले होते. त्यानंतर स्थायी समिती सदस्यांनी विविध विभागांच्या तरतुदींचा सविस्तर आढावा घेत अनेक सुधारणा व वाढीव निधीच्या सूचना केल्या. त्यानंतर नगरसेवक निधी, नदी संवर्धन, प्रतिकात्मक वास्तू उभारणी तसेच १५ व्या वित्त आयोगाच्या अनुदानासह विविध विकासकामांसाठीच्या तरतुदींमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी नगरसेवक निधीसाठी आयुक्तांनी केलेली ८ कोटी रुपयांची तरतूद वाढवून २२ कोटी करण्यात आली आहे. त्यामुळे प्रत्येक नगरसेवकाला उपलब्ध होणारा विकासनिधी सुमारे २५ लाख रुपयांपर्यंत जाण्याची पान २ वर

### अर्थसंकल्पातील प्रमुख वाढ

- **नगरसेवक निधी : ८ कोटी वरून २२ कोटी**
- **नदी संवर्धन व सुशोभिकरण : ८० लाख वरून १०.८० कोटी**
- **प्रतिकात्मक वास्तू उभारणी : नवीन तरतूद २५ कोटी**
- **१५वा वित्त आयोग अनुदान : ३० कोटी वरून १७० कोटी**
- **१ टक्का मुद्रांक शुल्क अनुदान : ३० कोटी वरून ४४ कोटी**
- **जीएसटी अनुदान : ४८७.१४ कोटी वरून ५२२.१४ कोटी**
- **एकूण अर्थसंकल्प : ४,८४३.१० कोटी वरून ५,०४२.१० कोटी**

## पाणीपुरवठा योजनेचे उद्घाटन



**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

शेकापचे रायगड जिल्हा चिटणीस सुरेश खैरे यांच्या स्वनिधीतून साकार झालेल्या नळ पाणीपुरवठा योजनेचे रविवारी (दि.१२) ग्रामस्थांच्या उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले. या योजनेमुळे पायरीचीवाडीतील नागरिकांना शुद्ध आणि नियमित पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. अनेक वर्षांपासून पाण्याच्या समस्येने त्रस्त असलेल्या ग्रामस्थांसाठी हा दिलासा देणारा निर्णय ठरला आहे. त्यामुळे ग्रामविकासाच्या दिशेने हे एक मोठे पाऊल मानले जात आहे. या उद्घाटनाप्रसंगी सुरेश खैरे यांच्यासह सतीश खाडे, अरुण खाडे, दत्ता खाडे, रामचंद्र शिलकर, नामदेव शिर्के, कृष्णा जाधव, श्रीपत जाधव, किसन खाडे, महिला मंडळ व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पान २ वर

# नागरिकांच्या मदतीला धावले ‘श्री’ बल्लाळेश्वर

**| सुधागड-पाली | प्रतिनिधी |**

पाली नदीला आलेल्या भीषण पुरामुळे संपूर्ण जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले. पुराच्या पाण्यामुळे शहराला जोडणारे तीनही बाजूंचे प्रमुख रस्ते बंद झाल्याने सोमवारी (दि.६) शेकडो प्रवासी, नागरिक भाविक व वाहन चालक पाली येथे मध्यभागी अडकून पडले. या सर्वांना श्री बल्लाळेश्वर देवस्थान तर्फे मोफत भोजन आणि नगरपंचायत तर्फे अल्पोपहार देण्यात आला. त्यामुळे पुरग्रस्तांच्या मदतीला ‘श्री’ धावून आल्याची भावना येथील नागरिकांमधून व्यक्त होत आहे.



अचानक उद्भवलेल्या या संकटामुळे प्रवाशांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. या आपत्कालीन परिस्थितीची तात्काळ दखल घेत पाली नगराध्यक्ष पराग मेहता, उपनगराध्यक्ष सुलतान बेनसेकर, नगरसेवक गणेश सावंत, सुधीर भालेराव यांनी श्री बल्लाळेश्वर देवस्थान अध्यक्ष जितेंद्र गद्रे व देवस्थान प्रशासनाला सहकार्याची विनंती केली. त्यांच्या आवाहनाला तातडीने प्रतिसाद देत श्री बल्लाळेश्वर देवस्थानच्या अन्न छत्रालयामार्फत अडकून पडलेल्या सर्व नागरिकांना दुपारच्या मोफत भोजनाची दर्जेदार व्यवस्था करण्यात आली.

देवस्थानच्या या तत्परतेमुळे शेकडो प्रवाशांची भुकेची समस्या दूर झाली. दुसऱ्या बाजूला, अडकलेल्या प्रवाशांना तात्कालिक दिलासा देण्यासाठी नगराध्यक्ष पराग मेहता आणि उपनगराध्यक्ष सुलतान बेनसेकर, नगरसेवक सुधीर भालेराव, नगरसेवक गणेश सावंत यांनी स्वतः प्रत्यक्ष जागेवर जात सर्वांना चहा आणि बिस्किटांचे वाटप केले. यावेळी सर्व नागरिकांची आस्थेने विचारपूस करण्यात आली, काळजी घेतली गेली. संकटकाळात प्रशासनाने दाखवलेल्या या संवेदनशीलतेमुळे अडकलेल्या नागरिकांना मोठा आधार मिळाला. यावेळी पोलीस निरीक्षक हेमलता शेरकर या देखील उपस्थित होत्या. या अत्यंत कठीण आणि आपत्कालीन परिस्थितीत यंत्रणेसारखे धावून येत मोलाचे सहकार्य करणाऱ्या सर्व संबंधित यंत्रणा, बल्लाळेश्वर देवस्थान आणि संकटसमयी मदतीचा हात पुढे करणाऱ्या सर्व दानशूर व्यक्तींचे व कार्यकर्त्यांचे प्रशासनाच्यावतीने आभार मानण्यात आले आहे.

# श्रीवर्धन तालुक्यात प्राथमिक शिक्षणाची परवड

**| श्रीवर्धन शहर | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शिक्षण खात्याकडून प्राप्त माहितीनुसार तालुक्यात जिल्हा परिषदेच्या एकूण८६ प्राथमिक शाळा आहेत. त्यातील २० शाळा इयत्ता सातवी पर्यंतच्या आहेत. तसेच, या सर्व शाळा मिळून विद्यार्थी संख्या सुमारे २,३०० इतकी आहे. असे असले तरी नियमित गट शिक्षणाधिकारी पद हे चक्क ०९ वर्षांपासून रिक्त आहे. त्यामुळे श्रीवर्ध तालुक्यात शिक्षणाची परवड होत असून, कोणाकडे तरी प्रभारी गट शिक्षणाधिकारी पदाचा कार्यभार सोपविला जातो. तालुक्यातील शिक्षक संख्येचा विचार केला तर तालुक्यासाठी मंजूर शिक्षक संख्या २३२ असतांनादेखील सध्या १६३ शिक्षकच कार्यरत आहेत. तसेच, तालुक्यात केंद्र प्रमुखाची १० पदे रिक्त असून, विस्तार अधिकाऱ्यांचीही २ पदे रिक्त आहेत. त्यामुळे श्रीवर्धन तालुक्यातील एकूण विद्यार्थी संख्येचा विचार करता ती अपेक्षेपेक्षा बरीच कमी असल्याचे दिसत आहे. पालकांचे स्थलांतर व स्वयंरोजगार नसणे ही त्याची कारणे असल्याचे समोर येत आहे. तालुक्यातील काही शाळांत तर २-३ विद्यार्थी व एक शिक्षक अशी परिस्थिती असल्याचे अनधिकृतपणे समोर येत आहे. येथील सर्व प्राथमिक शाळांमध्ये दिघी मराठी, कुडगाव मराठी,वडवली मराठी व भरडखोल या पदोन्नती मुख्याध्यापकपात्र शाळा आहेत. शिक्षकांना अध्यापनाव्यतिरिक्त जनगणनेची कामे व बी.एल. ओ. म्हणूनही कामे करावी लागतात. एकूणच पाहता केंद्र प्रमुख, विस्तार अधिकारी, शिक्षक यांच्या रिक्त जागा, नऊ वर्षे नियमित गट शिक्षणाधिकारी नसणे, कमी विद्यार्थी संख्या या सर्वांचा विचार करता तालुक्यात जि.प. शाळांमधील प्राथमिक शिक्षणाची परवडच आहे, असे खेदाने म्हणावे लागत आहे.

# ‘लोकप्रतिनिधींनी विकासकामांकडे लक्ष केंद्रित करावे’

**| माथेरान | प्रतिनिधी |**

लोकप्रतिनिधींकडून अनेक महत्वपूर्ण कामे पूर्ण होतील, असा जनतेला ठाम विश्वास असल्याने मतदारांनी निवडणूक काळात मतदान प्रक्रियेतुन शिवसेना भाजप युतीच्या पारड्यात एकहाती सत्ता टाकली आहे. परंतु, हे सत्ताधारी पाच वर्षात गावाची महत्वपूर्ण विकास कामे पूर्ण करतील की नाही? याबाबत नागरिकांमधून आता अनिश्चितता व्यक्त केली जात आहे.

सद्यस्थितीत खऱ्या पावसाला सुरूवात होऊन १० दिवस उलटून गेले तरीसुद्धा रस्त्यांची डागडुजी किंवा गटारांची पूर्णपणे साफसफाई झालेली दिसत नाही. सलग चार ते पाच दिवस मुसळधार पाऊस पडत असून, अनेक ठिकाणी झाडे मुळासहित उन्मळून पडत आहेत. त्यातच वीज गायब झाली असून, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होऊ शकत नाही. अशा परिस्थितीत सत्ताधारी गटाच्या लोकप्रतिनिधींनी आपत्कालीन व्यवस्था म्हणून गावातील नागरिक कसे जीवन जगत आहेत, याबाबत पाहणी दौरा सुद्धा केलेला नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. निवडणूक काळात प्रत्येकाचे उंबरठे झिजवणारे लोकप्रतिनिधी सत्ताधारी गटाचे आता ढुंकूनही पहात नाहीत, याबाबत नागरिकांना नवल वाटत आहे. तांबड्या मातीच्या रस्त्याच्या सुरक्षेसाठी अद्यापही बहुतांश ठिकाणी पावसाळी पाण्याचा निचरा होण्यासाठी बंधारे टाकण्यात आलेले नसल्याने पावसाळी पाणी रस्त्यावरून वाहत असून, रस्त्यांचे नाल्यात रूपांतर झालेले दिसत आहे.

महात्मा गांधी हा मुख्य रस्ता वखारी नाक्यापासून ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याच्या पुढील भागापर्यंत रस्त्याला बंधारे नसल्याने रस्त्यांची खूपच वाताहत झालेली दिसत आहे. याच रस्त्यावरून शालेय विद्यार्थ्यांना ई-रिक्षांमधून ने-आण केली जाते. परंतु, रिक्षा चालविताना चालकांना एकप्रकारे तारेवरची कसरत करावी लागत असून, यदाकदाचित अपघात घडल्यास त्याला सर्वस्वी जबाबदार कोण? असाही प्रश्न यानिमित्ताने उपस्थित केला जात आहे. मुळातच ई-रिक्षाच्या विरोधात काही अल्प नागरिक असून, ई-रिक्षाला प्रखर विरोध करणारी मंडळीच प्रामुख्याने या ई-रिक्षाच्या सेवेचा लाभ घेण्यासाठी अग्रेसर दिसत आहेत. या गावात उत्तम दर्जाचे रस्ते होणे गरजेचे असून त्यास मा. सुप्रीम कोर्टाने क्ले पेव्हर ब्लॉकचे रस्ते बनविण्यासाठी मान्यता दिली असून, अद्यापही युद्धपातळीवर कामे सुरू केली जात नाहीत. आजवर येथील राजकीय इतिहासात परिषदेच्या सभागृहात जो कोणी सत्ताधारी स्थानापन्न होतो तो नेहमीच गावाच्या विकासाला प्राधान्य देण्याऐवजी विकासाला विरोध करणाऱ्या मूठभर लोकांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी पुढाकार घेताना दिसून येत आहे. अशीच परिस्थिती कायम राहिली तर आगामी काळात विकासाच्या नावाने बोंबा मारण्याची वेळ आणि एकहाती सत्ता देऊन केलेली चूक ही स्थानिकांना पश्चात्ताप करण्याची वेळ निश्चितच येऊ शकते, असे जेष्ठ मंडळी बोलत आहेत.



# शालेय विद्यार्थ्यांना वह्या वाटप

**| सुतारवाडी | प्रतिनिधी |**

खा. सुनील तटकरे यांच्या ७१ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या दत्ताजीराव गणपत तटकरे माध्यमिक विद्यालय सुतारवाडी च्या गरीब गरजू विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आले. यावेळी येरळचे सरपंच सुरेश जाधव, राष्ट्रवादी कुडली विभागीय अध्यक्ष विजय कामथेकर, तंटामुक्त अध्यक्ष संजय मुंबरे, ज्येष्ठ कार्यकर्ते चिंतामण दळवी, सूर्यकांत दळवी, सदस्य विनिता महाडिक., लेखनिक विजय महाडिक, कार्यकर्ते नथुराम पवार, विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीराम काळे, ज्येष्ठ शिक्षक शिवाजीराव मोटे, तसेच सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत वह्या वाटप करण्यात आल्या. यावेळी कुडली विभागातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांना एकूण २४०० वह्या वाटप करण्यात आल्या.

# लग्न मोडल्या प्रकरणी पाच जणांविरोधात गुन्हा

**नवीन पनवेल :** खारघर येथील २४ वर्षीय तरुणाला सांगोला-सोलापूर येथे लग्नाचे आमिष दाखवले आणि लग्नासाठी १ लाख ३९ हजार रुपये खर्च करायला लावले. मात्र, त्याच्याकडून घेतलेले साहित्य त्याला परत केले नाही. त्याच्यासोबतचे लग्न मोडून शिवीगाळ करत कुटुंबाची बदनामी करून मारहाण केली. त्यामुळे फसवणूक केल्याप्रकरणी पाच जणांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.


**जाहीर सुचना**

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. शेख सज्जाद अहमद रफियोदिन रा. मुंबई यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे कडाव, ता कर्जत जि. रायगड येथील मिळकत**

वरील शेतजमीन मिळकत सर्व्हे नं १२७/४ एकुण ०.१३.८६ गुंठे क्षेत्र, सर्व्हे नं. १३०/१ एकूण ०.०५.३० गुंठे क्षेत्र, सर्व्हे नं. १३०/२, एकूण ०.११.९० गुंठे क्षेत्र विकत घेणार आहेत. तरी शेतजमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.
दिनांक १३/०७/२०२६

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८


पान १ वरून

## बारा दिवसांत दोन पर्यटकांचा मृत्यू

पणामुळे अपघात देखील होतात. त्यामुळे नेरळचे प्रभारी अधिकारी राहुल वरोटे यांनी सर्व धबधब्यांवर शनिवार-रविवारी आणि सुट्टीच्या दिवशी पोलीस बंदोबस्त ठेवला आहे. त्याचवेळी दोन पोलीस हे दुचाकीवरून पहारा ठेवत आहेत. मात्र, दिवसभर सुरू असलेली वाहतूक कोंडी सोडवण्याची मोठी जबाबदारी देखील नेरळ पोलिसांच्यावर होती. याचदरम्यान, नेरळमधील दोन धबधब्यांवर वर्षासहलीसाठी आलेल्या पर्यटकांचे बळी गेले आहेत. त्यातील वांगणीतील बेडीस गावाजवळील भागीरथी धबधबा परिसरात एक युवक पाण्यात बुडाला होता. बदलापूर येथील सह्याद्री रेस्क्यू टीम कडून मदतकार्य सुरू होते. मात्र, सततचा मुसळधार पाऊस, पाण्याचा प्रचंड प्रवाह आणि प्रतिकूल हवामानामुळे सर्वतोपरी प्रयत्न करूनही शोधकार्य यशस्वी होऊ शकले नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर पुन्हा शोधमोहीम सुरू करण्यात आली. बदलापूर येथून स्पीड बोट मागवून तिच्या साहाय्याने शोधकार्य अधिक व्यापक पद्धतीने राबविण्यात आले. सायंकाळी सुमारे साडेचार वाजता स्पीड बोटीच्या मदतीने शोधकार्य सुरू झाले आणि सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास पाण्यात बुडालेल्या युवकाचा मृतदेह शोधण्यात रेस्क्यू पथकाला यश आले. पाण्यात बुडालेली तरुणाचे नाव ओमप्रकाश शाहू असे होते. याचवेळी नेरळ जवळील टपाल वाडी येथे एका तरुणाचा धबधब्याच्या मध्यवर्ती ठिकाणी गेल्याने बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

## वर्ष उलटूनही भरपाई लाल फितीत

माहिती उपलब्ध झाली आहे. त्याचा फटका नुकसान ग्रस्तांना बसला आहे. त्यामुळे भरपाई मिळावी, म्हणून तहसील कार्यालयात जाऊन चपला झिजविल्या जात आहेत. मात्र, अजूनपर्यंत नुकसानग्रस्तांची झोळी रिकामीच असल्याचे चित्र दिसून येत आहे.

## ठेकेदार, अधिकाऱ्यांवर कारवाईचा बडगा

जितके दिवस काम उशीर होईल, त्या स्वरूपात दंड आकारला जाईल. कोणत्याही परिस्थितीत योजना पूर्ण कराव्या लागतील. असे कारवाईचे स्पष्ट संकेत देऊनही ‘‘येरे माझ्या मागल्या’’ अशी परिस्थिती रायगड जिल्ह्यातील जल जीवन योजनांची आहे. काही कंत्राटदारांनी जुन्याच टाक्यांना आणि योजनांना रंगरंगोटी करून नव्याने बिले मागितली आहेत. काही ठिकाणी तर पाणी उपलब्ध नसतानाही जास्त क्षमतेच्या योजना मंजूर करून घेतल्या गेल्या आहेत. २०२४ च्या अखेरीस प्रत्येक घरात नळाद्वारे पाणी देण्याचे उद्दिष्ट होते; परंतु, योजना अपूर्ण राहिल्याने अनेक गावांत पाण्याचा थेंबही नाही. त्यामुळे ९६ टक्के काम झाल्याचा दावा केला जात असला तरी वस्तुस्थिती वेगळी आहे.

राज्याचे पावसाळी अधिवेशन सुरु असताना जल जीवन योजनांचे बारा वाजल्याचे चित्र सभागृहात मांडण्यात आले. आमदार सतेज पाटील यांच्यासह अनिल परब, प्रवीण दरेकर आणि बच्चू कडू यांनी विविध भागांतील पाणीपुरवठ्याच्या समस्यांकडे सरकारचे लक्ष वेधले. सतेज पाटील यांनी रायगडसह विविध जिल्ह्यांतील जलजीवन मिशनची रखडलेली कामे सभागृहात मांडली. काही ठिकाणी केवळ १५ टक्के काम पूर्ण झाले असून कामे पुढे सरकत नाहीत. या प्रश्नाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष झाल्याने स्थानिक नागरिकांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागत असल्याचे सांगितले. जलजीवन मिशनची कामे गुणवत्तापूर्ण आणि वेळेत पूर्ण करण्यावर भर देत, अपूर्ण कामांमुळे नागरिकांना होणारा त्रास दूर करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याची आवश्यकता व्यक्त केली. अनेक ठिकाणी कामे अपूर्ण ठेवून पूर्ण बिले काढल्याचा आरोप करत अशा कंत्राटदारांवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली.

यावेळी राज्यमंत्री मेघना बोर्डिकर यांनी संबंधित दोषी कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले आहे. तसेच, राज्यभरात १८ हजार सुधारित प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली आहे. जलजीवन मिशनची मुदत डिसेंबर २०२७ पर्यंत वाढविण्यात आली असल्याची माहिती देखील त्यांनी दिली. दरम्यान, राज्यमंत्र्यांनी कारवाईचा बडगा उगारणार असल्याचे जाहीर केल्याने कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांच्या पायाखालची जमीन सरकली आहे.

## वेश्या व्यवसायातून महिलांची सुटका

इशारावरून पोलिसांच्या पथकाने संबंधित लॉजवर छापा टाकला. यावेळी छाप्यामध्ये दोन बांगलादेशी महिलांसहित सहा पिडीत महिला वेश्यागमन करण्यासाठी ठेवलेल्या मिळून आल्या. तसेच, लॉज मॅनेजर गामा नंदू सोनकर, कॅशियर दिपू उमेश यादव, वेटर प्रियांशू रविदास यादव आणि लॉज मालक रमेश शर्मा यांच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## तळोजातून कोट्यवधींचा गुटखा जप्त

प्रत्येकी १० लाख रुपये किंमतीचे २ मारुती सुझुकी सुपर कॅरी टेम्पो जप्त केले. तसेच, करण राम साळुंखे, दर्शन उर्फ जग्गू ओमप्रकाश कुमार आणि विनोदकुमार प्रभुराम प्रजापती या तिघांना अटक केली. त्यानंतर पोलिसांनी तिघांची कसून चौकशी केली असता, करण साळुंखे याने तळोजा घोट कॅम्प येथील निलकमल रेसीडेन्सीतील गाळ्यामध्ये गुटख्याचा साठा लपवून ठेवल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी गाळा नं-२ मधून तब्बल १६ लाख रुपये किंमतीचा महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुगंधी पानमसाला आणि गुटख्याचा साठा जप्त केला. अशा प्रकारे गुन्हे शाखेने या कारवाईत एकूण १ कोटी ५ लाख ६३ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात ७ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून, ४ फरार आरोपींचा पोलिसांकडून शोध घेण्यात येत आहे.

## किराणा दुकानातून गुटखा जप्त

अन्वेषण विभागाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मानसिंग पाटील यांच्या पथकाने या दुकानावर छापा टाकला. तपासणीदरम्यान, दुकानात शासनाने बंदी घातलेला केशरयुक्त विमल पान मसाला आणि गुटखा विक्रीसाठी ठेवल्याचे आढळून आले. पोलिसांनी तत्काळ ८८ हजार ९६८ रुपये किमतीचा सर्व साठा जप्त केला. या प्रकरणी दुकानाचे मालक नितेश ज्ञानेश्वर पाटील (३०) आणि गुटखा पुरवठादार दिनेश मकीजा (रा. बदलापूर) यांच्याविरुद्ध रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पाणीपुरवठा योजनेचे उद्घाटन

सुरेश खैरे यांनी, गावाच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव प्रयत्नशील राहण्याचा निर्धार व्यक्त केला. जनतेच्या सेवेसाठी सदैव कटिबद्ध या भावनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे ग्रामस्थांनी मनापासून स्वागत केले आणि सुरेश खैरे यांचे आभार मानले.

## अलिबाग एसटी स्टँडसमोर मृतदेह

प्रमाणात माशा बसल्याचे दिसून आले. त्यानंतर संबंधित व्यक्तीचा मृत्यू झाल्याचे लक्षात येताच त्यांनी तातडीने पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि पंचनामा व इतर कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली. मात्र, एसटी स्थानकापासून अवघ्या काहीशे मीटर अंतरावर असलेल्या जिल्हा सरकारी रुग्णालयात मृतदेह हलविण्यासाठी साकाळी ६.३० ते ९.३० वाजेपर्यंत एकही ॲम्ब्युलन्स उपलब्ध झाली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. सरकारी रुग्णालयाबाहेर अनेक खासगी ॲम्ब्युलन्स उभ्या असतात. मात्र, घटनेच्या वेळी त्या उपलब्ध नव्हत्या. काही चालक बाहेरगावी गेल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे मृतदेह हलविण्यास मोठा विलंब झाला आणि प्रशासनाच्या आपत्कालीन सेवांतील नियोजनाचा अभाव समोर आला आहे. यावेळी उपस्थित असलेल्या नगरसेविका ॲड. अश्विनी ठोसर यांनीही या प्रकाराबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. या घटनेमुळे अलिबाग शहरातील आपत्कालीन आरोग्य सेवा आणि प्रशासनाच्या कार्यक्षमतेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले असून, याप्रकरणी चौकशी करून आवश्यक सुधारणा करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## युवा प्रशिक्षणार्थी आक्रमतेच्या भूमिकेत

येणाऱ्या पुढील काळात वणवा पेटणार... मायबाप सरकारने तातडीने प्रशिक्षित बेरोजगार प्रशिक्षणार्थींना शासकीय कंत्राटी पद्धतीने रोजगार आणि १० टक्के आरक्षण शासकीय भरतीत द्यावे’’, अशी मागणी प्रांताध्यक्ष निलेश वसावे, राज्य सचिव ऋषिकेश पवार, कार्याध्यक्ष पवन भड, राज्य सदस्य सबेरा तडवी, जळगाव महिलाध्यक्ष हर्षली साळुंखे, वर्धा प्रतिनिधी स्वप्नील तांबेकर व सर्व ३६ जिल्हा प्रतिनिधी यांच्याकडून करण्यात आली. त्यामुळे सरकारने युवकांच्या धोरणात्मक निर्णयाकडे लक्ष द्यावे, अन्यथा राज्यातील सर्व जिल्ह्यात थोर महापुरुषांच्या स्मारका समोर सरकारचा निषेध करण्यात येईल, असा इशारा देखील त्यांच्याकडून देण्यात आला.

रायगड जिल्ह्यातील १ हजार ६०० युवांचा समावेश आहे. १८ ते ३५ वयोगटातील युवा, युवतींची जिल्ह्यातील ग्रामपंचायत, आरोग्य केंद्र, उपकेंद्रांमध्ये डाटा ऑपरेटर म्हणून मानधनावर त्यांची नियुक्ती करण्यात आली. ऑनलाईन काम करण्यापेक्षा ऑफलाईन काम देऊन या तरुणांना राबविण्याचे काम वेगवेगळ्या विभागातून करण्यात आले. प्राथमिक आरोग्य केंद्रात बाह्य रुग्ण कक्षातील रुग्णांची तपासणी करणे, ग्रामपंचायतीमधील घरपट्टी, पाणीपट्टी तसेच इतर कामेदेखील करून घेण्यात आली. मागील चार वर्षांची प्रलंबित कामे युवांकडून करून घेतली. निवडणुकीपूर्वी ही योजना राबविली होती. आता मात्र या योजनेचा कारभार नव्याचे नऊ दिवस या उक्तीप्रमाणे सुरू असल्याचे चित्र आहे. त्यामुळे युवा वर्गात सरकारच्या भूमिकेबाबत तीव्र नाराजी आहे, असे आंदोलकांनी सांगितले.

## पालिकेचा ५ हजार कोटींचा अर्थसंकल्प

शक्यता आहे. नदी संवर्धन व सुशोभिकरणासाठीची तरतूद ८० लाखांवरून १० कोटी ८० लाख करण्यात आली असून, प्रतिकात्मक वास्तू उभारणी या नव्या लेखाशीर्षाखाली २५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच, १५ व्या वित्त आयोगाच्या अनुदानाची तरतूद ३० कोटींवरून थेट १७० कोटी रुपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे. खर्चातील वाढ लक्षात घेऊन उत्पन्नाच्या बाजूलाही वाढ करण्यात आली आहे. एक टक्का मुद्रांक शुल्क अनुदान ३० कोटींवरून ४४ कोटी, जीएसटी अनुदान ४८७.१४ कोटींवरून ५२२.१४ कोटी, तर १५ व्या वित्त आयोगाचे अनुदान ३० कोटींवरून १७० कोटी करण्यात आले आहे. तीन महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर अखेर स्थायी समितीची मंजुरी मिळाल्याने पालिकेच्या विविध विकासकामांना आता गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.


**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक श्री किरण चंपालाल जैन व अधिक अरविंद जैन व इतर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :- मौजे मोठे वेणगाव तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत १) सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर २८/३/ब क्षेत्र ०.३४.६० हे. आर. पॉ. आकार ५.६८ रु. पै. (२) मौजे धाकटे वेणगाव तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर ४३/२/ ब एकुण क्षेत्र ०.१८.२० हे. आर. आकार ३.०६ रु. पै. (३) मौजे धाकटे वेणगाव तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर ४४/१/ब क्षेत्र ०.१८.०० हे. आर. पॉ. आकार २. ९४ रू. पै.या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध बयानापावती खरेदीखत, साठेकरार. गढाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक १३/०७/२०२६

**वकील ॲड. वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०९४६८५४
पत्ता- दहिवली तर्फे नीड तालुका कर्जत
जिल्हा रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड. निलेश कान्हू मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
पत्ता- दहिवली तर्फे नीड तालुका कर्जत
जिल्हा रायगड ४१०२०१



**जाहीर नोटीस**

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे बामणगाव ता.अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जिरायत जमिन मिळकत ही कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून व त्या आशयाची बोलणी होऊन संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व कब्जेदार श्री. अक्षय सुधाकर भालेराव, सलिल सुधाकर भालेराव आणि शशांक सुधाकर भालेराव यांच्यासोबत बयाना पावती स्वाक्षरीत झालेला आहे.

संदर्भित मिळकत ही पूर्णत:निर्वेध, बोजाविरहीत व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालक व कब्जेदाराने माझ्या अशिलांना दिला आहे. या उपरही सदर मिळकतीत अन्य कोणाच्याही, कसल्याही तऱ्हेचे हक्क, अधिकार व हितसंबंध असल्यास तसेच गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वहिवाटहक्क, फरोक्तखत असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या कालावधीत लेखी पुराव्यानिशी आमची खात्री पटवून द्यावी.

विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल निम्नलिखित मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. | उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
| --- | --- | --- | --- | --- |
| बामणगाव ता.अलिबाग जि.रायगड | ४५२ | २ | ०-४९-४० पो.ख.०-०४-०० एकूण ०-५३-४० | १४.६५ |

सदर वर नमूद मिळकतीपैकी वरील मालक व कब्जेदार यांच्या हिश्याची ०-१७-०० हे.आर.जमीन मिळकत ही या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १३-०७-२०२६

**ॲड. सुधाकर पी. प्रभू**
‘साईलिला’ सी.एच.एस.,
‘ए विंग’, रुम नं.१०३, चेंढरे,
ता.अलिबाग, रायगड
मोबाईल नं.९८२२७९६८३०



**जाहीर सुचना**

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. शशिकांत तुकाराम भोईर रा. पनवेल यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे कडाव, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील शेतजमीन मिळकत सर्व्हे नं १२०/४/अ एकुण ०.१५.४० गुंठे क्षेत्र, विकत घेणार आहेत. तरी शेतजमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.
दिनांक १३/०७/२०२६

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचसोबत सुरू आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे शिलारवाडी, ता. कर्जत, जि. रायगड**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र.आर.पॉ | आकारणी रु.पै |
| --- | --- | --- |
| ४९/७ | एकूण क्षेत्र ०-२३-०० हे.आर. | ०.१९ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : १३/०७/२०२६

**ॲड.रोहित रो.मानकवळे**
मो.नं ९०२८८१७९३०
पत्ता- हाऊस नं. १४१- बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो कामार्ली, ता.पेण, जि. रायगड पिन नं.४०२१०७



**जाहीर नोटीस**

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे बामणगाव ता.अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जिरायत जमिन मिळकत ही कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून व त्या आशयाची बोलणी होऊन संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व कब्जेदार श्री. अक्षय सुधाकर भालेराव, सलिल सुधाकर भालेराव आणि शशांक सुधाकर भालेराव यांच्यासोबत बयाना पावती स्वाक्षरीत झालेला आहे.

संदर्भित मिळकत ही पूर्णत:निर्वेध, बोजाविरहीत व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालक व कब्जेदाराने माझ्या अशिलांना दिला आहे. या उपरही सदर मिळकतीत अन्य कोणाच्याही, कसल्याही तऱ्हेचे हक्क, अधिकार व हितसंबंध असल्यास तसेच गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वहिवाटहक्क, फरोक्तखत असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या कालावधीत लेखी पुराव्यानिशी आमची खात्री पटवून द्यावी.

विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल निम्नलिखित मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. | उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
| --- | --- | --- | --- | --- |
| बामणगाव ता.अलिबाग जि.रायगड | २९ | -- | ०-२४-१० पो.ख.०-०१-३० एकूण ०-२५-४० | ६.८७ |
| बामणगाव ता.अलिबाग जि.रायगड | ४६९ | -- | १-४६-९० पो.ख.०-१२-९० एकूण १-५९-८० | ४३.४४ |


ठिकाण : अलिबाग
दिनांक : १३-०७-२०२६


**ॲड. सुधाकर पी. प्रभू**
‘साईलिला’ सी.एच.एस.,
‘ए विंग’, रुम नं.१०३, चेंढरे,
ता.अलिबाग, रायगड
मोबाईल नं.९८२२७९६८३०

# निवडक

## पाण्यात भिजण्यासाठी पर्यटक आतुर

**तळा :** मुसळधार पावसामुळे तालुक्यातील वावे धबधबा ओसंडून वाहू लागला आहे. धबधब्यातील फेसाळयुक्त पाण्यात भिजण्यासाठी पर्यटक आतुर झाले आहेत. तळा तालुका डोंगराळ निसर्ग सौंदर्याने नटलेला असल्याने पावसाळी धबधबे पर्यटकांना आकर्षित करत असतात. मुंबई-गोवा महामार्गावर इंदापूरपासून पश्चिमेला तळा शहराकडे येताना १२ की. मी. ला डाव्या बाजूला वावे धबधबा लागतो. यावर्षी पावसाचे आगमन उशिरा झाले असले तरी पावसाने तळा तालुक्याला झोडपले आहे. त्यामुळे तालुक्यातील नदया, तलाव, विहिरी तसेच धबधबे तुडुंब भरून वाहत आसून वावे येथील फेसाळयुक्त पाण्याचा धबधबा पर्यटकांना खुणावू लागला आहे. जोरदार पावसामुळे वावे धबधबा पांढऱ्या शुभ्र फेसाळयुक्त रंगात धो-धो वाहत आहे. धबधब्याच्या आजूबाजूला हिरवेगार मनमोहक निसर्गाने हिरवी शाल पांघरलेली दृश्य पहायला मिळते. पक्ष्यांच्या वेगवेगळ्या स्वरांचा किलबिलाट, बहरलेली वृक्षवल्ली, धबधब्यातील पाण्याचा खळखळाट आवाजामुळे पर्यटक देहभान हरपून आनंद लुटतात. सुरक्षेच्या दृष्टीने धबधबा उत्तम असल्याने अनेक पर्यटक या धबधब्याला भेट देतात. अनेक पालक आपल्या मुलांना भिजण्याचा आनंद देण्यासाठी येत असतात. शनिवार, रविवारी सुट्टी असल्याने या ठिकाणी पर्यटकांची प्रचंड गर्दी पहावयास मिळत आहे.





## नेरळमध्ये आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा

**नेरळ :** नेरळ येथील धारप सभागृहात राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलांच्या माध्यमातून आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. तज्ज्ञ प्रशिक्षकांमार्फत आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला नागरिक, सामाजिक कार्यकर्ते तसेच महिला वर्गाने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आपत्ती व्यवस्थापनाचे मूलभूत ज्ञान प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहोचावे आणि संकटसमयी नागरिकांनी सक्षमपणे मदतकार्य करता यावे, हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले. या कार्यशाळेत सुरुवातीला अनुभवी प्रशिक्षक यांनी नैसर्गिक आपत्ती, पूर, भूकंप, भूस्खलन, गॅस गळती तसेच इतर आपत्कालीन परिस्थितींमध्ये स्वतःचे व इतरांचे प्राण कसे वाचवायचे, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. आपत्तीच्या वेळी डीआरएफ आणि इतर शासकीय मदत यंत्रणांना प्रभावी सहकार्य कसे करावे, कोणत्या परिस्थितीत कोणत्या विभागाशी संपर्क साधावा तसेच विविध आपत्कालीन हेल्पलाइन क्रमांकांची माहितीही देण्यात आली. प्रशिक्षणादरम्यान बचावासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध नसल्यास प्लास्टिकच्या बाटल्या व इतर दैनंदिन वस्तूंचा उपयोग करून तात्पुरती बचाव साधने कशी तयार करता येतात, याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. याशिवाय प्रथमोपचार आणि हृदयविकाराच्या आपत्कालीन परिस्थितीत जीव वाचविण्यासाठी आवश्यक असलेल्या सीपीआर तंत्राची माहिती देण्यात आली.

## नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची मदतीची मागणी

**माणगाव :** कोकणातील शेतकरी यंदा निसर्गाच्या दुहेरी संकटाने अक्षरशः कोलमडून गेला आहे. सुरुवातीला कडक उन्हामुळे पेरणी केलेली पिके करपून गेली. हातचे पीक वाचवण्यासाठी कर्ज काढून, पुन्हा बियाणे, खते आणि मशागतीवर खर्च करून शेतकऱ्यांनी दुबार पेरणी केली. मात्र निसर्गाने पुन्हा एकदा निर्दयी तडाखा दिला. गेल्या महिनाभरापासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक भागांत पुरस्थिती निर्माण झाली. शेतांमध्ये तब्बल आठ दिवस पाणी साचून राहिल्याने दुबार पेरणीही पूर्णपणे नष्ट झाली. एका हंगामात दोनदा झालेल्या या प्रचंड नुकसानीने शेतकऱ्यांचे आर्थिक कंबरडे मोडले असून त्यांच्या कुटुंबांसमोर उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न उभा राहिला आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना न्याय द्यावा आणि विशेष आर्थिक मदत जाहीर करावी, या मागणीसाठी कुणबी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई ग्रामीण यांच्या वतीने मंत्री आदिती तटकरे यांची भेट घेऊन अध्यक्ष विजय बक्कम आणि मार्गदर्शक शंकर उभारे यांनी मंडळाच्या वतीने सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. निवेदनाची गांभीर्याने दखल घेत मंत्री तटकरे यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेत संबंधित विभागाशी चर्चा करून तातडीने योग्य कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन दिले. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शासन सकारात्मक भूमिका घेईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. यावेळी कुणबी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई ग्रामीणचे पदाधिकारी उपस्थित होते.

# माथेरानमध्ये पर्यटकांची तुडूंब गर्दी

- घाटरस्त्यावर वाहनांच्या रांगाच रांगा
- कर संकलनाचे नियोजन बिघडले

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

पावसाळ्यात शनिवार आणि रविवार मोठ्या संख्येने पर्यटक येत असतात आणि त्यामुळे पर्यटन स्थळ पर्यटकांनी भरून गेले आहे. माथेरान शहरात रविवारी (दि.१२) जुलै रोजी हजारोंचे संख्येने पर्यटक आले असून पर्यटकांच्या गर्दीने माथेरान नगरपरिषदेचे स्वच्छताकर संकलनाचे नियोजन बिघडले आहे. त्यामुळे पर्यटकांचे हाल झाले, प्रवासीकर संकलन केंद्र आणि घाट रस्त्यातून प्रवास करताना होत असल्याने पर्यटकांची दमछाक होत आहे.

माथेरानमध्ये पावसाळ्यात सर्वाधिक पर्यटक येत असतात. पर्यटकांनी पावसाळा सुरू झाल्यापासून गर्दी केली आहे. मात्र, मागील चार दिवस पावसाने विश्रांती घेतल्याने पर्यटकांच्या आनंदावर विरजण पडले आहे. शनिवार प्रमाणे रविवारी हजारोंचे संख्येने पर्यटक माथेरानमध्ये दाखल झाले. सकाळपासून घाटरस्ता वाहनाच्या गर्दीने भरून वाहत होते. वाहनांची संख्या प्रचंड असल्याने घाटरस्ता अत्यंत मंदगतीने पुढे सरसावत आहे. पण वाहनाची गर्दी एवढी प्रचंड आहे की पर्यटकांची वाहने घाटरस्त्यातील वाहतूक कोंडीत फसत आहेत. दुसरीकडे वाहतूक कोंडीमुळेतून पुढे आलेल्या पर्यटक यांच्यामुळे माथेरानमधील प्रवेशद्वार गर्दीने फुलून गेले आहे. दस्तुरी नाका येथे पर्यटकांची गर्दी झाल्याने स्वच्छतकर संकलन कार्यालयाच्या बाहेर पर्यटकांमध्ये हाणामारी होण्याचे प्रसंग सकाळपासून घडत आहेत.

कर संकलन केल्याशिवाय कोणालाही शहरात प्रवेश दिला जात नसल्याने माथेरानचे प्रवेशव्दार गर्दीने फुलले आहे. त्याचा मोठा परिणाम तेथे वाहतील कोंडी होण्यास झाला आहे. प्रवासीकर घेण्यासाठी पर्यटकांच्या रांगा टॅक्सी स्टॅण्ड आणि दुसऱ्या बाजूला वाहनतळ या बाजूने देखील लावण्यात आली आहे. त्याचा थेट परिणाम वाहनतळाकडे जाणारी वाहने अडकून पडली.

वाहनतळ येथे एकावेळी किमान एक हजार गाड्या उभ्या राहण्याची व्यवस्था आहे. मात्र, वाहनतळ येथे जाण्यासाठी असलेले मार्ग पर्यटकांच्या गर्दीने फुलून गेले आहेत. त्यामुळे माथेरानच्या प्रवेशद्वार येथे पर्यटकांच्या रांगांमुळे गर्दी दिसून येत आहे.

पर्यटकांची तेथे देखील गर्दी आहे. तर माथेरान ते अमन लॉज अशी मिनी ट्रेनची शटल सेवा चालवली जात असून स्थानकात देखील प्रचंड संख्येने पर्यटक उभे आहेत. तर तरुण पर्यटक रस्ते मार्गाने माथेरान शहरात प्रवेश करीत असल्याचे चित्र आहे.






### ई-रिक्षा कमी पडल्या

शहरात जाण्यासाठी असलेल्या ई-रिक्षा स्टॅण्ड येथे देखील एकावेळी शेकडोचे संख्येने पर्यटक उभे राहिलेले दिसून येत आहेत. शहरात पर्यटकांचे सोयीसाठी केवळ २५ इ-रिक्षा असल्याने त्या ई-रिक्षा कमी पडत आहेत.

# स्मार्ट मीटरमुळे वीजग्राहक हैराण

### सर्व्हर डाऊनमुळे बिल भरण्यास अडथळा

**। महाड । प्रतिनिधी ।**

शहरात स्मार्ट वीजमीटर प्रणालीमुळे अनेक वीजग्राहकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याची चर्चा सोशल मीडियावरील व्हॉट्सप गटांमध्ये रंगली आहे. महावितरणचा सर्व्हर तांत्रिक कारणामुळे बंद असल्याने वीजबिलाचा भरणा होत नसल्याची तक्रार काही ग्राहकांनी केली आहे. त्यामुळे वीजपुरवठा खंडित झालेल्या ग्राहकांना बिल भरूनही तातडीने वीज सुरू करता येत नसल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

स्मार्ट मीटरमध्ये थकबाकी असल्यास वीजपुरवठा आपोआप बंद होतो आणि बिल भरल्यानंतर लगेचच वीज सुरू होते. मात्र, सर्व्हरच कार्यरत नसल्यास बिल स्वीकारले जात नसल्याने ग्राहकांनी काय करावे, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. जर महावितरणचा सर्व्हरच बंद असेल, तर ग्राहकांनी सर्व्हर सुरू होईपर्यंत अंधारात राहायचे का, पैसे भरूनही त्रास का सहन करायचा, असा संतप्त सवालही काही ग्राहकांनी उपस्थित केला आहे. याबाबत महावितरणच्या अधिकाऱ्यांकडून अधिकृत स्पष्टीकरण देण्याची मागणी करण्यात आली आहे.

महावितरणच्या स्थानिक अधिकाऱ्यांनी ७९७२८६८३४२ या क्रमांकावरील मांडवकर यांच्याशी संपर्क साधण्याचा सल्ला दिला असून, त्यांची टीम येऊन मीटर सुरू करून देईल असे सांगितल्याचा दावा करण्यात आला आहे.

मात्र, संबंधित क्रमांकावर संपर्क साधल्यानंतर, यावर कोणताही पर्याय नाही. स्थानिक कर्मचाऱ्यांशी संपर्क साधा, असे उत्तर मिळाल्याचेही ग्राहकांनी नमूद केले आहे. या संपूर्ण प्रकारामुळे स्मार्ट मीटर प्रणालीतील तांत्रिक अडचणींच्या काळात ग्राहकांसाठी पर्यायी यंत्रणा उपलब्ध आहे का, तसेच अशा परिस्थितीत महावितरणची अधिकृत कार्यपद्धती काय आहे, याबाबत महावितरणने स्पष्ट भूमिका जाहीर करण्याची मागणी वीजग्राहकांकडून केली जात आहे.

## विहिरीचा परिसर स्वच्छ

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

ग्रुप ग्रामपंचायत माजगाव हद्दीतील गावातील विहिरीच्या परिसरात मोठ्या प्रमाणात चिखल, गाळ व कचरा साचल्याने ग्रामस्थांच्या पिण्याच्या पाण्याचा स्रोत दूषित होण्याचा धोका निर्माण झाला होता. गढूळ पाण्यामुळे जलजन्य आजारांचा संभाव्य धोका ओळखून सामाजिक कार्यकर्ते मारुती ढवालकर यांनी तातडीने पुढाकार घेत जेसीबीच्या साहाय्याने विहिरीचा परिसर स्वच्छ करून नैसर्गिक पाण्याचा झरा पुन्हा सुरळीत केला. त्यामुळे ग्रामस्थांना स्वच्छ व पिण्यायोग्य पाणी उपलब्ध होण्यास मोठा दिलासा मिळाला आहे.

# निसर्गसौंदर्य अनुभवण्यासाठी पर्यटकांची लगबग



**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

पावसाच्या आगमनानंतर जिल्ह्यातील हिरवागार निसर्ग आणि ओसंडून वाहणारे धबधबे पर्यटकांना खुणावू लागले आहेत. त्यामुळे वर्षा सहलीचे वेध लागले असून शनिवार-रविवार तसेच सुट्टीच्या दिवशी पर्यटनस्थळांवर पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे. पावसाच्या सरींनी निसर्गाला नवचैतन्य लाभल्याने विविध निसर्गरम्य स्थळांवर पर्यटकांचा उत्साह ओसंडून वाहत आहे. धुक्याची चादर, हिरव्यागार दऱ्या, खळाळणारे धबधबे आणि गार वाऱ्याचा आनंद घेण्यासाठी कुटुंबीय, मित्रमंडळी तसेच तरुणाई मोठ्या प्रमाणात वर्षा सहलीचे नियोजन करत आहेत.

अलिबाग तालुक्यातील बेलोशीजवळ सागवाडी (ठाकूरवस्ती) परिसरात वसलेला कोंडीचा धबधबा यंदाही पर्यटकांचे प्रमुख आकर्षण ठरत आहे. अलिबागपासून सुमारे १४ किलोमीटर अंतरावर असलेल्या या धबधब्यापर्यंत जंगलातील रम्य पायवाटेने २० ते २५ मिनिटांचा पायी प्रवास करावा लागतो. निसर्गाच्या कुशीत वसलेला हा धबधबा आणि परिसरातील शांत वातावरण पर्यटकांना वेगळाच अनुभव देत आहे.

कोरोना काळात स्थानिक कलाकार महेंद्र गावंड यांनी मित्रांच्या सहकार्याने धबधब्याजवळील विशाल दगडांवर आकर्षक चित्रकला साकारली. प्रचंड दगडावर रंगवलेले वाघाचे भव्य मुख, तसेच सिंह, अजगर, गरुड, मासा, कासव आणि टायटनिक जहाजाची चित्रे पर्यटकांसाठी विशेष आकर्षण ठरत आहेत.

### ग्रामीण पर्यटनाला नवी दिशा

पर्यटकांच्या वाढत्या संख्येमुळे सागवाडी ठाकूरवस्तीतील स्थानिक नागरिकांनी पार्किंग, चहा-नाश्ता, खाद्यपदार्थ विक्री तसेच इतर लघुउद्योग सुरू केले असून स्थानिकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. कला, निसर्ग आणि ग्रामीण पर्यटनाचा सुंदर संगम घडवून आणणारा कोंडीचा धबधबा आज अलिबाग तालुक्यातील महत्त्वाचे पर्यटनस्थळ म्हणून ओळख निर्माण करत आहे.

# सुपेगाव रस्ता खचल्याने वाहतूक बंद

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

मुसळधार पावसामुळे तळेखार येथून सुपेगाव मार्गे मुरुडकडे जाणारा मुख्य रस्ता मोठ्या प्रमाणात खचल्याने या मार्गावरील वाहतूक धोकादायक झाली. रोहा सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने दखल घेऊन याठिकाणी सुचना फलक तसेच याठिकाणी सेफ्टी रिबीन लावले आहेत.

नागरिकांनी या मार्गाने प्रवास टाळावा आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने पर्यायी मुरुड साळाव मार्गे रोहा मार्गाचा वापर करावा असे आवाहन सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता विजय बागूल, शाखा अभियंता अरुण पाटील यांनी केले आहे.

मुसळधार पावसामुळे रस्त्याचा काही भाग खचल्याने वाहनचालकांसाठी मोठा धोका निर्माण झाला आहे. पावसाचा जोर कायम राहिल्यास हा रस्ता कधीही पूर्णपणे वाहून जाण्याची शक्यता असल्याचेही संबंधित विभागाने स्पष्ट केले आहे.



दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, मुरुड तहसिल, नांदगाव मंडळ अधिकारी व त्यांच्या टीमने या रस्त्याची पाहणी करून संबंधित ठेकेदारास तात्पुरत्या स्वरूपात रस्ता पूर्वस्थितीत आणण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

आवश्यक दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेण्यात येणार असून, नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य दिले जात असल्याची माहिती रोहा सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता विजय बागूल यांनी दिली. तसेच नागरिकांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने पर्यायी मार्गाचा वापर करावा असे आवाहन केले आहे.

# सुधागड तालुक्यात मुख्य पूल धोकादायक

**। पाली /बेणसे । प्रतिनिधी ।**

सुधागड तालुक्यात सततच्या पुरामुळे भेरव येथील आंबा नदीवरील पूल आणि नांदगाव येथील नदीचा पूल धोकादायक स्थितीत पोहोचले आहेत. हे दोन्ही पूल पाण्याखाली राहिल्यामुळे त्यांचे अतोनात नुकसान झाले असून परिसरातील वाहतूक व्यवस्था पूर्णपणे धोक्यात आली आहे.

नांदगाव येथील पुलाजवळील रस्त्याचा मुख्य भाग पुराच्या पाण्याचा तीव्र प्रवाहामुळे मोठ्या प्रमाणावर खचला आहे. तसेच रस्त्यावरील डांबराला फुगवटा आला आहे. पाली, पुणे, माणगाव, कोलाड या महत्त्वाच्या मार्गांना जोडणारा मुख्य दुवा आहे.

दुसरीकडे, सुमारे सहा ते सात दशके जुना असलेला भेरव येथील आंबा नदीवरील पूल यंदाच्या पुरात पूर्णपणे उध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. पुलावरचे काँक्रीट आणि सुरक्षेचे कठडे वाहून गेले असून, आतील लोखंडी सळ्या उघड्या पडल्या आहेत. या दोन्ही पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करून तात्पुरती डागडुजी करावी, अशी धनराज सागळे व स्थानिक ग्रामस्थांकडून केली जात आहे.

# पूरात महावितरणच्या 'प्रकाशदूतांची' धडाडी

**। पनवेल । ग्रामीण, प्रतिनिधी ।**

मुसळधार पाऊस, पुराचे पाणी आणि जीवाला धोका निर्माण करणाऱ्या प्रतिकूल परिस्थितीतही महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी धाडसाने काम करत जिल्ह्यातील साई शाखेअंतर्गत येणाऱ्या रावे, केळवणे, दिघाटी आणि कासारभट परिसरातील सुमारे ९,५०० ग्राहकांचा वीजपुरवठा पूर्ववत केला.

६ जुलै रोजी पाताळगंगा नदीलगतच्या सीमा खाडी परिसरात २२ केव्ही उच्चदाब वाहिनीचा जंप कट झाला, तर रावे गावाजवळील काही वीज खांब कोसळल्याने चार गावांचा वीजपुरवठा खंडित झाला. पुराच्या पाण्यामुळे रस्ते बंद असूनही महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी बोटीच्या साहाय्याने घटनास्थळी पोहोचत मुख्य बिघाड शोधून काढला. कमरेएवढ्या पाण्यात आणि अंधारात काम करून केळवणे, दिघाटी व कासारभट येथील सुमारे ५,५०० ग्राहकांचा वीजपुरवठा सुरू करण्यात आला.

रावे गावातील परिस्थिती अधिक गंभीर असल्याने पाणी ओसरल्यानंतर ९ जुलै रोजी तीन नवीन वीज खांब उभारून तीन रोहित्रे कार्यान्वित करण्यात आली. त्यानंतर १० जुलैपर्यंत उर्वरित दुरुस्ती पूर्ण करून सर्व ९,५०० ग्राहकांचा वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला.

या मोहिमेवर भांडूप परिमंडलाचे मुख्य अभियंता संजय पाटील, अधीक्षक अभियंता धनराज बिक्कड, कार्यकारी अभियंता दिवाकर देशमुख, उपकार्यकारी अभियंता दत्तात्रय सांगळे यांनी सातत्याने देखरेख ठेवली. कनिष्ठ अभियंता राकेश गोलवड, साई शाखेचे कर्मचारी आणि रावे ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे हे आव्हानात्मक काम अल्पावधीत पूर्ण झाल्याचे महावितरणने सांगितले.




### 9,500 ग्राहकांचा वीजपुरवठा पूर्ववत

**निसर्गाचा अद्भूत चमत्कार** | निसर्गातील दुर्मिळ जनुकीय बदलाची जिल्ह्यातील दुसरी घटना

# अंबा नदीत आढळला 'अल्बिनो एलीगेटर गार' मासा

**। पाली/ वाघोशी । प्रतिनिधी ।**

सुधागड तालुक्यातील वावे गावाजवळून वाहणाऱ्या अंबा नदीच्या पात्रात एक अत्यंत दुर्मिळ आणि वैशिष्ट्यपूर्ण मासा आढळून आला आहे. या परदेशी प्रजातीच्या माश्याचे नाव 'अल्बिनो एलीगेटर गार' असून तो चमकदार पिवळ्या आणि नारंगी रंगाचा आहे. शुक्रवारी (दि.१०) वावे येथील स्थानिक तरुण कैलास हिलम आणि केतन म्हसके हे नेहमीप्रमाणे नदीकिनाऱ्यावर फेरफटका मारण्यासाठी गेले होते. त्या दरम्यान त्यांना नदीपात्रात हा आकर्षक रंगाचा मासा मृत अवस्थेत पडलेला दिसून आला. नदीत असा अनोखा जीव पाहताच परिसरात याविषयी मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.



निसर्गातील अशा दुर्मिळ जनुकीय बदलाची ही जिल्ह्यातील दुसरी घटना आहे. सापा प्रमाणेच या माशाच्या शरीरातील नैसर्गिक रंगद्रव्ये नष्ट झाल्याने त्याला हा अनोखा रंग प्राप्त झाला आहे. वन्यजीव अभ्यासक सागर दहिंबेकर यांनी सांगितले की 'गार' प्रजातीचे मासे त्यांच्या टोकदार तोंडासाठी आणि मगरीसारख्या दिसणाऱ्या जबड्यासाठी ओळखले जातात. निसर्गामध्ये या माशांचा मुळ रंग गडद किंवा राखाडी असतो. परंतु, जनुकीय बदलांमुळे या विशिष्ट माशाचा रंग पूर्णपणे पांढरा किंवा चमकदार पिवळा-नारंगी झाला आहे. पुरामुळे कोणाच्यातरी फिश टँक मधून किंवा कोणीतरी तलावा मध्ये सोडला असेल पुराचे पाणी आत गेल्याने तो बाहेर नदीपात्रामध्ये आला असेल किंवा कोणीतरी सोडला असेल असा अंदाज आहे.

> "ही प्रजाती मूळची भारतातील नसून ती उत्तर अमेरिका आणि ब्राझीलमधील नद्यांमध्ये आढळतो. हा मासा अत्यंत झपाट्याने वाढतो. येथील नदी व तलावतील माशांसाठी तो घातक आहे. सदर मासा हा कोणीतरी फिश टँकमध्ये पाळण्यासाठी आणला असावा आणि त्यानंतर त्याला सांभाळणे शक्य न झाल्यामुळे नदीमध्ये सोडला असावा."
>
> -नितीन निकम, मत्स्यतज्ञ, पेण

# तळा-रोहा रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य

**। तळा । प्रतिनिधी ।**

तळा-रोहा मुख्य मार्गावरील फुगारेवाडी फाट्यानजीक पावसामुळे मोठ्या प्रमाणात माती रस्त्यावर वाहून आल्याने वाहनचालकांसाठी गंभीर धोका निर्माण झाला आहे. या ठिकाणी अनेक वाहने घसरल्याच्या घटना घडल्या असून, मोठा अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी कि नदीलगतच्या खासगी जागेवर साफसफाई करताना झाडे-झुडपे हटवून जेसीबीच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणात माती काढण्यात आली. त्यानंतर झालेल्या मुसळधार पावसामुळे ही माती थेट मुख्य रस्त्यावर वाहून आली. परिणामी रस्त्यावर चिखलाचा थर साचल्याने चारचाकी, दुचाकी तसेच अन्य वाहनांना घसरण्याचा धोका निर्माण झाला आहे.



मालकाच्या हल-गर्जीपणामुळेच ही परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. मातीचा भराव आणि पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा करण्याची व्यवस्था न केल्यामुळे सार्वजनिक रस्त्यावर चिखल साचला असून, यामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या प्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागांनी तातडीने रस्त्यावरील माती हटवून वाहतूक सुरक्षित करावी अशी मागणी वाहनचालक आणि नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# महायुतीचे गुंडकारण

सत्तारुढ महायुतीतील पक्षांच्या दोन नगरसेवकांची मारहाण प्रकरणे घडली आहेत. एक डोंबिवलीतील तर दुसरे महाडचे आहे. आमच्याकडे सत्ता आहे, सबब आम्ही म्हणू तसे झालेच पाहिजे हा माज महायुतीतील मंत्र्यांपासून ते खालच्या कार्यकर्त्यांपर्यंत सर्वच जण दाखवत असतात. त्यांना वरच्या नेत्यांचा अप्रत्यक्ष पाठिंबा असतो. त्यामुळे युतीच्या काळातील राजकारणातील भाषा आणि कृती पाहता हे राजकारण नसून रस्त्यावरच्या गुंडांचे टोळीकारण आहे असेच कोणालाही वाटेल. डोंबिवलीमध्ये शिंदे गटाचे नगरसेवक रमेश म्हात्रे याने डॉक्टर व नर्सेसवर हल्ला केला. एका गर्भवती महिलेला आयसीयूमध्ये ठेवण्याची गरज आहे व आमच्याकडे जागा नाही असे पालिका रुग्णालयातील डॉक्टरांनी सांगितले. महिलेच्या नातेवाइकांनी नगरसेवक म्हात्रेला फोन केला. तो गुंड घेऊन इस्पितळात आला व त्याने महिला डॉक्टर तसेच नर्सेसना मारहाण केली. या प्रकाराचा बोभाटा झाल्यानंतर ही डॉक्टर महिला मला मुलीसारखी आहे, मी केवळ तिच्या कानावर ठेवलेला मोबाईल काढत होतो असे हास्यास्पद स्पष्टीकरण म्हात्रेने दिले. त्याने नावापुरती दिलगिरी व्यक्त केली. पण त्याची मारहाण पाहणारे बरेच लोक मौजूद आहेत. या घटनेनंतर डॉक्टरी वर्तुळात तीव्र प्रतिक्रिया उमटली. डोंबिवलीत तर दवाखाने बंद ठेवण्यात आले. या रुग्णालयातल्या डॉक्टरांनी राजीनामे दिले आहेत. पण इतके सगळे होऊनही हा म्हात्रे ज्या शिंदे गटाचा आहे त्याचे प्रमुख उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चकार शब्द काढलेला नाही. म्हात्रेला पक्षातून हाकललेले नाही किंवा त्याचे नगरसेवक रद्द करण्याच्या मागणीलाही दाद दिलेली नाही. उघडच आहे की हा म्हात्रे स्थानिक दादा आहे. श्रीकांत शिंदे यांची खासदारकी टिकायची असेल तर अशा लोकल दादांना दुखावणे शिंद्यांना जमणारे नाही. हे प्रकरण डोंबिवलीसारख्या प्रमुख शहरात घडले व त्याला मिडियाने उचलून धरले म्हणून ते जगासमोर आले व त्या प्रकरणात निदान म्हात्रेला अटक झाली. हाच प्रकार नंदूरबारच्या आदिवासी भागात घडला असता तर त्याची ना दाद ना फिर्याद अशी स्थिती झाली असती.

## उलट्या बोंबा

यात गंमत अशी की डोंबिवली हे शहर महायुतीचा बालेकिल्ला मानले जाते. भाजप आणि शिंदे यांच्यात तिथे वर्चस्वावरून वाद आहेत. इतर पक्ष नगण्य आहेत. गेली अनेक वर्षे पालिकेत यांचीच सत्ता आहे. आमदार, खासदारही यांचेच आहेत. तरीही यांना पालिकेच्या आरोग्य सेवा सुधारता आलेल्या नाहीत. डोंबिवलीत एक चांगले सरकारी किंवा धर्मादाय उत्तम असे रुग्णालय नाही. पण याची लाज शिंदे गट किंवा युतीला वाटत नाही. उलट आहेत त्या सुविधांसकट लोकांची सेवा करू पाहणाऱ्या डॉक्टरांवरच हे रस्त्यावरच्या गुंडांसारखे तुटून पडतात हे भयानक आहे. इतका सर्व प्रकार होऊनही देवेंद्र फडणवीसांचे पोलिस म्हात्रेला हात लावायला घाबरत होते. नंतरही त्याला इस्पितळात किंवा कोर्टात नेताना त्याला व्हीआयपी वागणूक देण्यात येत होती. शेवटी कोर्टाला पोलिसांना चार गोष्टी सुनावाव्या लागल्या. या राज्यात न्यायाची आणि प्रामाणिकपणाची काय किंमत आहे ते यावरून दिसते. दुसरा प्रकार महाडमध्ये घडला. तिथे पाण्याच्या प्रश्नाबाबत भाजपचे नगरसेवक सूरज बामणे नगरपरिषदेचे मुख्याधिकारी धनंयय कोळेकर यांना भेटायला गेले होते. त्यावेळी चर्चेदरम्यान वाद झाल्याने बामणे व त्यांच्या साथीदारांनी कोळेकर यांना लाथाबुक्क्यांनी व छत्रीने मारहाण केल्याचा आरोप आहे. याबाबत त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र कोळेकर यांनीच आपल्याला मारहाण केली असा बामणे यांचा दावा आहे. मुळात मुख्याधिकारी पदावरची व्यक्ती अशी कोणाला मारहाण करेल ही शक्यता कमी वाटते. दुसरे म्हणजे महायुतीची राक्षसी सत्ता असण्याच्या सध्याच्या काळात भाजपच्या नगरसेवकाला कोणी अधिकारी असे वागवू शकेल हे जवळपास अशक्य आहे. त्यामुळे बामणे यांनीच मारहाण केल्याची शक्यता जास्त आहे. एकूण प्रकार भाजपच्या सध्याच्या संस्कृतीला किंवा खरे तर विकृतीला शोभणारा आहे. राममंदिरामध्ये आपल्याच लोकांना चोऱ्या करायच्या, त्यांना वाचवण्यासाठी आधी बराच काळ पोलिस फिर्यादच होऊ द्यायची नाही, नंतर झाली तरी त्यात इडी वगैरे येणार नाही याचा बंदोबस्त करायचा आणि नंतर विरोधक हिंदू धर्माला बदनाम करत आहेत अशी उलटी बोंब ठोकायची असा प्रकार सध्या देश पातळीवर चालू आहे. थेट तसा नव्हे पण त्याच मासल्याचा प्रकार इकडे चालू आहे.

## म्हणे देवाभाऊ...

कोल्हापुरात कोणी किरकोळ पोराटोरांनी आपल्या व्हॉटसॅपचे स्टेटस औरंगजेब ठेवले तर त्याची मुख्यमंत्र्यांनी दखल घेतली. औरंगजेबाच्या औलादींना धडा शिकवू अशी भाषा केली. त्यातूनच पुढे कोल्हापूर, सातारा, सांगली भागात हिंदू-मुस्लिम तणावाचे प्रकार वाढले. मूळचे काँग्रेसवाले, एकेकाळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला शिव्या देणारे एक पोरसवदा कोकणी मंत्री भाजपमध्ये गेल्यापासून मुस्लिमांविरुध्द बेताल बडबड करीत असतात. नगरमध्ये जाऊन त्यांनी मशिदीत घुसून मारू अशी भाषा केली. आणखी एकदा मुस्लिम व्यापाऱ्यांवर बहिष्कार घाला असा आदेश दिला. पण मुख्यमंत्री उर्फ गृहमंत्री गप्प राहिले. आपल्या पक्षाच्या लोकांची तोंडी वा प्रत्यक्ष गुंडगिरी पाठीशी घालायची, विरोधकांना मात्र सतत धमकावायचे, अर्बन नक्षल ठरवायचे असले प्रकार मुख्यमंत्री व त्यांचे परिवारवाले करीत असतात. परवा मिसिंग लिंकवरील दरडीबाबत टीका झाल्यावर राज्याचा अपमान सहन करणार नाही अशी भाषा फडणवीसांनी केली. फडणवीस म्हणजेच राज्य अशी ज्यांची समजूत झाली आहे त्यांच्या राज्यात म्हात्रे किंवा बामणे यांच्यासारख्या गुंडांना वचक बसणे शक्य नाही. उलट ते मुख्यमंत्र्यांकडून घेतली तर प्रेरणाच घेऊ शकतात. दुर्दैवाने आपल्याकडे म्हात्रे किंवा बामणे यांच्यासारख्या प्रकरणांची झटपट तड लावण्याची कोणतीही व्यवस्था नाही. मुळात या प्रकरणांचा तपास देवेंद्रांचे पोलिसच करणार. म्हणजे तिथेच प्रकरण अर्धे संपण्याची शक्यता. त्यापुढे न्यायायल, साक्षीपुरावे यात वेळ जाणार. त्यातच म्हात्रेसारखे इसम आधी डॉक्टरांना मारहाण करून अटक झाल्यावर पुन्हा आजारी पडल्याचे दाखवून रुग्णालयातच दाखल होणार आणि डॉक्टरांकडून सेवा करून घेणार. या मंडळींचे राजकीय संरक्षण काढून घेण्याची हिंमत स्वतःला देवाभाऊ वगैरे नेते करू शकत नाहीत. विरोधकांचा करेक्ट कार्यक्रम केला म्हणून एरवी शेखी मिरवणारे एकनाथ शिंदे म्हात्रेसारख्या लोकल इसमाला धडा शिकवण्याची हिंमत करू शकत नाहीत. उलट त्याच्यापुढे लीनदीन होतात. महाराष्ट्र सध्या असल्या दुटप्पी आणि भित्र्या पुढाऱ्यांच्या हाती आहे हे जनतेने समजून घ्यायला हवे. डोंबिवलीतील घटनेत मारहाण झाली ते डॉक्टर होते. त्यांच्यामागे त्यांच्या वैद्यकीय संघटना उभ्या राहिल्या. महाडच्या मुख्याधिकाऱ्यांच्या मागे सरकारी कर्मचाऱ्यांच्या संघटनांनी पाठबळ उभे केले. पण मुजोर राजकारणी एरवी साध्या लोकांवर जी दादागिरी करतात त्यावेळी सामान्यांच्या बाजूने उभे राहणारे कोणीच नसते हीही एक दुःखद गोष्ट इथे नोंदवायला हवी.

विचार

# स्टार्मर यांच्या राजीनाम्यानंतर स्थैर्याचा शोध

***ब्रिटनमध्ये हुजूर पक्षाच्या दीर्घ कारकिर्दीनंतर ब्रिटिश मतदारांना बदल हवा होता. महागाई, आरोग्यसेवेतील अडचणी, ब्रेक्झिटनंतरची आर्थिक अनिश्चितता आणि प्रशासनाविषयीचा असंतोष या पार्श्वभूमीवर मतदारांनी स्टार्मर यांच्यावर विश्वास व्यक्त केला; मात्र सत्ता मिळवणे आणि प्रभावी शासन करणे यात मोठा फरक असतो. स्टार्मर यांच्या नेतृत्वाखाली सरकारला अपेक्षित यश मिळाले नाही. ब्रिटनमधील ताज्या राजकीय अस्थिरतेचा वेध.***



ब्रिटनच्या राजकारणात गेल्या दशकभरात अभूतपूर्व अस्थिरता पहायला मिळाली आहे. एके काळी संसदीय लोकशाहीचा आदर्श मानल्या जाणाऱ्या या देशात पंतप्रधान बदलण्याची मालिका आता नित्याचीच झाली आहे. त्यातच पंतप्रधान कीअर स्टार्मर यांच्या राजीनाम्याने ब्रिटनच्या राजकीय व्यवस्थेसमोरील संकट अधिक गडद झाले आहे. अवघ्या दोन वर्षांपूर्वी प्रचंड बहुमताने सत्तेवर आलेल्या मजूर पक्षाच्या नेतृत्वाला इतक्या लवकर पदत्याग करावा लागणे, हा केवळ एका नेत्याचा पराभव नाही, तर जनतेच्या अपेक्षा, पक्षातील अंतर्गत मतभेद आणि प्रशासनातील अपयश यांचे एकत्रित प्रतिबिंब आहे. आर्थिक आघाडीवर सरकारकडून मोठ्या अपेक्षा होत्या; परंतु अर्थव्यवस्थेला अपेक्षित गती मिळाली नाही. सर्वसामान्यांच्या जीवनमानात फारसा बदल झाला नाही. राष्ट्रीय आरोग्य सेवा अजूनही प्रचंड ताणाखाली राहिली. सार्वजनिक सेवांवरील दबाव कमी झाला नाही. करप्रणाली आणि सामाजिक कल्याण योजनांबाबत सरकारची भूमिका अनेकदा बदलत राहिली. परिणामी, सरकार निर्णयक्षम नसल्याची भावना निर्माण झाली. निवडणुकीपूर्वी दिलेली आश्वासने आणि प्रत्यक्ष कामगिरी यांच्यातील दरी वाढत गेली. स्टार्मर यांना आलेले सर्वात मोठे अपयश म्हणजे जनतेमध्ये निर्माण झालेली निराशा. त्यांनी विरोधी पक्षाचे नेते म्हणून संयमी, अभ्यासू आणि विश्वासार्ह नेता अशी प्रतिमा निर्माण केली होती; मात्र पंतप्रधान म्हणून त्यांनी ठोस राजकीय नेतृत्व दाखवले नाही, अशी टीका वाढत गेली. त्यातूनच त्यांचा राजीनामा पुढे आला आणि आता ब्रिटनमधील राजकीय अस्थिरतेचा विषय देशभर चर्चिला जात आहे.

स्टार्मर यांनी अनेक महत्त्वाच्या प्रश्नांवर तडजोडीचा मार्ग स्वीकारला. त्यामुळे डाव्या विचारसरणीच्या कार्यकर्त्यांना ते पुरेसे प्रगतिशील वाटले नाहीत, तर मध्यममार्गी मतदारांनाही त्यांच्याकडून अपेक्षित परिणाम दिसले नाहीत. या दोन्ही स्तरांवरील असमाधानामुळे त्यांचा जनाधार कमी होत गेला. या असंतोषाचा पहिला मोठा फटका स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये बसला. या निवडणुकांमध्ये मजूर पक्षाला अपेक्षेपेक्षा मोठे नुकसान सहन करावे लागले. पक्षाच्या हातातून अनेक नगरपालिकांवरील नियंत्रण गेले. काही ठिकाणी मतांची टक्केवारीही लक्षणीयरीत्या घटली. स्थानिक निवडणुका या राष्ट्रीय राजकारणात दिशादर्शक मानल्या जातात. त्यामुळे या निकालांनंतर मजूर पक्षात चिंतेचे वातावरण निर्माण झाले. जनतेने सरकारच्या कामगिरीवर नाराजी व्यक्त केली असून पुढील सार्वत्रिक निवडणुकीतही त्याचे परिणाम दिसू शकतात, अशी भीती पक्षातील खासदारांना वाटू लागली आहे. स्थानिक निवडणुकांमधील अपयशानंतर स्टार्मर यांच्या विरोधातील नाराजी उघडपणे समोर आली. सुरुवातीला काही खासदारांनी नेतृत्वावर प्रश्न उपस्थित केले; पण पुढे हा विरोध संघटित स्वरूपात वाढू लागला. अनेक वरिष्ठ नेत्यांनी सरकारच्या धोरणांवर अप्रत्यक्ष टीका केली. काही मंत्र्यांनीही नेतृत्वाबाबत असंतोष व्यक्त केल्याची चर्चा सुरू झाली. पक्षातील डाव्या आणि मध्यममार्गी गटांमधील मतभेद अधिक तीव्र झाले. आर्थिक धोरण, सार्वजनिक खर्च, सामाजिक कल्याण, स्थलांतर आणि संरक्षण या मुद्द्यांवर पक्षात एकमत राहिले नाही. नेतृत्वाकडून स्पष्ट दिशा मिळत नसल्याने खासदारांचा संयम सुटला आणि स्टार्मर यांच्यावर राजीनाम्याचा दबाव वाढत गेला.

आरिफ शेख

राजकीय पक्षात मतभेद असणे स्वाभाविक असते; मात्र नेतृत्वावरील विश्वास कमी झाला, की पक्षाची संघटनात्मक ताकदही कमी होऊ लागते. मजूर पक्षात नेमके हेच घडले. निवडणूक जिंकून देणारे नेतृत्व सरकार प्रभावीपणे चालवू शकत नाही, अशी भावना निर्माण झाली. जनतेतील असंतोष आणि पक्षातील नाराजी यांचा एकत्रित परिणाम म्हणून स्टार्मर यांना पदाचा राजीनामा द्यावा लागला. आता मजूर पक्षासमोर सर्वात मोठा प्रश्न म्हणजे नव्या नेतृत्वाची निवड. या शर्यतीत अँडी बर्नहॅम यांचे नाव सर्वाधिक चर्चेत आले आहे. स्थानिक प्रशासनातील अनुभव, स्पष्टवक्तेपणा आणि पक्षाच्या विविध गटांमध्ये स्वीकारार्ह प्रतिमा ही त्यांची बलस्थाने मानली जातात. कामगारवर्गाशी असलेला त्यांचा संपर्क, प्रादेशिक प्रश्नांवरील ठाम भूमिका आणि संघटनात्मक अनुभव यामुळे अनेक खासदार त्यांच्याकडे आशेने पाहत आहेत. पक्षातील अंतर्गत संघर्ष कमी करण्याची क्षमता त्यांच्यात असल्याचे मानले जात आहे; मात्र बर्नहॅम यांच्यासमोरची आव्हाने अत्यंत कठीण आहेत. सर्वप्रथम त्यांना पक्षातील विविध गटांना एकत्र आणावे लागेल. डावे, मध्यममार्गी आणि उदारमतवादी विचारांच्या नेत्यांमध्ये समन्वय साधल्याशिवाय पक्ष पुन्हा सक्षम होऊ शकणार नाही. दुसरे म्हणजे, सरकारची प्रतिमा सुधारण्यासाठी ठोस आर्थिक धोरण राबवावे लागेल. ब्रिटनमध्ये महागाईचा दबाव, वाढते सार्वजनिक कर्ज, मंदावलेली आर्थिक वाढ आणि आरोग्यसेवेवरील ताण या समस्या अद्याप कायम आहेत. या प्रश्नांवर प्रभावी उपाययोजना न केल्यास नव्या नेतृत्वालाही जनतेचा विश्वास मिळविणे कठीण जाईल. तिसरे महत्त्वाचे आव्हान म्हणजे आगामी सार्वत्रिक निवडणूक. स्थानिक निवडणुकांमधील अपयशामुळे विरोधी पक्षांना नवी ऊर्जा मिळाली आहे. विशेषतः 'रिफॉर्म यूके'सारख्या पक्षाने पारंपरिक मतदारांमध्ये आपली पकड मजबूत करण्यास सुरुवात केली आहे. स्थलांतर, राष्ट्रीय सुरक्षा आणि करभार यांसारख्या मुद्द्यांवर सरकारला कठोर प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे. अशा परिस्थितीत बर्नहॅम यांना केवळ पक्षाचे नेतृत्व करणे पुरेसे ठरणार नाही, तर मतदारांमध्ये नव्याने विश्वास निर्माण करावा लागेल. ब्रिटनच्या राजकीय अस्थिरतेचे परिणाम केवळ देशांतर्गत मर्यादित राहत नाहीत. जगातील एक महत्त्वाची अर्थव्यवस्था, संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचा कायम सदस्य आणि 'नाटो'मधील प्रमुख शक्ती म्हणून ब्रिटनची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. वारंवार नेतृत्वबदल झाल्यास परराष्ट्र धोरणात सातत्य राखणे कठीण होते. गुंतवणूकदारांमध्येही अनिश्चिततेचे वातावरण निर्माण होते. आर्थिक निर्णयांमध्ये विलंब होतो आणि प्रशासनाची कार्यक्षमता कमी होते. त्यामुळे राजकीय अस्थिरतेची किंमत केवळ सत्ताधारी पक्षालाच नव्हे, तर संपूर्ण देशाला मोजावी लागते. ब्रिटनच्या संसदीय लोकशाहीची ताकद तिच्या स्थैर्यात मानली जात होती. आज मात्र परिस्थिती उलट दिसते आहे. एका दशकात अनेक पंतप्रधान बदलले, सरकारे बदलली आणि नेतृत्वावरील विश्वास डळमळीत झाला. ही परिस्थिती लोकशाहीच्या दृष्टीने चिंताजनक आहे, कारण जनतेने निवडून दिलेल्या सरकारकडून धोरणात्मक सातत्य, स्थिरता आणि परिणामकारक प्रशासनाची अपेक्षा असते. स्टार्मर यांचा राजीनामा हा एका राजकीय अध्यायाचा शेवट असला, तरी मजूर पक्षासाठी आणि ब्रिटनसाठी नव्या परीक्षेची सुरुवात आहे. बर्नहॅम किंवा अन्य कोणत्याही नव्या नेत्याला केवळ सत्तेची सूत्रे हाती घेऊन चालणार नाही, तर पक्षातील विश्वास पुन्हा निर्माण करावा लागेल, अर्थव्यवस्थेला नवी दिशा द्यावी लागेल आणि जनतेच्या अपेक्षांची पूर्तता करावी लागेल. ब्रिटनसमोर आजचा प्रश्न केवळ पंतप्रधान बदलण्याचा नाही, तर राजकीय स्थैर्य पुनर्स्थापित करण्याचा आहे. कारण स्थिर नेतृत्वाशिवाय आर्थिक प्रगती, प्रभावी प्रशासन आणि जागतिक स्तरावरील विश्वासार्हता टिकवणे अशक्य आहे. स्टार्मर यांच्या राजीनाम्याने हा प्रश्न अधिक तीव्र झाला आहे. आता नव्या नेतृत्वाकडून ब्रिटनला स्थैर्य, दिशा आणि विश्वास मिळतो का, याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. ब्रिटनच्या या राजकीय संकटाचा थेट परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर आणि आंतरराष्ट्रीय संबंधांवर होत आहे. महागाई, बेरोजगारी, आरोग्य यंत्रणेची दुरवस्था आणि ऊर्जेचे वाढते संकट यांसारख्या गंभीर प्रश्नांशी झगडणाऱ्या ब्रिटिश जनतेला राजकीय नेत्यांच्या या सत्तापिपासू खेळात नाहक भरडले जावे लागत आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरही ब्रिटनचे वजन कमालीचे घटले आहे. युक्रेन युद्ध, मध्यपूर्वेतील तणाव आणि जागतिक आर्थिक घडामोडींमध्ये ब्रिटनची भूमिका आता दुय्यम ठरत चालली आहे, कारण देशांतर्गत राजकारणातूनच येथील नेतृत्वाला उसंत मिळत नाही.

थोडक्यात सांगायचे, तर स्टार्मर यांचा राजीनामा हा केवळ एका राजकीय कारकिर्दीचा अंत नसून ती ब्रिटिश राजकीय व्यवस्थेला लागलेली घरघर आहे. ब्रिटनला आता अशा एका नेतृत्वाची गरज आहे, जे पक्षाच्या भिंती ओलांडून देशाचा विचार करेल, पक्षातील मतभेदांना पूर्णविराम देईल आणि ब्रिटिश जनतेला पुन्हा एकदा स्थिर सरकारचा विश्वास देईल. अन्यथा, महासत्तेचा आव आणणारा हा देश अंतर्गत राजकीय यादवीत स्वतःचेच अस्तित्व धोक्यात आणेल, अशी भीती आता अधिक गडद झाली आहे.

चर्चा आजची

# ८३ तासानंतर शोधमोहिम समाप्त

पुण्यात बुधवारी (दि.८) दुपारच्या सुमारास एक धक्कादायक घटना घडली. पिंपरी-चिंचवडच्या मोशी कचरा डेपो परिसरात 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्पाच्या प्रशासकीय इमारतीवर कचऱ्याचा प्रचंड ढिगारा कोसळला. या दुर्घटनेच्या वेळी इमारतीत २२ जण आणि कचऱ्याजवळ एक जण, असे सर्व मिळून २३ जण कचऱ्याच्या ढिगाऱ्याखाली अडकले होते. त्यानंतर तात्काळ भारतीय सेना, एनडीआरएफ, पिंपरी-चिंचवड महापालिका, पीएमआरडीए अग्निशमन दल आणि पोलिसांनी संयुक्त बचावमोहीम सुरू केली. या बचावकार्यात कचऱ्याचा प्रचंड ढिगारा, पाऊस आणि मलब्याखाली निर्माण झालेल्या मिथेन आणि क्लोरीन वायूमुळे मोठे अडथळे येत होते. त्यामुळे बचाव पथकांकडून अत्यंत खबरदारी घेत टप्प्याटप्प्याने उत्खनन सुरू होते. मोशीत रविवारी (दि.१२) मध्यरात्री १ वाजताच्या सुमारास वामन कसबे ही व्यक्ती शोध मोहिमेदरम्यान आढळून आली. पिंपरीमधील वायसीएम रुग्णालयात तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले. आणि अखेर ८३ तासांनंतर सर्व बेपत्ता व्यक्तींच्या शोध पूर्ण झाल्यानंतर ही शोधमोहिम अधिकृतरीत्या समाप्त करण्यात आली. या दुर्घटनेत एकूण ९ जणांना आपला प्राण गमवावा लागला. त्यामुळे या दुर्घटनेबाबात संपूर्ण महाराष्ट्रातून हळहळ व्यक्त होत असून, पुन्हा एकदा सुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.

संतोष राऊळ

या दुर्घटनेतून सुखरूप बाहेर पडलेल्या नागरिकांचे अनुभव अंगावर काटा आणणारे आहेत. ज्यामध्ये विजय सपकाळ या तरुणाची मृत्यूशी दिलेली झुंज थक्क करणारी ठरली. या दुर्घटनेत इमारतीमध्ये अडकलेल्या विजयचा पाय थेट एका पिलरखाली दाबला गेला होता. तर, खाली खिडकीच्या फुटलेल्या काचा पसरलेल्या होत्या. आपण आता यातून जिवंत वाचणार नाही, अशी खात्री पटल्याने, त्याने अखेरचा निरोप समजून आपल्या पत्नीला मोबाईलवरून सेल्फी, व्हिडिओ आणि मेसेज पाठवला होता. मात्र, बचाव पथकाच्या अथक प्रयत्नांमुळे तब्बल ११ तासांनंतर त्याला ढिगाऱ्याखालून जिवंत बाहेर काढण्यात यश आले. रुग्णालयात उपचारादरम्यान जेव्हा तो बेशुद्ध अवस्थेतून बाहेर आला, तेव्हा समोर उभ्या असलेल्या आपल्या पत्नी आणि मुलीला पाहून त्याला अश्रू अनावर झाले; काळजाचा थरकाप उडवणाऱ्या या प्रसंगातून विजयचा झालेला पुनर्जन्म सध्या सर्वांनाच भावुक करत आहे. दुर्घटनेच्या सुरूवातील ५ जण स्वतः सुखरूप बाहेर पडले. त्यानंतर पहिल्या दिवसाच्या रात्री सोमनाथ शेळके, सचिन दावडगाव, दादासाहेब आर्डे, सुजाता शिंदे, रामप्रताप चव्हाण, रणवीर सिंग, विजय सपकाळ, भूषण पाटील यांच्यासह एकूण ९ जणांची सुखरूप सुटका करण्यात आली. त्यानंतर दि.१० जुलै रोजी भावेश वाणी याचा मृतदेह ढिगाऱ्याखालून बाहेर काढला. जळगाव जिल्ह्यातील मूळ रहिवासी असलेला भावेश मोहन वाणी (३४) हा तरूण या ठिकाणी घन कचरा प्रकल्पाचे काम पाहणाऱ्या अँथोनी लारा कंपनीत लेखापाल होता. कुटुंबातील एकुलता एक असलेल्या भावेश याने दीड वर्षापूर्वीच संसार थाटल्यावर पुण्यातील निगडी मध्ये स्थायिक झाला होता. मुलाला नोकरी लागल्यांतर या कुटुंबाला बरे दिवस आले होते. मात्र, दुर्दैवी घटनेत घरातील कर्ता मुलगा गेल्याने वाणी कुटुंबासमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्याने दुर्घटनेच्या दिवशी आपल्या पत्नीला ''जेवायला बसलो आहे'', असा मेसेज केला होता. आणि हाच मेसेज त्याच्या आयुष्यातील शेवटचा मेसेज ठरला. शनिवारी दुर्घटनाग्रस्त इमारतीचा काँक्रीटचा भाग तोडून आत प्रवेशाचा मार्ग तयार करण्यात आला. त्यानंतर दुपार ते रात्री या वेळेत अक्षय सावंत (३५), सुनील कोरके (४०), महेश कुंभार (३३), नागेश गायकवाड (२६), रणजीत पाटील (२२), राहुल गायकवाड आणि सन्नी माने (३९) यांचा मृतदेह काढण्यात आला. मूळचे दिघी येथील रहिवासी असलेले सन्नी माने मोशी कचरा डेपो परिसरात वाहनचालक म्हणून काम करत होते. त्यांच्या मागे पत्नी कांचन, दोन लहान मुले आणि वृद्ध आई-वडील असा मोठा परिवार आहे. मित्राचा एक जिव्हाळ्याचा क्षणभराचा आग्रह सनी यांच्यासाठी जीवघेणा ठरला. त्या दिवशी घरी आनंदाचे वातावरण होते. सनी यांच्या आवडीची बिर्याणी पत्नीने तयार केली होती. काम संपवून सनी घरी जेवायला निघाले होते. पण त्यांच्या एका मित्राने ''आज थांब, सोबत जेवूया'' असा आग्रह धरला. मित्राचे मन राखण्यासाठी सनी कॅन्टीनमध्ये थांबले. तो क्षणभर थांबला, खरं; पण त्याच क्षणी नियतीने क्रूर खेळ खेळला. ते जेवायला बसणार इतक्यात कचऱ्याचा महाकाय ढिगारा कोसळला आणि सनी त्यात कायमचे गाडले गेले.तर, १२ जुलै रोजी मध्यरात्री १ वाजता इमारतीबाहेरील कचऱ्याच्या ढिगाऱ्याखाली अडकलेले वामन कसबे यांचा मृतदेह सापडला.

यादरम्यान, या इमारतीच्या बांधकामावर देखील प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. केवळ तळमजल्यालाच पूर्णत्वाचा दाखला देण्यात आल्याचे समोर येत आहे. आणि सर्वात धक्कादायक बाब म्हणजे या इमारतीला आधीच भेगा पडल्याचे फोटो दोन दिवसांपूर्वी संबंधित अधिकाऱ्यांना पाठवण्यात आले होते. परंतु, त्यांच्याकडून कोणतीची कारवाई न झाल्याचे आरोप नागरिकांमधून केले जात आहेत. तसेच, एक महिन्यापूर्वी याठिकाणी असलेला कचऱ्याचा डोंगर हळूहळू इमारतीवर सरकत असल्याचे देखील एका कामगाराच्या निदर्शनास आले होते. मग संबंधित अधिकाऱ्यांचे त्याकडे दुर्लक्ष झालेच कसे, असा देखील व्यक्त केला जात आहे. मात्र, जे सुखरूप बचावले नाही त्यांचे काय? त्यांच्या कुटुंबियांचे पुढे काय? याला जबाबदार कोण? असे एक ना अनेक प्रश्न संबंधित अधिकाऱ्यांसमोर नागरिक उपस्थित करत आहेत. कारण या या भीषण दुर्घटनेत तब्बल ९ जणांना आपला प्राण गमवावा लागला आहे.

लोकसंसद

## जबाबदार कोण? खड्डे की व्यवस्था?

दुचाकीवरून घरी जात असताना अष्टमी रेल्वे फाटकाजवळ खड्डा चुकवण्याच्या प्रयत्नात तोल जाऊन पडलेल्या संकेत जनार्दन कोतवाल (वय ३२) या पोलिस पाटील तरुणाच्या अंगावरून एसटी बस गेल्याने गुरुवारी सायंकाळी त्यांचा जागीच मृत्यू झाला. ही बातमी जरी छोटी वाटत असली, तरी या मृत्यूला जबाबदार कोण? मुंबई-गोवा महामार्गाचे काम जूनअखेर पूर्ण होईल आणि कोकणातील प्रवाशांचा प्रवास सुकर होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला होता. मात्र जुलै महिना सुरू होऊनही महामार्गाचे काम अद्याप अपूर्णच आहे. पाऊस उशिरा सुरू होऊनही कामांचा वेग वाढला नाही. उलट पावसाने अपूर्ण कामांची पोलखोल केली आहे.नागोठणे, गडब आणि वडखळ परिसरात मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. माणगाव आणि इंदापूर बायपास रस्त्याचे कामही संथ गतीने सुरू आहे. त्यामुळे रस्त्यावर पसरलेली खडी, खड्डे आणि धुळीमुळे वाहनचालक व प्रवाशांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. महामार्गावरील पळस्पे ते इंदापूर दरम्यानचे काम तब्बल १५ वर्षांपासून रखडले आहे.यंदा तरी हे काम पूर्ण होईल, अशी कोकणवासीयांची अपेक्षा होती. मात्र ठेकेदारांच्या संथ कारभारामुळे ती अपेक्षा पुन्हा भंगली आहे. सिमेंट-काँक्रीटच्या रस्त्यावर डांबरीकरण करून खड्डे बुजविण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. परंतु पावसाच्या पाण्यामुळे डांबरीकरण वाहून गेल्याने रस्ता पुन्हा उखडला आहे.

**- दत्तप्रसाद शिरोडकर, मुंबई**

दिनविशेष

# बाजीप्रभू देशपांडेच्या पराक्रमाची शौर्यगाथा

छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वराज्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणारे शूरवीर मावळे बाजी प्रभू देशपांडे यांची पुण्यतिथी. त्यांच्या पराक्रमामुळे आजही त्यांचे नाव इतिहासात अजरामर आहे. बाजीप्रभू देशपांडेच्या पराक्रमामुळेच घोडखिंड ही पावनखिंड म्हणून ओळखली जाऊ लागली. हजारो मेले तरी चालतील पण लाखोंचा पोशिंदा जगायला हवा, या प्रेरणेने शिवाजी महाराज विशाळगडी पोहोचेपर्यंत बाजीप्रभूंनी घोडखिंड अडवून धरली होती. असे प्रामाणिक पराक्रमी धैर्यवान सैनिक प्राणापलीकडे लढले म्हणून आज डोळ्यांनी हे स्वराज्य आपल्याला पहाता आले. बाजीप्रभू देशपांडे पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील हिरडस मावळातले पिढीजात देशपांडे होते. बाजीप्रभू हे हिरडस मावळचे वतनदार असणाऱ्या बांदलांचे दिवाण होते. परंतु बाजींचे प्रशासकीय कौशल्य आणि शौर्य पाहून श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराजांनी हे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व आपलेसे करून घेतले. पुढे बाजींप्रभूचे शौर्य पाहून छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांना आपल्या सैन्यदलात उच्च पदावर बसवले. मोगल सैन्याशी लढा देताना, त्यांनी आपले शौर्य दाखवत मोगल सैन्याच्या शंभराहून अधिक सैनिकांसोबत एकट्याने लढा दिला आणि सर्वांना ठार मारून आणि लढाई यशस्वी जिंकून दाखवली. १६४८ सालापर्यंत शिवाजी महाराजांच्या सोबत राहून त्यांनी पुरंदर, कोंढाणा आणि राजापूर किल्ले जिंकण्यास मदत केली. पुढे बाजी प्रभूंनी रोहिडा किल्ला आणि आजूबाजूचे सगळेच किल्ले मजबूत केले. यामुळे वीर बाजी मावळ्यांचा एक जबरदस्त मावळा म्हणून ओळखला जाऊ लागले. या प्रांतात त्यांची पकड निर्माण झाली. त्यामुळे लोक आपोआपच त्यांचा आदर करू लागले. पुढे १६५५ मध्ये त्यांनी जावळीच्या लढाईत आणि परकियांकडून मावळ्याचा किल्ला जिंकून घेण्यासाठी अगदी कठोर परिश्रम केले. नुसता हा किल्ला जिंकलाच नाही तर त्यांची नंतर डागडुजी करुन दुरुस्ती देखील केली.

बाजीप्रभूंनी १० नोव्हेंबर १६५९ रोजी अफझलखानाच्या मृत्यूनंतर कुशल नावाच्या जंगलात असलेली आदिलशाही छावणी समूळ नष्ट केली आणि शिवाजी महाराजांना स्वराज्याचा विस्तार करण्यास मदत केली. पुढे मग १६६० मध्ये, मोगल, आदिलशहा आणि सिद्दीकी इत्यादींनी शिवाजी महाराजांना सर्व बाजूंनी घेरण्याचा प्रयत्न केला. तेव्हा शिवाजी महाराज हे पन्हाळा किल्ल्यावर होते. शत्रूच्या घेऱ्या असलेल्या किल्ल्यातून शिवाजी महाराजांना बाहेर पडणे फार कठीण झाले. यावेळी बाजीप्रभू नावाचा मावळा पुढे आला आणि त्याने शिवाजी महाराजांना बाहेर पडण्यासाठी मदत केली. तेव्हा त्यांनी शिवाजी महाराजांना अर्धे सैन्य देऊन पुढे जाण्यास सांगितले आणि बाजीप्रभू स्वत: घोडखिंडीच्या दाराजवळ सैन्य घेऊन उभे राहिले. जेव्हा शत्रूंना कळले की शिवाजी महाराज घेऱ्यातून निसटले तेव्हा चवताळल्यासारखे शत्रू बाजीप्रभूंच्या सैन्यावर तुटून पडले जोरदार युद्ध सुरू झाले. या युद्धात बाजीप्रभूंनी शत्रुंसोबत खूप हुशारीने दोन हात केले. सिद्दी मसूदचे सैन्य अडविताना कामी आलेले मराठी मावळे, धारातीर्थी पडलेले बंधू फुलाजी, जखमी झालेले स्वतःचे शरीर या कशाचेही भान बाजींना नव्हते. महाराज विशाळगडावर सुखरूप पोहोचले याचा इशारा देणाऱ्या तोफांच्या आवाजाकडे त्यांचे कान होते. तोफांचा आवाज ऐकेपर्यंत ते दोन्ही हातात तलवार घेऊन प्राणांची बाजी लावून लढत होते. खिंडीमध्ये महादेवाचा महारुद्र अवतार प्रकटलेला होता. तोफांचे आवाज ऐकल्यावर कर्तव्यपूर्तीच्या समाधानाने बाजीप्रभूंनी प्राण सोडले. मराठी सैनिकांच्या अभूतपूर्व अशा पराक्रमाने आणि बाजींसारख्या स्वराज्यनिष्ठांच्या पवित्र रक्ताने घोडखिंड पावन झाली म्हणूनच तिचे नाव पावनखिंड झाले. बाजी- फुलाजी बंधूंवर विशाळगडावर, महाराजांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. बाजीप्रभू व फुलाजी यांची समाधी विशाळगडावर आहे. तसेच पन्हाळगडावर बाजीप्रभूंचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात आलेला आहे.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

१३ जुलै

१) श्रीम. वंदना विठोबा पाटील कुरूळ, अलिबाग, १३-७-१९४७

२) श्री. हरेश्वर नारायण पाटील नवगाव, अलिबाग, १३-७-१९६०

३) श्रीम. प्रीती प्रबोधन गायकर वरसोली, अलिबाग, १३-७-१९५९

**कृषीवलच्या वाचकांना आवाहन**




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

# रायगडचे भूषण महर्षि न्यायरत्न धुंडिराजशास्त्री विनोद


**ॲड. आदिती वैद्य**

दीपावलीच्या शुभेच्छा देऊन मनातल्या शब्दांना लेखात गुंफण्याचे ठरवले. मी भाग्यवान असल्यामुळे मला महर्षि न्यायरत्न धुंडिराज गोविंद विनोद, हे वडील म्हणून लाभले. त्यांची असामान्य बुद्धिमत्ता, व्यासंग, विद्वत्ता ही देवकोटीची होती. पण ते त्यांच्या देवकोटीत रमले नाहीत. गरीब आणि पीडित जनांच्या सेवेत त्यांनी त्यांचा देह रमवला होता.

केतकीचा मळा ह्या जेमतेम ४० उंबरठ्यांच्या, रायगड जिल्ह्यातल्या, छोट्या गावात, जन्म झालेल्या अप्पांनी केवळ बुद्धिमत्तेच्या जोरावर कीर्ती मिळवली. महाराष्ट्र भारतात नव्हे, तर जगात एक महान, द्रष्टे, तत्त्वज्ञ संत महानुभावी साक्षात्कारी सत्पुरुष म्हणून त्यांची कीर्ती पसरलेली होती. लौकिक अर्थाने ते एम.ए. पीएचडी होते. शिवाय न्यायरत्न ही पदवी नाशिकच्या शंकराचार्यांनी, डॉ. कूर्तकोटींनी दिली होती. शंकराचार्यांच्या गादीवर बसण्यासाठी अप्पांची नियुक्ती त्यांनी केलेली होती.

केतकीचा मळा येथे अप्पांनी स्थापन केलेला सिद्धाश्रम आहे. तो ख्यातनाम आहे. धरमतर, रेवस आणि अलिबागहून अवघा ९ मैलांवर आहे. प्रत्येक चंद्रग्रहण व सूर्य ग्रहणाला अप्पा आवर्जून सिद्धाश्रमात जाऊन होमहवन करून अनेक वस्तु अभिमंत्रित करत असत. त्या वस्तु म्हणजे बिब्बे, सागरगोटे, तांब्याचे छोटे पत्रे, जानवी. ह्या सर्व वस्तुंवर त्यांच्या मंत्र सामर्थ्याचा परिणाम होत असे. ग्रहणकाळात ह्या वस्तु शक्ती ग्रहण करू शकतात हे सत्य त्यांनी त्यांच्या अभ्यासाने जाणले होते. ह्या वस्तुंवरही अमेरिकेतल्या संशोधकांनी संशोधन करून त्यांतील परमाणुंचे कसे परावर्तन होते. ह्याचा शोध घेतला होता. फोटो घेऊन त्यांनी हे बदल सिद्धही केले होते. अशा अभिमंत्रित वस्तु ठेवलेले बदाम, मनुका औषध म्हणून ४९ दिवस खायला सांगत. त्या वस्तुंमुळे माणसाला बरे वाटत असे. शास्त्रशुद्ध रीतीने संशोधन झाल्यामुळे भारतीय वैदिक शास्त्रात असे शास्त्रीय दृष्टीने उपचार करण्याची शास्त्रीय परंपरा होती हे अप्पांनी सिद्ध केले होते.

अप्पांचा वेदोपनिषदांचा गाढा व्यासंग होता. ते दर्शनालंकार ह्या पदवीने विभूषित होते. त्यांच्या विद्वत्तेमुळे ते विख्यात होते. १९५४ साली एप्रिलमध्ये टोकियो येथे विश्वशांती परिषदेमध्ये त्यांना विश्वशांती सचिव अशी बहुमानाची पदवी देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला होता. विश्व धर्मपरिषदेचे ते उपाध्यक्ष होते. त्यांनी पृथ्वीप्रदक्षिणा केली. अगदी उत्तरधृवावर जाऊन संशोधक विमानातून त्यांनी संचार केला होता. ते अमेरिकेत तीन वर्षे राहिले होते. १९५४ साली ते भारतात परत आले. १९५५ साली अलिबाग नगरपरिषदेने त्यांना म नपत्र दिले. अलिबागच्या कन्याशाळेचे उद्घाटन अप्पांच्या हस्ते झाले. दिल्लीतही त्यांचा मोठा सन्मान झाला. जनरल करिअप्पा, जैन नसीम, अशा अनेक ख्यातनाम व्यक्तींनी त्यांना मानपत्र दिले. १९६२ सालामधे, अप्पांच्या जवळच्या सर्वांनी आणि अप्पा, वहिनींनी 'शांति-मंदिर' निर्माण केले. अप्पांच्या कामाला योग्य अशी वास्तु निर्माण झाली. अप्पांचे वास्तव्य शांती मंदिरमधे आल्यापासून एक स्थैर्य निर्माण झाले. मूलत: ते तत्त्वज्ञान व मानसशास्त्राचे विश्वविद्यालयीन प्राध्यापक होते. त्यांनी वयाच्या अवघ्या २५ व्या वर्षी, कॉलेजमधे शिकत असताना शेकडो अभंग केले. त्यांचे परम मित्र प्रा.प्र.रा.दामले यांनी ते जतन केले, त्यामुळे 'अभंग संहिता' या त्यांच्या पुस्तकाचे १९६८ साली प्रकाशन झाले. अप्पा महान कवी होते. त्यांच्या काव्यकल्पनांना सर्व दिग्गज लेखकांनी



मनापासून दाद दिली. आचार्य प्र. के. अत्रे यांनी मराठा ह्या त्यांच्या लोकप्रिय दैनिकात अग्रलेख लिहिला होता. त्यात अभंग संहिता ही 'आनंद संहिता' आहे, असे गौरवोद्गार काढले आहेत. ह्या अग्रलेखात, 'अप्पांनी साहित्याकडे अधिक लक्ष दिले असते तर एक प्रतिभासंपन्न कवी म्हणून त्यांची ओळख सर्वांनी ठेवली असती' असे विधान केले आहे. आपले आवडते दुसरे साहित्यिक पु. ल. देशपांडे यांनी अभंग वाचले आणि त्यांनी अप्पांच्या अभंग संहितेची तुलना रविंद्रनाथ टागोरांच्या काव्याशी केली. अप्पा हे टागोरांसारखी उत्तुंग कल्पनेची भरारी असलेले, अप्पांना ते तरूण असताना तिबेटमध्ये जाऊन मंत्रशास्त्र व तंत्रशास्त्र ह्या विद्यांचा अभ्यास करण्यासाठी प्रत्यक्ष पंडित मदन मोहन मालवीयांनी प्रेरित केले. अप्पांनी तिबेटमध्ये वास्तव्य केले. दोन्ही शास्त्रांचा सखोल अभ्यास केला.

अमेरिकेत असताना अप्पा प्रख्यात शास्त्रज्ञ आईन्स्टाईन यांना प्रत्यक्ष भेटले होते. त्यांच्या बरोबर अप्पांची चर्चा झाली. त्यावेळी, मानसिक शक्तींबाबत बोलताना अप्पांनी, त्यांना, प्रत्येकाची मानसिक शक्ती, ही मानसिक परमाणुंची बनलेली आहे, असे सांगितले. त्यावेळी अप्पांनी सगळ्यात महत्त्वाचा विचार मांडला तो आईन्स्टाईनना विचारात टाकणारा होता. अप्पांनी सांगितले की, ह्या मनाच्या परमाणूचा स्फोट केला, तरच मानवी संस्कृती उच्चतम कक्षा गाठू शकेल. हा अप्पांचा अभिनव विचार फारच भारावून टाकणारा होता. हे काम अप्पांनीच करावे, असे आईन्स्टाईनने, त्यांना सूचविले. त्या कामाकरिता त्यांनी, अप्पांना, अमेरिकेत राहाण्यास सांगितले किंवा अप्पांनी ह्या महत्त्वाच्या संशोधनाकरिता अमेरिकेत परत आले पाहिजे, असे सूचविले.

२००१ ते २००२ हे अप्पांचे जन्मशताब्दी वर्ष मोठ्या दिमाखाने महर्षी विनोद सिद्धाश्रम सेवा मंडळातर्फे अलिबाग आणि सिद्धाश्रमात साजरे केले. १२ जानेवारी हा स्वामी विवेकानंदाचा जन्मदिवस अप्पा सातत्याने साजरा करत असत. अप्पांची जन्मतारीख १२ जानेवारी १९०२, पण स्वत:चा वाढदिवस साजरा करत नसत. विवेकानंद जयंती म्हणून ती साजरी करुन त्यांच्या महान कार्यासंबंधी अप्पा स्वत:तर बोलतच, परंतु अनेक वक्त्यांना पाचारण करुन त्यांचे मौलिक विचार श्रोत्यांना ऐकवण्याचे अप्पांनी ठरवले होते. अप्पांच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून रायगड जिल्ह्यात चांगल्या कार्यक्रमाला सुरुवात करण्याचे ठरले. अप्पा हे नावाजलेले वक्ते होते. त्यामुळे त्यांच्या नावाने वक्तृत्व स्पर्धा अलिबागमध्ये घ्यावी असे सूचले. ही कल्पना सर्वांनी उचलून धरली. ॲड. दत्ता पाटील यांनी ती प्रत्यक्षात आणण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य केले. जेएसएम कॉलेज विनामोबदला उपलब्ध झाले. ते कायमच उपलब्ध राहिले. गेली १९ वर्षे ही वक्तृत्व स्पर्धा सातत्याने चालू आहे. ७ फेब्रुवारी २००१ ला केतकीच्या मळा ह्या अप्पांच्या जन्मस्थानाचे गावी असलेल्या शाळेला महर्षी न्यायरत्न विनोद विद्यामंदिर असे नामाभिधान देण्याचा समारंभ झाला. २००१ च्या बुद्धजयंतीच्या निमित्ताने मा. उल्हास पवार यांचे भाषण झाले. पं.वसंतराव गाडगीळ ह्यांनी आदी शंकराचार्याबद्दल प्रवचन केले. बुद्धजयंती आणि आदि शंकराचार्यांची पुण्यतिथी अप्पांनी अनेक वर्षांपासून करण्याची प्रथा सुरु केली ती अजूनही मंडळातर्फे सातत्याने चालू आहे.२००१ च्या जून महिन्यात ज्ञानेश्वरीचे पारायण झाले. जुलै २००१ मध्ये सिद्धाश्रमात गुरुपौर्णिमेला सकाळी १०८ जोडप्यांनी सत्यनारायणाची एकत्र पूजा केली. अशा प्रकारे ही अलौकिक अशी पूजा करुन संध्याकाळच्या व्यासपूजा महोत्सवाला सर्वांना सत्यनारायणाचा प्रसाद पुण्याला सर्वांना दिला होता. १९६० सालापासून दत्तजयंतीला गुरुचरित्राचे पारायण सिद्धाश्रमात होते. भक्तगण सिद्धाश्रमात राहून, गीतापठण, धवलगिरी ह्या अप्पांच्या ग्रंथाचे अभ्यासपूर्ण वाचन, अभंग गायन, आरती अशा अनेक श्रद्धापूर्वक प्रथा पार पडतात. फक्त परमार्थात रमलेले साधक जमतात. १९९२ सालापासून मी दत्तजन्माचे किर्तन करण्यास सुरुवात केली. अजूनही माझे किर्तन ऐकतात. त्याचे समाधान शब्दात व्यक्त करणे अवघड आहे. अप्पांचे परम भक्त दिवाकर रावते यांनी कायमच आमच्या सर्व कार्यक्रमांना सातत्याने सहकार्य देऊन प्रोत्साहित केल्यामुळे ही जबाबदारी उत्साहाने पार पाडायला खूपच आनंद होतो.


रायगड जिल्ह्यातल्या वाचकांना महर्षी विनोदांची तोंड ओळख ह्या लेखाने होईल अशी आशा करते. वाचकांनी सिद्धाश्रमात येऊन त्यांचा आशीर्वाद घेऊन, शांती मिळवावी, अशी सदिच्छा व्यक्त करते.

# कोकणवासियांचा यंदाचा गणेशोत्सव सुसाट

| रायगड | प्रतिनिधी |

गणेशोत्सवापूर्वी मुंबई-गोवा महामार्गावरील माणगाव बाह्यवळण मार्गाची एक बाजू वाहतुकीसाठी खुली करण्याचे नियोजन असून पनवेल ते झाराप या मुंबई -गोवा महामार्गावरील ४१७ किमी मार्गाचे चौपदीकरणाचे काम पूर्ण झाले आहे, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी विधानसभेत दिली.

माणगाव बाह्यवळण मार्गाची लांबी ७.५ किलोमीटर असून या मार्गावर तीन उड्डाणपूल आहेत. त्यापैकी एका उड्डाणपुलाचे ७५ टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित दोन मोठ्या पुलांची ९० टक्के कामे पूर्ण झाली आहेत. हे दोन्ही पूल ३१ जुलैपर्यंत पूर्ण होतील. माणगाव बाह्यवळण मार्गाची



एक बाजू गणेशोत्सवापूर्वी वाहतुकीसाठी खुली करण्यात येईल, असे मंत्री भोसले यांनी सांगितले.

इंदापूर बाह्यवळण मार्ग ३.५ किलोमीटर लांबीचा असून येथील उड्डाणपुलाचे ४० टक्के काम झाले आहे. हा पूल डिसेंबर पर्यंत पूर्ण होईल. संपूर्ण बाह्यवळण मार्ग २८ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. पनवेल ते झाराप या ४४९ किलोमीटर लांबीच्या मुंबई- गोवा महामार्गापैकी ४१७ किमी चौपदरीकरण पूर्ण झाले. उर्वरित कामे लवकर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. चिपळूण शहरातील उड्डाणपुलाचे काम अंतिम टप्प्यात असून ऑगस्टपर्यंत हा पूल वाहतुकीसाठी खुला होईल. संगमेश्वर येथील सोनवी नदीवरील पुलाच्या पोहोच मार्गाची कामेही प्रगतीपथावर आहेत, असे मंत्री भोसले यांनी सांगितले.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निधीची चणचण नाही. मागच्या वर्षीच्या तुलनेत यंदा विभागाला केलेली आर्थिक तरतूद तब्बल ६२ टक्के वाढलेली आहे. तसेच परशुराम घाटात वारंवार दरडी कोसळण्याच्या पार्श्वभूमीवर पर्यायी पूल उभारण्याचा प्रस्ताव केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठविण्यात आला आहे, त्याला लवकरच मंजुरी मिळेल, अशी आशा मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले त्यांनी व्यक्त केली.

**कंत्राटांची लवकरच देयके देणार**

कंत्राटदारांची १७ हजार कोटींची देयके प्रलंबित आहेत. पुरवणी मागण्यांमध्ये १८९५० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे कंत्राटदारांची देयके लवकरच दिली जातील. १ कोटीपर्यंतच्या कंत्राटदारांची देयके त्वरीत अदा करण्यासाठी नवी प्रणाली आणतो आहेत. कंत्राटातील ५६ टक्के रक्कम लोकप्रतिनिधी आणि सरकारी अधिकारी यांना वाटण्यासाठी जाते, हा कंत्राटदारांचा आरोप केवळ सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबधीत नसल्याचे मंत्री भोसले म्हणाले.

# पालक मार्गदर्शन जनजागृती कार्यक्रम

| पेण | प्रतिनिधी |

रायगड मेडिकल असोसिएशन आणि पेण एज्युकेशन सोसायटीच्या प्राथमिक शाळा, पेण यांच्यासंयुक्त विद्यमाने पालक सभा व लहान मुलांचे आरोग्य या विषयावरील मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात बाल आरोग्य, पोषण, स्वच्छता आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाविषयी पालकांना सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी बालरोगतज्ज्ञ डॉ. नीता कदम आणि डॉ. अजय कदम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाला प्राथमिक शाळेतील २०० हून अधिक विद्यार्थ्यांचे पालक, शिक्षकवृंद तसेच शिक्षणप्रेमी उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना डॉ.नीता कदम आणि डॉ. अजय कदम यांनी शाळकरी मुलांच्या आरोग्यासाठी संतुलितआहाराचे महत्त्व विशदकेले. विद्यार्थ्यांच्या डब्यात कोणते पौष्टिक पदार्थ असावेत, रोजच्या जेवणात कोणत्या अन्न घटकांचा समावेश करावा, वैयक्तिक स्वच्छता, नियमित दिनचर्या, चांगले संस्कार, मुलांना अभ्यासाची सवय कशी लावावी



आणि पालकांनी त्यांच्याकडून नियमित अभ्यास कसा करून घ्यावा याविषयी त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

याशिवाय, पॅकबंद अन्नपदार्थ, जंक फूड, शीतपेये यांचे मुलांच्या आरोग्यावर होणारे दुष्परिणामही त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केले आणि मुलांना पौष्टिक व घरगुतीआहार देण्याचे आवाहन केले. विशेष मार्गदर्शन करताना डॉ. नीता कदम यांनी मुलींमध्ये येणाऱ्या पहिल्या मासिक पाळीबाबत पालकांना वैज्ञानिक माहिती दिली. कमी वयात मासिक पाळी येण्याची कारणे, त्याकाळात घ्यावयाची काळजी तसेच मुलींशी या विषयावर मोकळेपणाने संवाद साधण्याचे महत्त्व त्यांनी पालकांना पटवून दिले.

# पिक विमा योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

| चिरनेर | प्रतिनिधी |

नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास, खरिप २०२६ पंतप्रधान पीक विमा योजनेचा लाभ उरण तालुक्यातील शेतकऱ्यांनी घ्यावा असे आवाहन उरण तालुका कृषी विभागामार्फत उरण तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ नारनवर यांनी केले आहे.

शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळावा यासाठी प्रधान मंत्री पीक विमा योजना कृषी विभागामार्फत राबविण्यात येत आहे. या योजनेत सहभागी शेतकऱ्यांना पेरणी न होणे तसेच पूर, दुष्काळ, पावसात खंड यामुळे होणारे नुकसान तसेच गारपिट, भूस्खलन क्षेत्र, जलमय होणे, वीज कोसळणे, ढगफुटी अशा स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान, काढणीनंतर शेतात सुकवणी साठी ठेवलेल्या पिकांचे होणारे



नुकसान या सर्व बाबींकरीता विमा संरक्षण लाभणार आहे.

रायगड जिल्ह्यात खरीप पिकांचे नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण व्हावे यासाठी इफको टोकियो जनरल इन्शुरन्स कंपनी महाराष्ट्र राज्य शासनाद्वारे प्रधानमंत्री पिक विमा योजना राबविण्यात येत आहे. त्यासाठी अंतिम मुदत ३१ जुलै असल्याचे कृषी विभागाकडून सांगण्यात आले आहे. प्रधानमंत्री पिक विमा योजना अंतर्गत हंगाम ातील पिकांसाठी विमा योजना राबविण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या योजनेनुसार शेतकऱ्यांना केवळ ६५० रुपये प्रति हेक्टरी विमा हप्ता भरून पिक विमा उतरविता येणार आहे. व विमा संरक्षित रक्कम हेक्टरी ६५ हजार रुपये आहे. त्यासाठी फार्मर आयडी, आधार कार्ड, बँक पासबुक ,अद्यावत सातबारा, ८ अ उतारा, ई पीक पाहणी तसेच सयुक्त खातेदारांसाठी सामूहिक संमती पत्र अशी आवश्यक कागदपत्रे आवश्यक आहेत.

**कोकणकन्या, मंगळुरू एक्स्प्रेसचे तिकीट मिळेना | जुलैपासूनच आरक्षणावर मोठा ताण**

# कोकणातील रेल्वेगाड्यांची प्रतीक्षा यादी 'रिग्रेट'

| रायगड | प्रतिनिधी |

मुंबईस्थित कोकणवासियांना गणेशोत्सवाचे वेध लागले असून गावी जाण्यासाठी लगबग सुरू झाली आहे. गणेशोत्सवानिमित्त कोकणात जाणाऱ्या रेल्वेगाड्यांची तिकिटे आरक्षित केली जात आहेत. परंतु, कोकणात जाणाऱ्या रेल्वेगाड्यांच्या आरक्षणासाठी प्रवाशांची प्रचंड गर्दी होत असून अनेक गाड्यांची प्रतीक्षा यादीची मर्यादा पार झाल्याने रिग्रेटचा संदेश दाखवण्यात येत आहे.

मुंबई-गोवा मार्गावरील कोकणकन्या, मंगळुरू एक्स्प्रेससह प्रमुख गाड्यांमध्ये आरक्षित तिकीट मिळणे प्रवाशांसाठी कठीण झाले आहे.

१४ सप्टेंबर रोजी गणेश चतुर्थी असून गावी जाणाऱ्यांची तिकीट काढण्यासाठी धडपड सुरू आहे. रेल्वे सुटण्याच्या ६० दिवसआधीपासून रेल्वेचे तिकीट आरक्षित करण्यास सुरुवात झाली आहे. १० जुलै रोजीपासून ८ सप्टेंबर रोजीचे तिकीट काढण्यास सुरुवात झाली आहे. ११ जुलै रोजी ९ सप्टेंबर रोजीचे गणेश चतुर्थीच्या दिवशीचे तिकीट काढण्यात येत हो-ते. गणेशोत्सवानिमित्त तिकीट आरक्षण सुरू असून, गेल्या दोन दिवसांपासून कोकणवासीय आर-क्षण केंद्रावर, आयआरसीटीसी आणि खासगी संकेतस्थळावरून व अन्य पर्यायी मार्गावरून तिकिटे काढली जात आहेत. तसेच घरबसल्या तिकीट काढणे शक्य आहे.

त्यामुळे कोकणकन्येसह कोकणात जाणाऱ्या इतर गाड्यांची तिकिटे एकाच वेळी काढण्यात आल्याने काही मिनिटांत तिकिटे आरक्षित झाली. संकेतस्थळावरून कोकणातील एक्स्प्रेसचे तिकिट काढण्याचा प्रयत्न केल्यास रिग्रेट दाखवण्यात येत आहे. मुंबई, ठाणे, नवी मुंबई तसेच पुणे परिसरातून दरवर्षी मोठ्या संख्येने कोकणवासिय गणेशोत्सवासाठी कोकणात जातात. त्यामुळे जुलै महिन्यापासूनच रेल्वे आरक्षणावर मोठा ताण येऊ लागला आहे. यावर्षीही त्याचीच पुनरावृत्ती झाली असून अनेक रेल्वेगाड्यांची प्रतीक्षा यादीत आता रिग्रेट असे दाखविले जात आहे. विशेषतः कोकणकन्या एक्स्प्रेसच्या ८ आणि ९ सप्टेंबर रोजीची प्रतीक्षा यादी मोठी असून काही दिवसांतच रिग्रेट स्थिती दिसून येत आहे. त्यामुळे नियमित आरक्षणातून तिकिट मिळण्याची शक्यता अत्यंत कमी झाली आहे.

प्रवाशांकडून कोकणासाठी आणखी विशेष रेल्वेगाड्या सोडण्याची मागणी जोर धरत आहे. दरवर्षी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वे आणि कोकण रेल्वेकडून विशेष गाड्या जाहीर केल्या जातात. यावर्षीही अतिरिक्त फेऱ्या वाढविण्यात याव्यात, अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे. गणेशोत्सवानिमित्त २०२३ मध्ये कोकणात जाण्यासाठी तिकिटे काढताना कोकणकन्या एक्स्प्रेसची प्रतीक्षा यादी अवघ्या दीड मिनिटांतच एक हजारापार गेली होती. त्यानंतर त्यात तिकीट आरक्षणात गैरप्रकार झाल्याची शंका प्रवाशांनी व्यक्त केली होती. तपासअंती यात अनेक तिकीट आरक्षण खाती बनावट असल्याचे उघड झाले होते.

कोकणकन्या एक्स्प्रेस, मंगळुरू एक्स्प्रेस आणि सुरत मंगळुरू एक्स्प्रेसचे ९ सप्टेंबर रोजीचे सर्व श्रेणी डब्यातील तिकीट काढताना 'रिग्रेट' दाखविण्यात येत आहे.

## निवडक



### विवा कॉलेज येथे वृक्षारोपण

**माणगाव :** विवा कॉलेज, माणगाव येथे चेअरमन विनया ढेपे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रम, स्वच्छता अभियान, चित्रकला स्पर्धा व निबंध स्पर्धा उत्साहात संपन्न झाल्या. महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोठ्या उत्साहाने या कार्यक्रमांत सहभाग घेतला. वृक्षारोपणाद्वारे पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला, तर स्वच्छता अभियानातून स्वच्छ परिसर आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्यात आली. चित्रकला व निबंध स्पर्धेत विद्यार्थ्यांनी पर्यावरण संरक्षण, स्वच्छता, सामाजिक मूल्ये आणि राष्ट्रप्रेम या विषयांवर आकर्षक कलाकृती व विचार मांडले. या कार्यक्रमासाठी चेअरमन विनया ढेपे, उपाध्यक्ष डॉ. विवेक ढेपे, प्राचार्य प्रा. योगेश रानभरे, उप.विभागप्रमुख प्रा. प्रसाद तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात मोलाचे योगदान दिले.



### दिघेवाडीच्या महिलांचा नवा संकल्प

**पाली :** सुधागड तालुक्यातील सह्याद्रीच्या कुशीत वसले दिघेवाडी गाव दोन वर्षांपूर्वी शालेय परसबाग स्पर्धेत तालुक्यात प्रथम आले होते. तोच आदर्श डोळ्यासमोर ठेवून आता गावातील महिलांनी पुन्हा एकदा शाळेसाठी सुंदर परसबाग उभारण्याचा संकल्प केला आहे. शाळा व्यवस्थापन समिती आणि गावातील सर्व महिला बचत गट एकत्र आले. शाळेसमोरील पडीक जमिनीचा वापर करून शालेय परसबाग तयार करण्याचे काम त्यांनी हाती घेतले. या कामात वयोवृद्ध महिलांनीही उत्साहाने सहभाग घेतला. यातूनच गावातील महिलांच्या एकतेचे आणि शाळेबद्दलच्या आपुलकीचे दर्शन घडले. परसबागेसाठी अत्यंत सुंदर वाफे तयार करून त्यामध्ये फळभाज्या, पालेभाज्या तसेच विविध फुलझाडांची लागवड करण्यात आली. विशेष म्हणजे सुरुवातीला तयार केलेली परसबाग नैसर्गिक कारणांमुळे नष्ट झाली, तरीही या महिलांनी खचून न जाता नव्या उमेदीने पुन्हा परसबाग उभारली. दिघेवाडीच्या महिलांचा हा नवा आदर्श आज संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

### आदिवासीवाड्यांवर विशेष शिबिरे

**पेण :** शासनाच्या विशेष सखोल पुनर्निरीक्षण (ड्खठ) २०२६ कार्यक्रमांतर्गत पेण विधानसभा मतदारसंघात मतदारनोंदणी व पडताळणीचे काम वेगाने सुरू असून, एकही पात्र मतदार या प्रक्रियेपासून वंचित राहू नये यासाठी प्रशासनाकडून विशेष प्रयत्न केले जात आहेत. पेण विधानसभा मतदारसंघातील ग्रामपंचायत रोडे, बूथ क्रमांक १६८ अंतर्गत फणसवाडी आदिवासीवाडी येथे विशेष एसआयआर मॅपिंग शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात आदिवासी मतदारांचे फॉर्म भरून घेणे, आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणे तसेच मतदारांना प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. याउपक्रमात बीएलओ अधिकारी, त्यांचे सहकारी, अंगणवाडी सेविका, शिक्षकवृंद आणि आशा सेविका यांनी सक्रिय सहभाग घेतला. ग्रामपंचायत रोडेचे सरपंच दिनेश पवार तसेच माजी सरपंच स्वप्नील म्हात्रे यांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष मेहनत घेतली.

## निवडक



### आदिवासी विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप

**नवीन पनवेल** : विशाल सावंत मित्र परिवार यांच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत बोंडारपाडा जिल्हा परिषद शाळा आणि दुंदरे आदिवासी वाडी येथील विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी बोलताना शैलेश गायकवाड यांनी मित्र परिवाराच्या या उपक्रमाचे कौतुक केले. ते म्हणाले की, 'शिक्षण हा प्रत्येक मुलाचा हक्क आहे आणि ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षणाची साधने पोहोचवणे हे आपले कर्तव्य आहे. आजच्या काळात दर्जेदार शिक्षण ही काळाची गरज आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांनी या वह्यांचा योग्य वापर करून जिद्दीने अभ्यास करावा व आपले भविष्य उज्ज्वल करावे. विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभे राहण्यासाठी आमचा मित्र परिवार नेहमीच प्रयत्नशील राहील. दीपक उलवेकर यांनी सांगितले की, विशाल सावंत मित्र परिवाराच्या माध्यमातून नेहमीच असे विविध लोकोपयोगी कार्यक्रम राबवले जातात. केवळ वह्या वाटपच नव्हे, तर लॉकडाऊनच्या कठीण काळातही या परिवाराने संयुक्तरीत्या गरजूंना धान्य वाटप केले होते. महाड येथील पूरग्रस्त भागात प्रत्यक्ष जाऊन जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले होते. यावेळी विशाल सावंत, शैलेश गायकवाड, संदीप म्हात्रे, गोविंद शेळके, दीपक उलवेकर, नरेश मढवी, देविदास चौधरी, धिरज कदम, सागर कांबळे आदी उपस्थित होते.




### माथेरानची थकबाकी केव्हा वसुल होणार?

**माथेरान** : माथेरान नगरपरिषदेला प्रवासी कर वसुली,निवासी घरभाडे, हॉटेलधारकांना आकारण्यात येणाऱ्या मालमत्तेच्या वाणिज्य कराच्या माध्यमातून उत्पन्न मिळते. मागील काही वर्षांपासून येथील जवळपास वीस पेक्षाही अधिक हॉटेलधारकांनी मालमत्ता कर भरलेला नसून एकूण थकबाकी जवळपास दीड कोटी रुपयांची आहे. सर्वसामान्य नागरिक वेळेत घरभाडे भरत असतात परंतु या धनाढ्य मंडळींना अभय का दिले जाते असा यक्षप्रश्न स्थानिकांना सतावतो आहे. भले ही मोठ्या प्रमाणावर असणारी थकबाकी मागील काळातली असली तरी सुद्धा सत्ताधारी गटाने टप्प्याटप्प्याने जमा करून घेणे गरजेचे असताना देखील अद्यापही दीड कोटी रुपयांची थकबाकी वसुली करण्यात प्रशासन आणि लोकप्रतिनिधींना यश आलेले दिसत नाही. ही थकीत रक्कम वसूल झाल्यास गावाच्या विकासाची कामे पूर्ण होऊ शकतात. अन्यथा या थकीत हॉटेल धारकांना नोटीस बजावून अशी हॉटेल्स सील करण्यासाठी आम्ही लवकरच प्रशासनाकडे पाठपुरावा करणार आहोत, असे गटनेते शिवाजी शिंदे म्हणाले.



### 'परीक्षेत बौद्धिक क्षमतेची कसोटी'

**आगरदांडा** : शिष्यवृत्ती परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेची, अभ्यासातील सातत्याची आणि आत्मविश्वासाची खरी कसोटी असते, असे प्रतिपादन शाळेच्या मुख्याध्यापिका अर्चना खोत यांनी मुरूड नांदगाव येथील श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयातील विद्यार्थी अन्वी निलेश बिरवाडकर हिने पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा २०२५-२६ मुरूड ग्रामीण विभागातून तृतीय क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केल्याबद्दल अन्वी शिरवाडकर हिचं मुख्याध्यापिका अर्चना खोत यांच्या सत्कार कार्यक्रमावेळी बोलत होत्या. यावेळी मुख्याध्यापिका अर्चना खोत व पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर यांच्या शुभ हस्ते पुष्पगुच्छ देऊनअन्वी बिरावडकर हिला सन्मानित करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका अर्चना खोत, पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर शाळेतील शिक्षक शिक्षिका व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापिका अर्चना खोत यांनी पुढे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- Vacancy for Furniture store Manager, location- Zirad, Qualification Graduation, MBA Experience- 2-4 years in Retail Contact- 9823585321
- कामासाठी माणसे/मुलगे पाहिजे. १) कंपनीचे मोबाईल विक्रीसाठी दुकानदारांकडे उरण, उलवा/महाड-माणगाव, पेण-पोयनाड, २) डिलेवरी एस.टी.ने अथवा बाईकने (पेण-अलिबाग) (रेवदंडा-मुरूड-अलिबाग) लायसन्स पाहिजे. (बाईक आमची) ३) कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे. ४) पार्ट/फुल टाईम चालेल. (संपर्क : ८८८८२२०२२१)
- रॉयल मोटर विद्यानगर अलिबाग येथे १२०० sqft कार्पेट 2BHK फ्लॅट भाड्याने देणे आहे. एजंट क्षमस्व- ९९७५४९०१६४
- नामांकित कंपनीला हाऊसकिपींग/घरकाम करण्यासाठी विनापाश किंवा अविवाहीत महिला पाहिजे व रोज ८ तास काम, सरकारी मान्यतेप्रमाणे पगार, PF आणि विमा तसेच राहणे व जेवण सहीत संपर्क- ७७७५८०२२३२
- **सकाळी ८-९ या वेळात आणि ८.१५ ते १० या वेळेत घरकामासाठी दोन वेगवेगळ्या बायका पाहिजे आहेत. संपर्क - ९२८४५५५३१४**

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# पुराच्या पाण्यात मीठ विरघळले!

## पेणच्या मिठागरांतील हजारो गोण्या भिजल्या; रायगडच्या पुराचा मिठागरांना मोठा फटका

**| रायगड | प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यात गेल्या आठ दिवसात झालेल्या अतवृष्टी आणि पूरस्थितीमुळे मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली आहे. जिल्ह्यातील मिठागरांना आणि भातखरेदी केंद्रांनाही पूराचा तडाखा बसला आहे. त्यामुळे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे.



जिल्ह्यात जुलै महिन्यात पहिल्या १० दिवसात सरासरी १ हजार २४० मिलीमीटरहून अधिक पावसाची नोंद झाली आहे. या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील अनेक भागात पूरस्थिती निर्माण झाली होती. ज्यात मोठी जीवित आणि वित्तहानी झाली आहे. अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात आत्तापर्यंत १२ जणांचा मृत्यू झाला असून, पूरस्थितीमुळे करोडो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे. मुसळधार पावसामुळे पेण तालुक्यातील ग्रामिण भागात पूरस्थिती निर्माण झाली होती. भोगावती, बाळगंगा आणि पाताळगंगा नद्यांना पूर आल्याने नदीचे पाणी आसपासच्या गावांमध्ये आणि शेतांमध्ये शिरले होते. मुसळधार पावसाने पेण तालुक्यातील खारेपाट परिसराला मोठा फटका बसला.

शिर्की येथील दीडशे एकर मिठशेतीचे बांध तुटल्याने हजारो मिठाच्या गोण्या पावसात भिजल्या आहेत. सदगुरु कृपा नाविन्यपूर्ण सहकारी संस्थेच्या माध्यमातून वंदना म्हात्रे आणि कल्पेश पाटील हे दीडशे एकर क्षेत्रावर नैसर्गिक पद्धतीने मीठ उत्पादन करतात. वर्षभर शेकडो कामगारांच्या मेहनतीने तयार झालेले मीठ विक्रीसाठी मिठशेतीच्या बांधांवर प्लास्टिक आच्छादनाखाली साठवून ठेवण्यात आले होते. मात्र मुसळधार पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्यामुळे मिठशेतीचे बांध उध्वस्त झाले. पावसाचे पाणी साठलेल्या मिठाच्या राशींमध्ये शिरल्याने हजारो गोण्या भिजून मोठे नुकसान झाले.

याच पावसामुळे कल्पेश पाटील यांच्या मत्स्यव्यवसायालाही मोठा फटका बसला आहे. पाण्याचा वेग वाढल्याने मत्स्य तलावातील हजारो मास पूराच्या पाण्यात वाहून गेल्याची माहिती त्यांनी दिली. त्यामुळे मोठे आर्थिक संकट त्यांच्या समोर उभे राहिले आहे. गेल्या अनेक वर्षात अशी परिस्थिती कधीही उद्भवली नव्हती हे नुकसान भरून येऊ शकत नसल्याचे कल्पेश पाटील यांनी सांगितले.

दरम्यान, शिर्की येथील सद्गुरू कृपा सहकारी भात खरेदी केंद्रात शेतकऱ्यांकडून खरेदी करून साठवून ठेवलेला मोठ्या प्रमाणातील भातही पावसामुळे भिजला आहे. त्यामुळे शेतकरी आणि संस्था दोघांनाही मोठ्या आर्थिक नुकसानीचा सामना करावा लागत आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे मीठ उत्पादन, मत्स्यव्यवसाय आणि भात साठा अशा तिन्ही क्षेत्रांचे मोठे नुकसान झाल्याने शासनाने तातडीने पंचनामा करून आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी संस्थेचे संचालक कल्पेश पाटील यांनी केली आहे.

## माथेरानमध्ये रस्त्यांच्या डागडुजीला सुरुवात

**| माथेरान | प्रतिनिधी |**

माथेरानमध्ये पावसाळ्यात नालेमय बनलेल्या रस्त्यावरून पायी चालत जाणे किंवा ई रिक्षाच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांना ने आण करणे अत्यंत जिकिरीचे बनले होते. त्यामुळे दि.९ रोजी प्रसिद्ध झालेल्या माथेरानच्या विकास कामांकडे लोकप्रतिनिधींनी लक्ष द्यावे या मथळ्याखाली वृत्त आल्यावर प्रशासन खडबडून जागे झाले असून नगरपालिका कार्यालया समोरील रस्त्यांची दुर्दशा झाली होती तो रस्ता दुरुस्त करण्यात येत आहे.यावर्षी पहिल्यांदाच आपत्कालीन व्यवस्था बाबतीत तसेच नागरी वस्तीत जाऊन प्रशासनाने पाहणी केलेली नाही. तसेच पावसाळ्यापूर्वी गटारांची साफसफाई केली जाते ती करण्यात आलेली नसल्याने आठ दिवस सलग जोरदार पर्जन्यवृष्टी झाल्याने सर्व पावसाळी पाणी रस्त्यावरून वाहत होते यामुळेच बहुतांश रस्त्याचे नाले झाले आहेत. अन्य ठिकाणी सुध्दा रस्त्यांची ताबडतोब दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी जोर धरू लागली आहे.

### रेनकोट वाटप

**नेरळ** : राधा मीरा ट्रस्ट कडून अंध अपंग यांना रेनकोट, ब्लँकेट आणि छत्र्यांचे वाटप केले जाते. कल्याण पासून खोपोली पर्यंतच्या १२०० अंध अपंग यांना छत्र्या वाटप करण्यात आल्या. अंध, अपंग यांना रेनकोट, ब्लँकेट आणि छत्री वाटप कार्यक्रमाचे आयोजन कर्जत येथील आंबे माता हॉल येथे करण्यात आले होते. अध्यक्ष भरत मेहरा यांच्या माध्यमातून दरवर्षी असा उपक्रम केला जातो. यावर्षी मुंबई, ठाणे, अंबरनाथ, बदलापूर, उल्हासनगर, वांगणी आणि कर्जत तालुका तसेच खोपोली येथील १२०० व्यक्ती उपस्थित होते. या सर्वांना छत्र्या, रेनकोट वाटप करण्यात आले.

## एकदरा पूल बनला गुरांचे आश्रयस्थान

**| मुरुड जंजिरा | प्रतिनिधी |**

मुरुड शहरातील कोळीवाडया लगतच्या एकदरा पुलावर कायम मोकाट गुरांचा राबता असुन पूल हे गुरांचे हक्काचे आश्रमस्थान बनले आहे.



- वाहतूक कोंडीमुळे नागरिक त्रस्त
- शासकीय यंत्रणेचे दुर्लक्ष

खोरा बंदर, राजपुरी, डोंगरी, माझेरी व आगरदांडा या दिशेने जाणाऱ्या दुचाकी सह वाहनांना वाहतुकीच्या दृष्टीने मोठा अडथळा पार करावा लागत असुन अपघाताला ही निमंत्रण संभवते. अत्यंत वर्दळीच्या एकदरा पुलावर रोज मोकाट गुरे उभी राहत असल्याने वाहनांना वाट काढताना कसरत करावी लागत असून सातत्याने कोंडी होत असते. विशेषतः सायंकाळी गुरे पुलावर घोळक्याने येऊन ठिय्या ठोकून बसत असल्याने वाहनचालक आणि पादचाऱ्यांना त्रास होत असून जनावरे शिंगे मारण्याचा धोकादेखील निर्माण होऊ शकतो. कित्येक महिन्यांपासून हा त्रास नागरिक सहन करीत आहेत.

## चार दिवसांपासून चणेरा विभागात विजेचा लपंडाव

### मुसळधार पावसामुळे वीज यंत्रणा कोलमडली, युद्धपातळीवर दुरुस्ती सुरू

**| चणेरा | प्रतिनिधी |**

चणेरा विभागात गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे वीज वितरण व्यवस्था पूर्णपणे विस्कळीत झाली असून अनेक गावांचा वीजपुरवठा खंडित झाला आहे. सततच्या पावसासह सोसाट्याच्या वाऱ्यामुळे उच्च दाबाच्या वीजवाहिन्या आणि विद्युत खांबांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. परिणामी अनेक गावांमध्ये चार दिवसांपासून अंधाराचे साम्राज्य पसरले आहे.

वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर मोठा परिणाम झाला आहे. पिण्याच्या पाण्याची समस्या गंभीर बनली असून विद्यार्थ्यांच्या अभ्यासात अडथळे निर्माण होत आहेत. मोबाईल चार्जिंग, घरगुती कामे, लघुउद्योग आणि व्यावसायिक व्यवहारही ठप्प झाले आहेत. रात्रीच्या वेळी संपूर्ण परिसर अंधारात बुडत असल्याने नागरिकांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे.

मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी उच्च दाबाच्या वीजवाहिन्यांचे खांब कोसळून जमिनीवर पडले आहेत. अनेक भागात रस्ते चिखलमय झाल्याने आणि दुर्गम ठिकाणी पोहोचण्यास अडचणी येत असल्यामुळे दुरुस्तीच्या कामात अडथळे निर्माण होत आहेत. तरीही वीज वितरण विभागाचे कर्मचारी प्रतिकूल परिस्थितीत काम करत असून वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे.

चार दिवस उलटूनही वीजपुरवठा सुरळीत न झाल्याने ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. संबंधित वीज वितरण विभागाने तातडीने दुरुस्तीची कामे पूर्ण करून नियमित वीजपुरवठा सुरू करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## कर्जत नगरपरिषद कर्मचाऱ्यांच्या वतीने जाहीर निषेध



**| कर्जत | प्रतिनिधी |**

महाड नगरपरिषद मुख्याधिकारी यांना नगर-सेवक व इतर साथीदारांनी मारहाण केल्याप्रकरणी कठोर कारवाई व्हावी अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे महाराष्ट्र राज्य नगर परिषद नगरपंचायत कर्मचारी संघटनेने केली आहे

महाड नगरपरिषद येथे महाड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी धनंजय कोळेकर यांच्यावर त्यांच्या दालनात जाऊन महाड नगरपरिषदेचे नगरसेवक सूरज बामणे व इतर साथीदारांनी हल्ला करून मारहाण केली आहे.



## नेरेपाडा शाळेत विद्यार्थ्यांना लेखन साहित्य वाटप

**नवीन पनवेल :** लीनेस क्लब ऑफ हंसिनी नेरूळ यांच्यातर्फे पनवेल तालुक्यातील नेरेपाडा येथील शाळेतील मुलांना दोन टेबल आणि विद्यार्थ्यांना वह्या आणि लेखन साहित्याचे वाटप करण्यात आले.

केंद्रप्रमुख रंजना केणी त्यांच्या माध्यमातून लीनेस क्लब ऑफ हंसिनी नेरूळ यांना जिल्हा परिषदेच्या शाळेत आवश्यक वस्तू देण्यासाठी सांगितले होते. त्यानुसार उषा तलवार, स्मिता वाजेकर, सुमन सिंगला, अध्यक्ष चंदना दास, केंद्रप्रमुख रंजना केणी, शोभा रावत, सरस्वती शर्मा, वंदना जाधव, प्रेरणा देशमुख, शिक्षक दत्तात्रेय दुसमन, माजी शिक्षिका सुजाता जोगल यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना टेबल आणि लेखन साहित्याचे वाटप करण्यात आले.

## ड्रग्स माफियाच्या अड्ड्यावर बुलडोझर

### पालिका-पोलिसांची संयुक्त कारवाई

**| कळंबोली | प्रतिनिधी |**

कळंबोली परिसरातील सिडको कार्यालयाच्या पाठीमागे असलेल्या झोपडपट्टीमध्ये शेळी फार्मच्या नावाखाली सुरू असलेल्या कथित अमली पदार्थ विक्रीच्या अड्ड्यावर पनवेल महानगरपालिका आणि पोलिस विभागाने संयुक्त कारवाई करत बुलडोझर चालवून अतिक्रमण हटविले. या कारवाईमुळे परिसरातील ड्रग्सविरोधी मोहिमेला मोठे बळ मिळाल्याची प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.



यापूर्वी ११ मार्च रोजी पोलिसांच्या नार्कोटिक्स विभागाचे अधिकारी संदीप निगडे यांच्या पथकाने या ठिकाणी छापा टाकून ड्रग्स माफिया वसीम लुंगी याला अटक केली होती. त्या कारवाईनंतर पुढील प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करत आज संबंधित ठिकाणावरील अतिक्रमण हटविण्यात आले.

पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली. अतिक्रमण विभाग अतिरिक्त आयुक्त महेश मेघमाले व कळंबोली प्रभाग अधिकारी सुबोध ठाणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग निरीक्षक अरविंद पाटील यांनी कारवाईचे नेतृत्व केले. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी घटनास्थळी मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.या कारवाईवेळी ड्रग्स माफिया वसीम लुंगीविरोधातील अटकेची कारवाई करणारे नार्कोटिक्स विभागाचे अधिकारी संदीप निगडे हेही उपस्थित होते. तसेच या प्रकरणाचा पाठपुरावा करून कथित ड्रग्स रॅकेटचा पर्दाफाश करण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या समाजसेविका प्रियांका गाडे यांनीही घटनास्थळी उपस्थित राहून कारवाईची पाहणी केली.

या संयुक्त कारवाईमुळे अमली पदार्थांच्या अवैध व्यवसायाविरोधात प्रशासनाने कठोर भूमिका घेतल्याचा स्पष्ट संदेश गेला आहे.

**ग्रामस्थ संतप्त, तातडीने काम पूर्ण करण्याची मागणी | गावामध्ये वाहने आणण्याची अडचण**

## शिरवली गावात अपूर्ण रस्त्यामुळे चिखलाचे साम्राज्य

**| खोपोली | प्रतिनिधी |**

खालापूर तालुक्यातील शिरवली गावात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत सुरू असलेले रस्त्याचे काम अद्याप पूर्ण झाले नसल्याने संपूर्ण गावात चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले आहे. गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचून चिखल झाला असून ग्रामस्थांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.



हा रस्ता अनेक दिवसांपासून प्रलंबित होता. मात्र पावसाळ्याच्या सुरुवातीलाच काम सुरू केल्याने परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. गावाच्या प्रवेशद्वारापासूनच चिखल साचल्यामुळे नागरिकांना पायी चालणेही कठीण झाले असून कोणतेही वाहन गावात येण्यास तयार नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. तर शिरवली ग्रामपंचायत आदर्श ग्रामपंचायत म्हणून ओळखली जाते. मात्र गावातील मुख्य रस्त्याची ही दयनीय अवस्था नागरिकांसाठी मोठी गैरसोय ठरत आहे.तर काम करणाऱ्या ठेकेदाराने नियोजनाचा अभाव दाखविल्याने ही परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करून नागरिकांची गैरसोय दूर करावी, अशी मागणी केली आहे.

> गेले दोन वर्षापासून मंजूर असलेला मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील रस्ता पावसाळ्यात सदर यंत्रणेने सुरू केला. सदर रस्ता पावसाळा अगोदर करणे फार गरजेचे आहे, असे ग्रामपंचायतीने अनेक वेळा तत्सम अधिकाऱ्यांना पत्र निवेदन देऊन सुद्धा पावसाळ्यामध्येच रस्ता खोदल्यामुळे ग्रामपंचायत व नागरिकास मोठ्या समस्यांना सामना करावा लागत आहे औरंगाबादचा ठेकेदार व अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे निदर्शनास येते आहे.
> – महेश पाटील, सरपंच शिरवली ग्रामपंचायत

# पहिल्या पावसानेच केली उरणची पोलखोल!

## ‘उरण बुडणार’चा इशारा खरा ठरला; भराव, अनधिकृत बांधकामे कारणीभूत

। उरण । प्रतिनिधी ।

उरण बुडणार! या मथळ्याखाली काही दिवसांपूर्वी इशारा देणारे वृत्त प्रसिद्ध झाले होते. अवघ्या दोन-तीन दिवसांच्या मुसळधार पावसाने तो इशारा अक्षरशः खरा ठरला. उरण शहरासह तालुक्यातील अनेक भाग जलमय झाले, शेकडो घरांमध्ये पावसाचे पाणी शिरले, नागरिकांच्या मालमत्तेचे मोठे नुकसान झाले आणि संपूर्ण शहराची दाणादाण उडाली. प्रश्न एकच दरवर्षी अशीच परिस्थिती असेल, तर कोट्यवधी रुपयांचा विकास नेमका कुठे गेला?, असा सवाल जनता विचारत आहे.



मुसळधार पावसाने उरण शहराचा अक्षरशः श्वास गुदमरला. रेल्वे स्थानक, सत्र न्यायालय परिसर, इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयाकडे जाणारा मार्ग, शिवसेना शाखा परिसर, नयन अपार्टमेंट परिसर, मुख्य बाजारपेठ तसेच शहरातील अनेक प्रमुख रस्ते गुडघाभर पाण्याखाली गेले. सत्र न्यायालयाच्या पायऱ्यांपर्यंत पाणी पोहोचल्याने परिस्थिती किती गंभीर होती, याची कल्पना येते. रेल्वे स्थानकात प्रवाशांना पाण्यातून वाट काढत प्रवास करावा लागला, तर अनेक भागातील नागरिकांना घरातच कैद होण्याची वेळ आली.

तालुक्यातील अनेक गावांमध्येही पूरसदृश परिस्थिती निमर्ाण झाली. घरांमध्ये पाणी घुसले, शेतीचे नुकसान झाले, अंतर्गत रस्ते बंद पडले आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

अवघ्या दोन ते तीन दिवसांच्या पावसाने ही अवस्था होत असेल, तर पुढील मुसळधार पावसात उरणचे काय होणार? हा प्रश्न प्रत्येक उरणकराच्या मनात घर करून बसला आहे. या भीषण परिस्थितीला केवळ पाऊस जबाबदार नसल्याचा संतप्त आरोप नागरिकांनी केला आहे.

गावोगावी झालेले कथित बेकायदेशीर भराव, समुद्र आणि खाड्यांमध्ये डेब्रिज टाकून तयार करण्यात आलेल्या जागा, नैसर्गिक जलमार्गांवर उभारलेली अनधिकृत बांधकामे, शासकीय यंत्रणेच्या आशीर्वादाने वाढलेली कंटेनर यार्ड आणि नाल्यांची गळचेपी यामुळे पावसाच्या पाण्याचा नैसर्गिक निचराच बंद झाला आहे.

याबाबत अनेक वेळा महसूल विभाग, नगरपरिषद, सिडको, एमएमआरडीए, पर्यावरण विभाग आणि जिल्हा प्रशासनाकडे लेखी तक्रारी करण्यात आल्या. स्थानिक वृत्तपत्रांनीही वेळोवेळी या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधले.

मात्र गेंड्याच्या कातडीच्या प्रशासनाने सर्व इशारे धाब्यावर बसवले आणि त्याची शिक्षा आज सामान्य उरणकरांना भोगावी लागत आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे. या पूरस्थितीची दखल घेत उरण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी पूरग्रस्त भागांची प्रत्यक्ष पाहणी केली. सत्र न्यायालय परिसरासह विविध भागांना भेट देत त्यांनी अधिकाऱ्यांना तातडीने पाण्याचा निचरा करण्याचे, अडकलेल्या नागरिकांना मदत करण्याचे आणि आपत्कालीन यंत्रणा सतर्क ठेवण्याचे निर्देश दिले.

ना अधिकारी प्रभावी पाहणी करताना दिसले, ना जनजागृती करताना. धोकादायक ठिकाणी इशारे नाहीत, वाहतूक नियंत्रण नाही, नागरिकांना सावध करण्यासाठी कोणतीही विशेष मोहीम नाही. आपत्तीच्या काळात प्रशासनाचा समन्वय आणि उपस्थिती अपेक्षित असताना अनेक विभाग केवळ कागदोपत्रीच सक्रिय असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

नैसर्गिक जलमार्ग गिळणाऱ्या बेकायदेशीर भरावांवर, समुद्र व खाड्या बुजविणाऱ्या अनधिकृत बांधकामांवर आणि नियम मोडणाऱ्या प्रभावशाली घटकांवर कारवाई नेमकी कधी होणार? दरवर्षी पावसात शहर बुडणार, नागरिकांचे संसार उद्ध्वस्त होणार आणि प्रशासन केवळ पाहण्या, बैठका आणि पंचनाम्यांमध्येच गुंतून राहणार का? उरणमधील सर्व कथित बेकायदेशीर भराव, डेब्रिज टाकून तयार करण्यात आलेल्या जागा, नैसर्गिक जलमार्ग अडविणारी बांधकामे आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

शहराच्या संपूर्ण जलनिस्सारण व्यवस्थेचे स्वतंत्र तांत्रिक ऑडिट करून कायमस्वरूपी पूरनियंत्रण आराखडा तयार करावा, अन्यथा यापुढील प्रत्येक पावसासाठी प्रशासनालाच जबाबदार धरले जाईल, असा इशाराही संतप्त उरणकरांनी दिला आहे.

## महागाव ग्रामपंचायतीमध्ये वृक्षारोपण

। तळा । प्रतिनिधी ।

तळा तालुक्यातील महागांव ग्रामपंचायत तर्फे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज व माझी वसुंधरा अभियान ७.० मार्फत वृक्षारोपण करण्यात आले. वृक्ष वल्ली आम्हासोयरे वनचरे जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या संत वाणी प्रमाणे माझी वसुंधरा अभियानांतर्गत वृक्षारोपण वरदायनी मंदिर परिसरात ग्रुप ग्रामपंचायत महागाव येथे करण्यात आले.

यावेळी प्रशासक तथा विस्तारअधिकारी नेरकर, कृषी विस्तार अधिकारी मुंढे, डॉ. रघुनाथ पोवार, ग्रामपंचायत अधिकारी सुवर्णा तांबडे, मंदिराचे ट्रस्टी व सर्व पदाधिकारी, माजी सरपंच विठोबा साबळे, पोलीस पाटील मांगले कांतिलाल कसबळे ग्रामस्थ मंडळ, महागाव केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक महागाव आदिवासी वाडी सुनील बैकर व ग्रामपंचायत कर्मचारी या कार्यक्रमास उपस्थित होते. सर्वांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी विस्तार अधिकारी पुष्पा नेरकर मार्गदर्शन करताना म्हणाल्या कि मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज व माझी वसुंधरा अभियान ७.० मार्फत वृक्षारोपण उपक्रम राबविण्यात येत असुन शासनाच्या उपक्रमाचा उद्देश विस्तृत माहिती दिली ग्रामपंचायत प्रशासन व नागरिकांनी संवर्धना बरोबर संगोपन करावे. त्यांना काठीचा आधार देणे, गुरांपासून संरक्षणासाठी कुंपणाचे संरक्षण दिले पाहिजे. पावसाळ्यानंतर पाणी देणे गरजेचे असते, त्याचे पालकत्व स्वीकारुन संगोपन करावे वृक्षारोपणामुळे प्राणवायूची कमतरता भरून निघू शकेल. जमिनीतील पाणी बाष्पीभवन कमी होईल तसेच सावली मिळेल. पर्यावरण संतुलित राहील उष्णता कमी होण्यास मदत होईल असे आवाहन केले.




## आझाद मैदानात युवकांचे आंदोलन

**खारेपाट :** पाऊस वाऱ्याच्या वादळात युवा प्रशिक्षणार्थी संघटनेच्यावतीने आझाद मैदान येथे रोजगाराशी झुंज घेत सरकारला धारेवर धरलं. थोर महावीर क्रांतिकारक यांच्या जय घोष करत सरकारला त्याचा चेहरा आरश्यात दाखवण्याचं प्रयत्न करण्यात आला. ही पावसात पडलेली ठिणगी आहे आणि येणाऱ्या पुढील काळात वनवा पेटणार, असा इशारा दिला आहे.


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग

दागिने-नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## बनावट इंस्टाग्राम आयडी प्रकरणी गुन्हा दाखल

**नवीन पनवेल :** बनावट इन्स्टाग्राम आयडी तयार करून त्यावर फिर्यादीचे फोटो लावून अश्लिल शब्दांची पोस्ट टाकणाऱ्या दोघांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात नऊ जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील फिर्यादी या मुंबई येथे राहत असून सहा जुलै रोजी आरोपी आस्मा असिफ आणि मुफीज मौलवी यांनी खारघर येथे त्यांना अश्लिल शब्दात शिवीगाळ केली त्यानंतर सात जुलै रोजी बनावट इंस्टाग्राम आयडी तयार करून त्यावर फिर्यादीचा फोटो लावला आणि घाणेरड्या शब्दांची पोस्ट टाकली.याबाबत फिर्यादीने खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी तपासाची सुत्रे हाती घेतले असून संबंधितांवर गुन्हा दाखल केला आहे.

## खेतान वेलपॅक कंपनीला पुराच्या पाण्याचा फटका

### मशिन्समध्ये पाणी घुसल्याने नुकसान

। रसायनी । प्रतिनिधी ।

मुसळधार पावसाने खालापूर तालुक्याला चांगलेच झोडपून काढले होते. जोरदार पावसामुळे नदी नाल्यांना पूर आला असून अनेक घरात पाणी घुसण्याच्या घटना घडल्या असताना तालुक्यातील कारखान्यांनाही पुराच्या पाण्याचा मोठा फटका बसला आहे. सारसन गावातील खेतान वेलपॅक प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत पुराचे पाणी घुसल्याने कंपनीचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

खालापूर तालुक्यातील साजगाव ग्रामपंचायतीच्या हद्दीत सारसन गावामध्ये खेतान वेलपॅक प्रायव्हेट लिमिटेड ही पुठ्ठ्यापासून बॉक्सची निर्मिती करणारी कंपनी आहे.

शुक्रवारपासून खालापूर तालुक्याला मुसळधार पावसाने झोडपले असून पावसामुळे नदी आणि नाल्यांना पूर आला होता. पुराचे पाणी घरात घुसून अनेकांचे मोठे नुकसान झाल्याचे समोर आले आहे. वीज वितरण कंपनीचे पोल पडल्याने अनेक भागातील वीजपुरवठा खंडित झाला होता.

रविवारी रात्री झालेल्या जोरदार पावसामुळे पुराचे पाणी खेतान वेलपॅक या कंपनीत घुसले. पुठ्ठ्यांपासून बॉक्सची निर्मिती करणाऱ्या या कंपनीचे पुराच्या पाण्यामुळे प्रचंड मोठे नुकसान झाले आहे. सारसनमध्ये अनेक वर्षापासून खेतान कंपनी कार्यरत असून सामाजिक दायित्व निभवताना या कंपनीचे योगदान मोठे राहिले आहे. पुराच्या पाण्यामुळे कंपनीतील मशीन्स तयार झालेले पुठ्ठ्यांचे बॉक्स आणि कच्चामाल भिजल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती कंपनीचे व्यवस्थापक मुकेश यांनी दिली आहे.

दरम्यान सरपंच विनोद खवळे, उपसरपंच अजित देशमुख, तलाठी वैशाली भावा यांनी कंपनीला भेट देऊन नुकसानीची पाहणी करत व्यवस्थापनाला धीर देण्याचा प्रयत्न केला.

## खालापुरात पावसाळापूर्वीच्या कामांकडे विद्युत मंडळाचे दुर्लक्ष

। रसायनी । प्रतिनिधी ।

खालापूर तालुक्यातील वावंढळ ग्रामपंचायत हद्दीत विद्युत पुरवठा करणाऱ्या विद्युत वाहिन्या झाडाखालून आणि गर्द झाडीतून जात असून यामुळे वित्तहानी बरोबर जीवितहानी होण्याची दाट शक्यता निर्माण झाली असून, एवढ्या मोठ्या प्रमाणावर पडणाऱ्या पावसात तग धरून असल्याने ग्रामस्थांचे नशीब आजमावत नाही ना?, अशी चर्चा जोर धरत आहे.

पावसाळ्यापूर्वी झाडे तोडणे किंवा त्याची फांदी तोडण्याचे कारण ते तुटून पडल्यास विद्युत वाहिनीवर पडतात त्यामुळे वाहिनी तुटतात, वाहिनीला ताण आला की विजेचे खांब कोसळतात वीजपुरवठा खंडित होतो, त्यामुळे जीवित किंवा वित्तहानी टाळण्यासाठी विद्युत मंडळ पावसाळ्यापूर्वी झाडांच्या फांद्या तोडतात.पावसाळ्यात झाडांच्या फांद्या वाहिनी यांना घासल्यामुळे किंवा पडून शॉर्ट सर्किट होण्याच्या घटना घडतात. झाडे पडून विद्युत तारा तुटल्यास लोकांचा किंवा जनावरांचा विजेचा धक्का बसून मृत्यू होऊ शकतो. वाहिनी तुटल्याने, खांब वाकल्याने किंवा जळून खाक झाल्याने महावितरणचे व नागरिकांचे होणारे मोठे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून पाऊस सुरू होण्यापूर्वी म्हणजेच मे महिन्यात ही कामे पूर्ण करण्यात येतात. वावंढळ हद्दीतील या कामांची माहिती माजी सरपंच अर्जुन कदम व विलास विठ्ठलराव कदम यांनी वीजपुरवठा विभागाला दिली होती, वारंवार पाठपुरावा करून देखील आज पर्यंत झाडांच्या फांद्या काढून टाकण्यात आल्या नाहीत. मात्र ग्रामस्थ यांचे सुदैवाने एवढ्या वादळ वारा आणि पावसात दुर्घटना घडली नाही.


### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री. शरद मदनलाल मुतडा वगैरे यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक श्री. दत्तात्रेय महादू कडव यांचे कडून विकत घेण्याचे ठरवीले आहे.

**मौजे. मानसोली, ता. कर्जत, जि. रायगड येथिल मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| २७ | | ०-५९-७०<br>पो.ख. ०-०५-८० | १०-०६ |

यापैकी सर्व्हे नं.२६ ला लागुन उत्तर-दक्षिण बाजुची ०-२५-०० हे. आर. क्षेत्राची मिळकत विकत देणेचे ठरले आहे.

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **चौदा दिवसांचे** आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दि. १३/०७/२०२६.

**ॲड. नरेश रामदास आहीर**
पत्ता-शॉप नं.१२, शिवगंगा अपार्टमेंन्ट,
ब्राह्मणआळी, नेरळ ता. कर्जत,
जि. रायगड- ४१०१०१.
मो.-९३२५०६००३७/९०११२९२९८७.

## ‘डीपी वर्ल्ड इंडस’ कंटेनर जहाजामुळे किनारी सागरी वाहतुकीला बळ

। पनवेल ग्रामीण । प्रतिनिधी ।

डीपी वर्ल्डच्या शिपिंग सोल्युशन्स विभागाने २,५०० हून अधिक टीईयू क्षमता असलेल्या डीपी वर्ल्ड इंडसफ या कंटेनर जहाजाचे अधिग्रहण करून भारतातील किनारी सागरी वाहतूक जाळे अधिक मजबूत केले आहे.




सध्या डीपी वर्ल्डचे भारतातील किनारी सागरी नेटवर्क १४ बंदरांपर्यंत विस्तारले असून १० जहाजांचा ताफा कार्यरत आहे. २०२५ मध्ये कंपनीने ४.७३ लाखांहून अधिक टीईयू मालाची वाहतूक केली आहे. नव्या जहाजामुळे रस्ते वाहतुकीवरील ताण कमी होण्यास मदत होणार असून पुरवठा साखळी अधिक कार्यक्षम आणि शाश्वत बनणार आहे.

डीपी वर्ल्डच्या मरीन सर्व्हिसेस विभागाचे जागतिक मुख्य कार्यान्वयन अधिकारी गणेश राज यांनी सांगितले की, भारतीय ध्वज असलेल्या ङ्गडीपी वर्ल्ड इंडसफच्या समावेशामुळे देशांतर्गत सागरी संपर्क अधिक मजबूत होईल. ग्राहकांना देशभरातील उद्योग आणि बाजारपेठांशी जोडणाऱ्या उच्च दर्जाच्या सेवा पुरविण्याची कंपनीची वचनबद्धता यामुळे अधिक बळकट झाली आहे.

## संदीप राक्षे यांना ‘लोकराजा शाहू कर्तृत्वभूषण पुरस्कार’



**रसायनी :** संदीप राक्षे यांना उल्लेखनीय योगदानाबद्दल लोकराजा शाहू कर्तृत्वभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार कोल्हापूर येथील नष्टे लॉन्स येथे आयोजित भव्य समारंभात भारताचे सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समितीचे मुख्य अधिकारी डॉ. प्रसाद संकपाळ यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे आयोजन पोलीस मित्र असोसिएशनच्या वतीने युवराज मोरे व रजनी शिंदे यांनी केले होते.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळिवण्यांत येते की, मौजे पालव, ता. अलिबाग, जि. रायगड भुमापन क्रमांक व उपविभाग ३८/७/अ क्षेत्र ०-८०-३१ हे.आर.आकार २.०० रु.पैसे या मिळकती पैकी ०-४०-३१ हे. आर. ही मिळकत आमचे अशिल तुलसी विलास बुरांडे यांचे खुद्द मालकीची, ताबेकब्जा वहिवाटीची व कसवणुकीची आहे. सदर मिळकतीमध्ये आमचे अशिलांनी नारळ व इतर झाडांची लागवड केलेली असून त्यामध्ये शेतघर, बोअरवेल, एक विहीर व पंपशेड आहे. भुमापन क्रमांक व उपविभाग ३८/१, ३८/२, ३८/३, ३८/४, ३८/५, ३८/६, ३८/७ब, ३८/८, ३८/९, ३८/१०, ३८/११ या मिळकती नफीसा आदिल भोलुभॉय, आदिल शरीफ भोलुभॉय, वासुदेवन राममुर्ती, ललिता वासुदेवन, मुस्तफा ख्वाजा हमीद, गीता अमर लुल्ला यांचे सामाईक मालकीची असून भुमापन क्रमांक व उपविभाग ३८/७ अ ही मिळकत तुलसी विलास बुरांडे, नीता सुनिल गुप्ता, जगदीश प्रसाद खंडेलवाल यांचे सामाईक मालकीची आहे.

मौजे पालव, ता.अलिबाग, जि.रायगड भुमापन क्रमांक व उपविभाग ३८ या मिळकतीचे आजतागायत पोट हिस्से झालेले नाहीत. भुमापन क्रमांक व उपविभाग ३८/१, ३८/२, ३८/३, ३८/४, ३८/५, ३८/६, ३८/७अ, ३८/७ब, ३८/८, ३८/९, ३८/१०, ३८/११ चे सातबारा उतारे वेगळे असले तरी त्यांचे आकारफोड होवून नकाशे वेगळे झालेले नाहीत. त्यामुळे भुमापन क्रमांक व उपविभाग ३८ मध्ये आमचे अशिलांचा हिस्सा आहे.

आमचे अशिलांनी भुमापन क्रमांक व उपविभाग ३८/७/अ क्षेत्र ०-८०-३१ हे.आर.आकार २.०० रु. पैसे या मिळकती पैकी ०-२०-०० हे. आर. मालक नीता सुनिल गुप्ता व ०-२०-०० हे.आर मालक जगदीश प्रसाद खंडेलवाल या मिळकतीबाबत आमचे अशिलांनी वेळोवेळी ठरकती घेवून सुध्दा नीता सुनिल गुप्ता, जगदीश प्रसाद खंडेलवाल यांनी भुमापन क्रमांक व उपविभाग ३८/७/अ क्षेत्र ०-८०-३१ हे. आर आकार २.०० रु.पैसे या मिळकती पैकी ०-४०-०० हे.आर.ही मिळकत नीता सुनिल गुप्ता, जगदीश प्रसाद खंडेलवाल यांनी राहुल बाळू नवाळे व निलेश एकनाथ पाटील यांना विक्री केली असल्यामुळे सदर फेरफार नोंदीस आमचे अशिलांनी हरकत घेतलेली आहे.

तरी वर नमूद केलेल्या मिळकतीचे हस्तांतरण हे सदर मिळकतीची पोटहिस्सा मोजणी होवून नकाशे स्वतंत्र झाल्याशिवाय कायदेशीर होणार नाही. तरी सदर मिळकती वर नमूद कारणाकरीता कोणीही त्रयस्थ व्यक्तीस हस्तांतरीत करु नये व कोणीही सदर मिळकती विकत घेवू नये.

याउपर सदर मिळकती हस्तांतरीत केल्यास योग्य ती कायदेशीर कारवाई आमचे अशिल करतील याची नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

दि. १२/०७/२०२६.

**ॲड. संपदा मनोज पाटील**
शॉप नं.११, भास्कर को.ऑप.हौसि.
सोसा., रामनाथ रोड,चेंढरे ता.अलिबाग,
जि. रायगड. मो.९२२५५६६०४३

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे साळांव, ता.मुरूड, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत ही माझे व माझ्या कुटूंबियांच्या सामायिक मालकीची व सामायिक ताबेकब्जा वहिवाटीची मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | स.नं./हि.नं | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| साळाव | ५५/२ | ०-९८-८०<br>पो.ख. ०-०९-५०<br>१-०८-३० | ०.७९ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये माझा १/६ सामायिक हिस्सा आहे. परंतु माझे नाव ७/१२ सदरी नसल्याचा गैरफायदा घेऊन माझी आई रत्नप्रभा कमळाकर वाणी ही सदर मिळकत विक्री करावयाची आहे, असे भासवून मिळकतीचे ठिकाणी इच्छुक खरेदीदारांस मिळकत पहाण्यासाठी घेऊन येत आहे. त्याचप्रमाणे काही इस्टेट एजंट देखील इच्छुक खरेदीदारांना घेऊन वारंवार मिळकतीचे ठिकाणी येऊन मिळकत विकावयाची आहे असे सांगून मिळकत दाखवू लागले आहेत.

तरी सर्व संबंधितांस, इस्टेट एजंटांस व इच्छुक खरेदीदारांस याद्वारे असे कळविण्यात येत आहे की, वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये माझा १/६ इतका अविभक्त हिस्सा आहे. त्यामुळे माझा अविभक्त हिस्सा जोपर्यंत विभक्त हिस्सा आहे. त्यामुळे माझा अविभक्त हिस्सा जोपर्यंत विभक्त करून मिळत नाही तोपर्यंत माझी आई, रत्नप्रभा कमळाकर वाणी यांस सदर मिळकतीचा खरेदी-विक्री अथवा अन्य व्यवहार परस्पर करण्याचा हक्क अधिकार नसल्याने श्रीमती रत्नप्रभा कमळाकर वाणी यांचेबरोबर अथवा अन्य कुणाहीबरोबर वर वर्णन केलेल्या मिळकतीचा व्यवहार कुणीही करू नये: तसा कोणताही व्यवहार केल्यास तो बेकायदेशीर होईल व तो माझ्यावर बंधनकारक रहाणार नाही. ही नोटीस डावलून अथवा दुर्लक्षित करून कुणीही व्यवहार केल्यास त्याबाबत योग्य ती कायदेशीर कारवाई सर्व संबंधितांवर करण्यात येईल, हे सर्वांस कळावे. अलिबाग,

तारीख : ११/०७/२०२६

सही /-

**श्री. पंकज कमळाकर वाणी,**
रा.साळांव, पो.विक्रमबाग, ता.मुरूड,
जि.रायगड ४०२२०२

## भरडखोल वारकऱ्यांची पायी दिंडी पंढरपूर मार्गस्थ

। दिघी । प्रतिनिधी ।

महाराष्ट्रातील वारकऱ्यांसाठी महत्त्वाची असणारी आषाढी एकादशी या अत्यंत विशेष उत्सवासाठी राज्यातून अनेक वारकरी एकत्र येतात. यावेळी देखील श्रीवर्धन तालुक्यातील भरडखोल येथील वारकरी ऊन वारा, पाऊस कशाचीही पर्वा न करता भक्तीत तल्लीन होऊन आपल्या विठुरायाच्या दर्शनाच्या ओढीने अनवाणी वारीत सहभागी झाले आहेत. या दिंडीचे रस्त्याने ठिकठिकाणी जल्लोषात स्वागत करण्यात येत आहे.



भरडखोल गावाहून वारकऱ्यांची पायी दिंडी पंढरपूर तीर्थक्षेत्री आषाढी एकादशी सोहळ्यासाठी बुधवारी सकाळी मार्गस्थ झाली आहे. या वारीमध्ये महिलांचा देखील सहभाग असून, तीनशेहून अधिक भक्त सहभागी झाले आहेत. वारकरी संप्रदाय तसेच कोळी समाजाचे प्रेरणास्थान रामचंद्र वाघे यांच्या नेतृत्वाखाली ४० वर्षांची ही अखंड परंपरा यंदाही भक्तिभावात सुरू आहे.

पंढरपूर येथे २५ जुलै रोजी आषाढी एकादशीचा सण साजरा होत असल्याने १८ दिवसांचा अनवाणी प्रवास दिंडीत थकवा आला तरीही वारीतील लक्षावधी जनांचा प्रवाहो एका विठ्ठल नामाच्या मंत्राने प्रवाहित होऊन चालत असतो. अस मत वारकऱ्यांनी यावेळी व्यक्त केलं.

# क्रिकेटच्या पंढरीत भारतीय महिलांची 'क्रांती'

## ।। घरात घुसून इंग्लंडची उडवली दाणादाण ।। लॉर्ड्स कसोटीवर भारतीय संघाचे वर्चस्व

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

लॉर्ड्सच्या ऐतिहासिक मैदानावर यजमान संघाविरुद्ध एकमेव कसोटी मालिका सामना खेळला जात आहे. त्या सामन्यात भारतीय महिला टीमनी क्रांती घडवली आहे. लॉर्ड्सवर सुरू झालेल्या या सामन्यात भारतीय महिला संघाने इंग्लंडचा १७० रनवर ऑलआऊट झाला आहे, त्यामुळे भारतीय संघाला ११५ रनची आघाडी मिळाली आहे. भारताकडून क्रांती गौडने सर्वाधिक ५ विकेट घेतल्या, तर स्नेह राणाला २, सायली सतघरेला २ आणि दीप्ती शर्माला १ विकेट मिळाली.



लॉर्ड्स कसोटीच्या दुसऱ्या दिवशी २२ वर्षीय भारतीय महिला वेगवान गोलंदाज क्रांती गौडची दमदार कामगिरी पाहायला मिळाली. इंग्लंडविरुद्ध पहिल्या डावात १७ षटके गोलंदाजी करत पाच विकेट्स घेतले. इंग्लंडचा पहिला डाव १७० धावांवर संपुष्टात आणण्यात तिने महत्त्वाची भूमिका बजावली. यासह, क्रांती गौड लॉर्ड्सवर पाच विकेट्स घेणारी महिला क्रिकेटच्या इतिहासातील पहिली गोलंदाज ठरली. याशिवाय लॉर्ड्स ऑनर्स बोर्डमध्ये स्थान मिळवणारी पहिली महिला खेळाडू ठरली आहे.

वेगवान गोलंदाज क्रांती गौडने इंग्लंडविरुद्धच्या महिला कसोटी सामन्यात 'क्रांती' घडवली. ३७ धावांत तिने पाच विकेट मिळवल्या, त्यामुळे भारताने इंग्लंडचा डाव १७० धावांत गुंडाळल्यांतर दुसऱ्या दिवशी १ बाद १५४ अशी सुरुवात केली. भारत एकण २६९ धावांनी आघाडीवर आहे. ऐतिहासिक लॉर्ड्सवर सुरू असलेल्या या कसोटी सामन्याचा दुसरा दिवस भारतीय गोलंदाजांनी गाजवला.

### संक्षिप्त धावफलक

भारत : पहिला डाव : २८५ आणि दुसरा डाव १ बाद १५४ (स्मृती मानधना खेळत आहे ६९, शेफाली वर्मा ३३) इंग्लंड : पहिला डाव : १७० (नॅट स्किवर ४४, मी जोन्स ५२, सायली सातघरे १३-३-४०-२, क्रांती गौड १७-७-३७-५, स्नेह राणा १४-३-४१-२) .

पहिल्या दिवशी एक बाद २१ अशी सुरुवात करणाऱ्या इंग्लिश महिला फलंदाजांची दाणादाण उडवली. जोन्स (५२) आणि नॅट स्किवर (४४) यांचा अपवाद वगळता इंग्लंडच्या इतर फलंदाजांनी शरणागती स्वीकारली. भारताकडून सायली सातघरे आणि स्नेह राणा यांनी प्रत्येकी दोन विकेटचे योगदान दिले.

खेळ सुरू झाल्यावर एक बाद २१ वरून इंग्लंडची अवस्था चार बाद ४७ अशी झाली. तेथेच भारतीयांनी पकड मिळवण्यास सुरुवात केली; परंतु मी जोन्स आणि नॅट स्किवर यांनी ८४ धावांची भागीदारी करून भारतीय गोलंदाजांसमोर काही प्रमाणात चिंता निर्माण केली होती.

फिरकी गोलंदाज स्नेह राणाने मी जोन्सला बाद केले आणि तेथून पुन्हा इंग्लंडची घसरगुंडी सुरू झाली.

पहिल्या डावात ११५ धावांची भरभक्कम आघाडी मिळाल्यामुळे आत्मविश्वास वाढलेल्या स्मृती मानधना आणि शेफाली वर्मा यांनी ८८ धावांची भक्कम सलामी दिली. शेफाली वर्मा ३३ धावांवर बाद झाली; परंतु तोपर्यंत भारताची आघाडी द्विशतकी धावांची झाली होती.

भारत-इंग्लंड यांच्यात लॉर्ड्सवर ऐतिहासिक टेस्ट मॅच खेळवली जात आहे. याआधी कधीच लॉर्ड्सवर महिलांची टेस्ट मॅच खेळवली गेली नव्हती. १४२ वर्षांपूर्वी याच मैदानात पुरुषांच्या क्रिकेट इतिहासातली पहिली मॅच खेळवली गेली होती, पण या मैदानात महिला क्रिकेट संघाची पहिली टेस्ट व्हायला २०२६ साल उजाडले आहे.

# मुरूड समुद्रकिनारी रंगणार क्रिकेटचे सामने

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**



मुरूड कोळीवाडा उद्धवसेना शाखा विभाग मुरुड तालुका मर्यादित कै. नंदकुमार केंडु यांच्या स्मृती प्रित्यर्थ टी-२० धमाका क्रिकेट स्पर्धा २०२६, या दि १३ ते १६ जुलै रोजी चार षटकांचे पावसाळी ओव्हर आर्म क्रिकेटचे सामने मुरूड साई गौरी लॉजच्या समोरील समुद्रकिनारी येथे आयोजक अमित गोंजी यांनी आयोजित करण्यात आले आहे.

या क्रिकेट सामनाचे उद्घाटन उबाठा पक्षांचे नेते माजी नगरसेवक प्रमोद भायदे यांच्या हस्ते तर अध्यक्ष म्हणून मुरुड जंजिरा नगरपरिषदेचे नगराध्यक्षा आराधना दांडेकर, नगरसेवक आदेश दांडेकर, माजी उपनगराध्यक्ष बाळकृष्ण गोंजी व निवृत्त वैद्यकीय अधिकारी मंगेश पाटील यांच्या उपस्थित रहणार आहेत. तर बक्षिस वितरण आ. अनिकेत तटकरे यांच्या हस्ते संपन्न होणार असल्याचे योगेश सुर्वे आणि अमित गोंजी यांनी सांगितले.

मुरूड विभागाच्या वतीने गेले २६ वर्ष पावसासाठी क्रिकेटचे सामने मुरूड समुद्रकिनारी भरवले जात आहेत. या क्रिकेटच्या सामन्यातून विजेत्यांना आकर्षक बक्षीसे मान्यवरांच्या हस्ते देण्यात येणार आहेत. तरी तालुक्यातील क्रिकेट मंडळानी या क्रिकेटच्या सामन्यात सहभागी व्हावे असे आवाहन अमित गोंजी यांनी केले आहे.

## निवडक

### साई किशोर काऊंटी क्रिकेटसाठी सज्ज

**लंडन :** भारताचा डावखुरा फिरकी गोलंदाज आर. साई किशोर पुन्हा एकदा इंग्लंडमध्ये काउंटी क्रिकेट खेळणार आहे. या २९ वर्षीय खेळाडूने २०२६ काउंटी चॅम्पियनशिप हंगामातील शेवटच्या सहा सामन्यांसाठी ग्लॉस्टरशायरसोबत करार केला आहे. तो २० ऑगस्टपासून चेल्टनहॅम येथे वॉर्सेस्टरशायरविरुद्ध होणाऱ्या सामन्यासाठी संघात सामील होईल. त्यानंतर तो ग्लॉस्टरशायरचे प्रतिनिधित्व करत ब्रिस्टल येथे डर्बीशायर आणि मिडलसेक्सविरुद्ध, तसेच डरहॅम, लँकेशायर आणि केंटविरुद्ध परदेशा-तील सामने खेळेल. साई किशोरने तामिळनाडूसाठी ५४ प्रथम-श्रेणी सामन्यांमध्ये २२३ बळी घेतले आहेत, ज्यात १४ वेळा पाच बळी आणि ११ वेळा चार बळींचा समावेश आहे. यापूर्वी तो २०२५ मध्ये सरे संघाकडून काउंटी चॅम्पियनशिपमध्ये खेळला होता, जिथे त्याने डरहॅमविरुद्धच्या विजयादरम्यान स्पर्धेतील आपला पहिला पाच बळींचा टप्पा गाठला होता.



### लिंडा नोस्कोव्हा ठरली विम्बल्डन चॅम्पियन

**लंडन :** विम्बल्डन २०२६ चे महिला एकेरी विजेतेपद पटकावणाऱ्या २१ वर्षीय चेक टेनिस स्टार लिंडा नोस्कोव्हाने आपल्या कारकिर्दीतील पहिले ग्रँडस्लॅम जिंकले. चेक टेनिसपटूंमधील अंतिम सामन्यात, नोस्कोव्हाने कॅरोलिना मुचोव्हाचा ६-२, ५-७, ६-३ असा पराभव करून प्रतिष्ठित व्हीनस रोझवॉटर डिश जिंकली. नोस्कोव्हाने पहिल्या सेटमध्ये उत्कृष्ट खेळ करत सहज आघाडी घेतली. दुसऱ्या सेटमध्ये ती विजयापासून केवळ एक पाऊल दूर असली तरी, तिने पाच मॅच पॉईंट्स गमावले, ज्यामुळे सामना तिसऱ्या सेटमध्ये गेला. असे असूनही, तिने एक उल्लेखनीय पुनरागमन करत निर्णायक सेट ६-३ ने जिंकला आणि आपले पहिले ग्रँड स्लॅम विजेतेपद निश्चित केले. लिंडा नोस्कोव्हा गेल्या चार वर्षांत विम्बल्डन महिला एकेरी विजेतेपद जिंकणारी तिसरी चेक टेनिसपटू ठरली आहे. यापूर्वी, मार्केटा वोंद्रोसोवाने २०२३ मध्ये आणि बार्बोरा क्रेजकोवाने २०२४ मध्ये हे प्रतिष्ठित विजेतेपद पटकावले होते. या विजयाने चेक महिला टेनिसचे वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले.



### वर्ल्ड रोइंग कपमध्ये भारताला सुवर्णपदक



**ल्यूसर्न :** भारतीय लष्करातील जवानांनी क्रीडा जगतातील अभिमानास्पद कामगिरीसह स्वित्झर्लंडमध्ये तिरंगा फडकवला आहे. लक्ष्य आणि उज्ज्वल कुमार सिंह यांनी ल्यूसर्न येथे झालेल्या वर्ल्ड रोइंग कप ३ स्पर्धेत ऐतिहासिक सुवर्णपदक पटकावले. लाइटवेट पुरुष डबल स्कल्स अंतिम फेरीत लक्ष्य आणि उज्ज्वल कुमार सिंह या भारतीय जोडीने हाँगकाँग आणि नेदरलँड्सच्या प्रतिस्पर्ध्यांना मात देत भारताच्या नावावर ऐतिहासिक सुवर्णपदकाची नोंद केली. भारतीय जोडीने अवघ्या ६ मिनिटे २६.०९ सेकंदांत शर्यत पूर्ण करत सुवर्णपदकावर नाव कोरले. दुसऱ्या स्थानावर हाँगकाँगची सॅन तुंग लाम आणि टिक लुन चान ही जोडी राहिली. त्यांनी ६:२७.१४ तर तिसऱ्या स्थानावर नेदरलँड्सची एरिक व्हॅन ईजक व्हॅन हेस्लिंगा आणि फ्रेडरिक प्लोएग ही जोडी राहिली. त्यांनी ६:२७.३६ वेळ नोंदवली. वर्ल्ड रोइंग कपमध्ये सुवर्णपदक जिंकण्यापूर्वी भारताने तीन कांस्यपदके जिंकली होती. त्यातील पहिले पदक २००९ मध्ये महिला गटात मिळाले होते, तर दुसरे आणि तिसरे पदक अनुक्रमे २०१९ आणि २०२२ मध्ये पॅरा युगल गटात मिळाले होते. २६ ते २८ जूनदरम्यान ल्यूसर्न येथे आयोजित करण्यात आलेल्या वर्ल्ड रोइंग कप ३ स्पर्धेत ४२ देशांतील ६५० हून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला. यंदाच्या वर्षअखेरीस होणाऱ्या वर्ल्ड रोइंग चॅम्पियनशिपच्या दृष्टीने ही स्पर्धा महत्त्वाची मानली जाते.

# एमसीए पंच चाचणी परीक्षेत अकरा उत्तीर्ण

**। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने जून महिन्यात घेण्यात आलेल्या चाचणी पंच परिक्षेमध्ये रायगड जिल्ह्यातील अकरा पंच ८० टक्के पेक्षा जास्त गुण मिळवून मुख्य परिक्षेस पात्र ठरले आहेत. ही बाब जिल्ह्यातील सर्व क्रिकेट प्रेमींसाठी अतिशय आनंददायी आहे. रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांच्या पुढाकारातून जिल्ह्यातील पंचासाठी १०५ दिवसांचे मार्गदर्शन शिबीर (ऑनलाईन व प्रत्यक्ष कार्यशाळा) जून २०२६ पासून सूरू करण्यात आली आहे. सदर शिबीर ३० सप्टेंबर पर्यंत चालणार आहे. या शिबिरात मुख्य प्रशिक्षक व क्रिकेट नियमांचे तज्ञ नयन कट्टा यांच्या सह बीसीसीआयचे दोन पंच हर्षद रावले व रुपेश खडगी तसेच एमसीए मुंबईचे पंच राजन कसबे हे पंचाना मार्गदर्शन करत आहेत. आरडीसीएचे सदस्य तथा एमसीएचे पंच ॲड.पंकज पंडित व प्रशांत माळी यांना शिबीराच्या आयोजनाची जबाबदारी दिली आहे. उत्तीर्ण झालेल्या पंचाची नावे पुढील प्रमाणे. अरुण ठाकूर (उरण), राहुल पाटील (उरण), रविंद्र म्हात्रे (उरण), ॲड. देवेंद्र मिश्रा, श्रीकांत पाटील (पेण), संकेश ढोले, मंगेश वार्डे (अलिबाग), सूरज देशमुख (रोहा), प्रवीण देशमुख (खालापूर), प्रणव सामंत, यश संकपाल (पनवेल) उत्तीर्ण झालेल्या सर्व पंचांना रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी अभिनंदन करून भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# रोहित आशियाई खेळांसाठीही पात्र

**भुवनेश्वर :** कलिंगा येथे आयोजित ६५ व्या राष्ट्रीय आंतरराज्यीय वरिष्ठ ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपच्या अंतिम दिवशी भालाफेक स्पर्धेत रोहित यादवची चमक दिसून आली. रोहितने ८७.०५ मीटर भाला फेकून सुवर्णपदक जिंकले. यासोबतच, त्याने २०२६ च्या आशियाई खेळांसाठीही पात्रता मिळवली. रोहितच्या नावे हा मोठा विक्रम प्रस्थापित झाला आहे. इतकेच नाही तर नीरज चोप्रानंतर तो असा विक्रम करणारा तिसरा भारतीय ठरला आहे.

# स्टिपलचेसमध्ये कराडच्या प्राचीचा थरार



**। कराड । प्रतिनिधी ।**

चीन येथे झालेल्या आशियाई ॲथलेटिक्स चॅम्पियनमध्ये किरपे ता. कराड, येथील प्राची देवकर हिने तीन हजार मीटर ट्रिपल चेस स्पर्धा १० मिनिट ३२ सेकंदात पूर्ण करुन देशासाठी कांस्यपदक पटकावले. अत्यंत खडतर परिस्थितीतून पुढे जाऊन प्राचीने देशासह राज्याचे नाव कांस्यपदकावर कोरले आहे. ग्रामीण भागातील एका सर्वसामान्य कुटुंबातून पुढे आलेल्या प्राचीने अथक मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या बळावर हा टप्पा गाठला आहे. अत्यंत खडतर परिस्थितीत सराव करत तिने राष्ट्रीय प्रशिक्षक अतुल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करुन तिने राष्ट्रीय स्तरावर स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे. आता आशियाई स्पर्धेत पदक मिळवत तिने आपल्या कारकिर्दीत आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे. स्टिपलचेस ही शर्यत वेग, सहनशक्ती आणि अडथळ्यांवर मात करण्याच्या कौशल्याची कसोटी मानली जाते. या स्पर्धेत आशियातील बलाढ्य खेळाडूंच्या उपस्थितीत प्राचीने संयमी आणि आक्रमक धाव घेत कांस्य पदकावर आपले नाव कोरले. तिच्या यशाची बातमी समजताच किरपे गावासह संपूर्ण कराड तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. विविध क्षेत्रांतील मान्यवर, क्रीडाप्रेमी आणि नागरिकांनी तिचे अभिनंदन केले.

किरपे येथील प्राचीचा प्रवास अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरला आहे. मर्यादित सुविधा, ग्रामीण वातावरण आणि कठोर सराव यांवर मात करत तिने राष्ट्रीय स्तरावर आपली ओळख निर्माण केली. त्यानंतर आशियाई थलेटिक्स चॅम्पियनशिपसाठी भारतीय संघात स्थान मिळवणे आणि थेट पदक जिंकणे ही तिच्या मेहनतीची मोठी पावती ठरली आहे. तीन हजार मीटर स्टिपलचेससारख्या आव्हानात्मक स्पर्धेत कांस्यपदक मिळवून तिने भारतीय तिरंगा अभिमानाने फडकवला आहे.

# कुस्तीत सुमीतकुमारला सुवर्णपदक

**। बीड । प्रतिनिधी ।**


थायलंड येथे पार पडलेल्या २०२६ च्या आशियाई कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यामधील शेलापुरी गावचा सुमीतकुमार लक्ष्मण भारस्कर याने सुवर्णपदक पटकावून आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचा तिरंगा फडकवला आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थिती आणि गरिबीवर मात करत सुमीतकुमारने पुरुषांच्या ७० किलो फ्रीस्टाईल गटात अंतिम सामन्यात विजय मिळवून हे ऐतिहासिक यश संपादन केले. या दैदीप्यमान यशामुळे महाराष्ट्रातून आणि क्रीडा क्षेत्रातून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# मराठमोळ्या सर्वेशची ऐतिहासिक उडी

## पोडियमवर स्थान मिळवणारा पहिला भारतीय

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय उंच उडीपटू सर्वेश कुशारेने मोनाको डायमंड लीगमध्ये ऐतिहासिक कामगिरी केली. आपल्या डायमंड लीग पदार्पणातच, त्याने उंच उडी स्पर्धेत तिसरे स्थान पटकावले आणि पोडियमवर स्थान मिळवणारा तो पहिला भारतीय उंच उडीपटू ठरला. ३१ वर्षीय कुशारेसाठी तिसरे स्थान मिळवणे सोपे नव्हते, पण त्यानं २.२६ मीटरच्या उडीसह तिसरे स्थान मिळवण्यात यश मिळवले. यासह, कुशारे एका विशेष क्लबमध्ये सामील झाला आहे.



सर्वेश हा डायमंड लीगच्या इतिहासात अव्वल-३ मध्ये स्थान मिळवणारा चौथा भारतीय खेळाडू ठरला आहे. सर्वेशच्या आधी, २०२३ डायमंड लीगच्या इतिहासात दोनदा अव्वल-३ मध्ये स्थान मिळवले आहे. सर्वेशचा सध्याचा फॉर्म प्रभावी ठरला आहे. डायमंड लीग पदार्पणाच्या काही काळापूर्वीच, भुवनेश्वर इथे झालेल्या राष्ट्रीय आंतर-राज्य चॅम्पियनशिपमध्ये त्याने तेजस्विन शंकरचा आठ वर्षे जुना २.२९ मीटरचा राष्ट्रीय विक्रम मोडत २.३१ मीटरचा नवीन राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केला. या स्पर्धेत कुशारे तिसऱ्या स्थानी राहिला. त्याच्या पुढे कतारचा तीन वेळचा विश्वविजेता आणि टोकियो ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता मुताझ एसा बार्शिम आणि अमेरिकेचा २०२३ विश्व चॅम्पियनशिप रौप्यपदक विजेता जुवॉन हॅरिसन यांसारखे स्टार खेळाडू होते. आता राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत सर्वेशच्या कामगिरीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# टी-२० मधला सर्वाधिक स्कोअर

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

टी-२० क्रिकेटच्या इतिहासातल्या सगळ्यात मोठ्या स्कोअरची नोंद झाली आहे. टी-२० मधला सर्वाधिक स्कोअर करताना बॅटरने द्विशतकही झळकावले आहे. तर संघाने इनिंगमध्ये ४७ सिक्स आणि २२ फोर मारल्या. इंग्लंडमधल्या क्लब क्रिकेटमध्ये हा वर्ल्ड रेकॉर्ड झाला आहे.

टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक रनचा विक्रम झिम्बाब्वेच्या नावावर आहे. ऑक्टोबर २०२४ मध्ये झिम्बाब्वेने गाम्बियाविरुद्ध २० ओव्हरमध्ये ३४४/४ एवढा स्कोअर केला होता. तर भारतात टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक स्कोअरचा रेकॉर्ड बडोद्याच्या नावावर आहे. डिसेंबर २०२४ मध्ये बडोद्याने सिक्कीमविरुद्ध २० ओव्हरमध्ये ३४९/५ एवढे रन केले होते, पण आता टी-२० क्रिकेटमध्ये पहिल्यांदाच ४०० रनचा आकडा पार झाला आहे.




७ जुलैला इंग्लंडच्या डम्बलटन क्रिकेट क्लबने प्रीमियर वन टॉप टियर डिव्हिजनमध्ये हेरदली रेडिंग्सविरुद्ध बॅटिंग करताना २ विकेट गमावून ४१७ रन बनवले. टीमचा ओपनर इवान गेगने ५५ बॉलमध्ये १३ फोर आणि २३ सिक्सच्या मदतीने २०६ रन केले. याशिवाय डेन हॉलंडने ३७ बॉलमध्ये १२२ रनची खेळी केली.

# भारताची ॲथलेटिक्समध्ये शानदार सुरुवात

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आशियाई अंडर-२३ ॲथलेटिक्स चँपियनशिप २०२६ मध्ये भारताने शानदार सुरुवात करत पहिल्याच दिवशी एक सुवर्ण, एक रौप्य आणि तीन कांस्य अशी एकूण पाच पदके आपल्या नावावर केली. भारताचे एकमेव सुवर्णपदक मिश्र ४४०० मीटर रिले संघाने जिंकले. आस्तिक प्रधान, सँड्रा मोल साबू, सेतु मिश्रा आणि श्रावणी सचिन सांगले या भारतीय चौकडीने ३:१८.६४ सेकंदांची वेळ नोंदवत सुवर्णपदक पटकावले. हा भारतासाठी दिवसातील अखेरचा स्पर्धात्मक प्रकार होता.



भारताला पहिले पदक भरतप्रीत सिंह यांनी मिळवून दिले. त्यांनी पुरुष डिस्कस थ्रोमध्ये ५२.९१ मीटरच्या सर्वोत्तम प्रयत्नासह कांस्यपदक जिंकले. चीनच्या ली झिक्सिन यांनी ६०.७९ मीटरसह सुवर्ण, तर त्यांच्याच देशातील जियांग जेहाओ यांनी ५९.६० मीटरसह रौप्यपदक जिंकले. पुरुषांच्या ५००० मीटर शर्यतीत भारताने दोन पदके मिळवली. शिवाजी परशुराम मदप्पागौडा यांनी १४:०८.१९ मिनिटांच्या वेळेसह रौप्यपदक जिंकले, तर विनोद सिंह यांनी १४:२३.६७ मिनिटांत शर्यत पूर्ण करत कांस्यपदक आपल्या नावावर केले.

## इंग्लंडने ४-0 असा मिळवला विजय | नंबर १ चा हिसकावला ताज

# भारताचे टी-२० मधील राज्य संपले

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाचव्या टी-२० सामन्यात इंग्लंडने भारताला पुन्हा एकदा धोबीपछाड दिला. भारताचा कर्णधार श्रेयस अय्यर याने नाणेफेकीचा कौल जिंकला आणि प्रथम गोलंदाजी स्वीकारली. पण हा निर्णय देखील फसला. या मालिकेतील पाचही सामन्यात श्रेयसने नाणेफेक जिंकली पण प्रत्येक वेळी पदरी पराभव पडला. पाचव्या टी-२० इंग्लंडने भारताच्या गोलंदाजांची अक्षरशः पिसं काढली. इंग्लंडने २० षटकात ३ गडी गमवून २५७ धावा केल्या. तसेच २५८ धावांचं लक्ष्य ठेवले. या धावांचा पाठलाग करताना आक्रमक खेळ करावा लागणार हे नक्की होते. त्यामुळे आघाडीच्या फलंदाजांच्या कामगिरीवर लक्ष होते. पण पुन्हा एकदा पदरी निराशा पडली. भारताने या सामन्यात २०१ धावांपर्यंत मजल मारली आणि हा ५६ धावांनी गमावला. यासह पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत ०-४ असा पराभव सहन करावा लागला आहे.



### भारतीय संघ विजयाच्या प्रतिक्षेत

दरम्यान, आयर्लंड दौऱ्यापासून भारतीय टी-२० संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी श्रेयस अय्यरने स्वीकारली आहे. मात्र त्याच्या नेतृत्वात आता भारतीय संघ अद्यापही विजयाच्या प्रतिक्षेत आहे.

या विजयामुळे इंग्लंडला मोठा फायदा झाला आहे. इंग्लंडने भारताला मालिकेत पराभवाचाच धक्का दिलेला नाही, तर टी-२० च्या संघिक क्रमवारीतचही माजी विश्वविजेत्यांनी धक्का दिला आहे

हॅरी ब्रुकचा इंग्लंड संघ आता टी-२० क्रमवारीत अव्वल क्रमांकावर आले आहेत. त्यामुळे भारतीय संघ दुसऱ्या क्रमांकावर घसरला आहे. भारतीय संघाने जूनच्या अखेरच्या आठवड्यात आयर्लंडविरुद्ध २-० असा पराभव स्विकारला होता. त्यानंतर इंग्लंडविरुद्ध ४-० असा पराभव स्वीकारावा लागला होता. त्याचाच तोटा भारतीय संघाला झाला आहे.

भारतीय संघ फेब्रुवारी २०२२ मध्ये टी-२० क्रमवारीत अव्वल क्रमांकावर आला होता. त्यानंतर जवळपास १६०० दिवस भारतीय संघ अव्वल क्रमांकावर कायम होता. मात्र आता हे वर्चस्व इंग्लंडने मोडीत काढले. इंग्लंडविरुद्धचा पहिला टी-२० सामना पावसामुळे रद्द झाला होता. त्यानंतरच्या चारही टी-२० सामन्यात इंग्लंडने भारताला मोठ्या फरकाने पराभवाचे धक्के दिले आहेत. दरम्यान टी-२० क्रमवारीत इंग्लंड आता अव्वल क्रमांकावर, भारत दुसऱ्या क्रमांकावर आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)